# माणूस

शनिवार । २० मार्च १९७६ । एक रुपया

डोमिनिकन लॅपियरनें कॉन्फिडन्स ट्रिकने फड मारला. ध्वनिमुद्रित पट्ट्यांची चवड दाखवायची, कागदांचे गठ्ठे दाखवायचे आणि म्हणायचे, 'हा काय माझ्याजवळ पुरावाच आहे सगळा '....

**फ्रीडम अॅट मिडनाईट : एक आव्हान** पृष्ठ : ९

जोपर्यंत मधु पाटील मैदानावर आहे तोपर्यंत मैदानावर काहीही घडू शकते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले . . . . . . . . . . . . .

**भुईर सुवर्ण चषक स्पर्धा** पृष्ठ : ५

कस्तुरीमृग हाती लागतो तो फक्त मोहन गोखले, रोहिणी ओक आणि नाटकाच्या जाहिरातीत वारंवार लिहिलं गेलंय त्याप्रमाणे श्रीराम लागू....श्रीराम लागू....आणि श्रीराम लागू यांच्याच !

**कस्तुरीमृग** पृष्ठ : २३

बर्गमनचा ' व्हर्जिन स्प्रिंग ' हाच मुळी माणसाला माणसाकडे घेऊन जाणाऱ्या प्रक्रियेचा अटळ असा भाग ठरतो....

**व्हर्जिन स्प्रिंग** पृष्ठ : २५

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे– अंक : एकेचाळीसावा

२० मार्च १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


मुंबई : भिकारी हटाव मोहीम

# ....तोपर्यंत हा प्रश्न भेडसावतच राहणार

श्रीकांत जपे

'वुई हॅव नो मनी फॉर अवर ब्रेड, प्लीज हेल्प अस् !' अशा तऱ्हेचा पुठ्ठ्याचा एक बोर्ड लावून दोघे डच हिप्पी चर्चगेट स्टेशनाच्या बाहेर बसलेयत. वेळ आहे सकाळच्या साडेनवाची :–

क्षणार्धात ही गर्दी जमते. तडातड पैसे त्यांच्यासमोर पडू लागतात. मनात जरी उकळ्या फुटत असल्या तरी ते गोरे भिकारी आपल्या थोबाडावरची एकही सुरकुती हलू देत नाहीत.

बारा वाजेपर्यंत बराच गल्ला जमतो. मग ते शांतपणे तो मोजतात. झोळ्या उचलून चालू लागतात.

मी त्या भिकाऱ्यांचा पाठलाग सुरू करतो. ते तिथून कुलाब्याला असलेल्या हमीददादाच्या चरस अड्ड्यात घुसतात, चिलीमी पेटवतात, तोच मी त्यांच्याच शेजारी ठाण मांडतो अन् हळूच संभाषण सुरू करतो.

'–इज् धीस युवर ब्रेड !'–मी

'ओऽऽह, धीस इज् ए पार्ट ऑफ इट ! यानंतर जेवण–'उत्तर मिळते.

एक दोन 'कश्' मारल्यानंतर तो बोलू लागतो–

'इंडियात आलो ते मजा करण्यासाठी. मन:शांती मिळविण्यासाठी. पैसे मिळविणे भारतात अजीबात अवघड नाहीय, सरळ सरळ भीक मागावी. गोऱ्या कातडीचा फायदा उठवावा अन् 'डव्ह्' (गल्ला) गोळा करावा. आजच बघ ना ! केवळ तीन तासांतच एकोणचाळीस रुपयांचा गल्ला जमला'– त्याने उत्तर दिले.

कुलाब्यात व फोर्टात असे अनंत हिप्पी फिरताना दिसतात. हिप्पींच्या गँग फार छोटया-छोटया असतात. एखादी पोरगी व दोन-तीन बाप्ये ! चरस, गांजा आदी स्वस्त वस्तूंचे सेवन करायचे, जमल्यास एल्.एस्. डी. चे स्मगलिंग करावयाचे. मात्र फार कष्ट घ्यावयाचे नाहीत, हा त्यांचा खाक्या. भीक मागून पैसे मिळवता येतात, हे 'इंडियात' आल्यावर त्यांना समजले.

हिप्पींनंतर चर्चगेट, फाऊन्टन, फोर्ट, बोरीबंदर, क्रॉफर्ड मार्केट या भागातले अनंत भिकारी !

या भागात थोडे थोडके नव्हेत तर तब्बल सात हजार भिकारी आहेत. ज्याला 'संघटित गुन्हेगारी' (Organised Crime) म्हणू, त्यात ते मोडतात.

धर्म कोणताही असला तरी 'भिक्षा देणे' हा प्रत्येक धर्माने ॲडव्होकेट केलेला एक अवगुणच. तो प्रत्येकात जवळजवळ भिनलेलाय. त्याचा हे पुरेपूर फायदा घेतात.

चर्चगेट स्टेशनच्या बाहेर दोन छोटया गँग आहेत. एक गँग अंडरग्राऊंड रस्त्यावर असते तर दुसरी स्टेशनच्या डाव्या-उजव्या बाजूच्या फूटपाथवर धंदा करते. या गँगच्या दादाचे नाव, 'कोडापल्ली-अण्णा'. त्याच्या हाताखाली सुमारे १९ बाया, पैकी ११ जवान; नऊ पोरे, तीन म्हातारे व काही अर्भके आहेत.

ही मंडळी तिथेच वास्तव्य करून राहतात. शिळेपाके मिळवण्यात त्यांना कवडीचा इंटरेस्ट नाही. चर्चगेटला ते मिळण्याचा संभवही नाही. त्यामुळे या इथल्या जागेला फार महत्त्व. इथे रोकडा पैसा मिळतो. पोरांना जमल्यास पाकीटही मारता येते. रात्री दहा-साडेदहाच्या पुढे चुली फूटपाथवरच पेटवून गिळायचा कार्यक्रम पार पाडता येतो.

आता धंद्याची म्हणजेच मिळकतीची बाब दोन्ही गँगना मिळून रोजी थोडीथोडकी नव्हे तर कमीत कमी शंभराची कमाई होते. त्यात अण्णाला पंचवीस टक्के हिस्सा द्यावा लागतो. पण कधीमधी जर जास्त मिळकत झाली, तर

हाच बॉस, त्यांच्या अंगावर पहिल्या धारेच्या बाटल्या फेकतो. यांना चर्चगेटच्या या भागात या बॉसच्या परवानगीखेरीज धंदा करता येत नाही. कोणी करायचे धाडस केलेच, तर किमानपक्षी काही दात तरी त्याला गमवावे लागतात.

चर्चगेटनंतर बोरीबंदर !

इथे तर काय साराच आनंदी आनंद आहे. कारण स्टेशनातून बाहेर आल्या आल्या दिसणाऱ्या 'बेगर्स–स्पेशल गार्डन'मध्ये अनेक गँगचे व्यवहार राजरोस चालू असतात. मी जेव्हा या गँगचा पक्का पाठपुरावा केला तेव्हा समजले की इथे अंदाजे हजाराच्या आसपास 'भिखमंगे' आहेत.

आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ह्यांत फार तर पन्नासजणच अपंग आहेत. पण बाकीचे चांगले धडधाकट धंदेवाईक आहेत.

पैकी बाया दिवसा भीक व रात्री 'झोपण्याचा' धंदा करतात. दिवसा पोतेरी अंगावर घालतात, तर रात्री ट्विकल नायलॉनची लुगडी चढवतात. जी. पी. ओ. चा फूटपाथ ते फाउन्टनपर्यंत यांची हद्द.

'साहेब, गाडी आली की भीक मिळते. एखादं पोर घेऊन रडत बसायचं, दुष्काळाच्या नावाने कडाकडा बोटं मोडायची. मग पै-पैसा मिळतो.

'मात्र रात्री भीक मिळत न्हाई. कारण पब्लिकची वर्दळ कमी असते. तवा ह्यो आपल्या दुसरा धंदा. रोजच्याला आठ–दहा रुपये सुटतात. त्यांतले दोन जरी दादाच्या मढ्यावर टाकले, तरी चार घास आरामात पोटात घालता येतात.

'आता तुमीच सांगा, म्या जर धुण्या–भांड्याची कामं करत बसले असते तर कितीसे सुटले असते ?' एका धुरपती बाईने मला आपली कहाणी कथन केली. तिचं गाव सोलापूर, पण गेली 'तीन वर्षे' ती मुंबईच्या बोरीबंदरावर 'सुका'त आहे.

बोरीबंदर, क्रॉफर्ड मार्केट, कुलाबा या भागातल्या भिकाऱ्यांचा पूर्वी एका मोठा उद्योग होता. हल्ली त्या धंद्याला मंदी आलीय. आणीबाणीत जरी काही धंद्यांची भरभराट झाली असली, तरी हा धंदा मात्र आणीबाणीमुळेच लयास जात आहे. ओळखलंत ना ! 'स्मगलिंग' हे त्या धंद्याचे नाव.

कुली ऊर्फ हाजीमलंगबाबा मस्तना नावाचा ह्या धंद्याचा एक उद्योगपती रोज क्रॉफर्ड मार्केटमध्ये हजारभर भिकाऱ्यांना खाना द्यावयाचा, 'धर्मापरी धरमं व्हायचा आणि कामापरी काम व्हायचे !' स्मगल्ड जिन्नसांचे हे उत्कृष्ट कॅरिअर्स होते. 'हमारेकु तुम्हारा कानून-बिनून मालूम नै ! उधर साला, एकेक टायमको बीसका पत्ता और बियाँणीभी छुटता थां–' ह्या भाषेत मला क्रॉफर्ड मार्केटच्या एका पिऱ्याने सांगितले. गडी अगदी भरदार अंगाचा. अंगावर मात्र फाटकी कापडं अन् अंगाला बोकडाचाच वास.

'आंघोळ का नाही,' या माझ्या मूर्ख प्रश्नाला हसून उत्तर देताना तो म्हणाला, 'साब, अगर हम सफा रहेंगा, तो क्या कमायेंगा. नाटक करनाच मांगता, नै तो कौन अपने जेबमे हाथ डालेंगा ?

'ये धंदेमे भोत नाटक करना पडता बॉस ! कभी आंधा तो कभी लंगडा बनना पडता है. मगर एक जगहपर एकच नाटक चलता, नै तो तुमच बोलेंगा, साला कल ये आंधा था आज लंगडा कैसा बन्या ?' पिऱ्याचे लेक्चर संपले.

हा पिऱ्या मूळचा मुंबईचाच. क्रॉफर्ड मार्केटच्याच फूटपाथवर वाढला. त्याला त्याची म्हातारा–म्हातारी आठवत नाहीत. एवढेच काय तर 'मराठी'ही बोलता येत नाही. 'हिंदीमेच बात करनेसे फायदा है !' हे त्याचे उत्तर.

रेल्वे स्टेशन्स्प्रमाणे भिकाऱ्यांची दुसरी हंटींग प्लेस म्हणजे नरीमन पॉईन्ट, मरीन ड्राईव्ह, अँपोलो बंदर आदी ठिकाणची पंचतारकांकित हॉटेल्स् ! ताज इंटरनॅशनल, ओबेरॉय, शरेटॉन, नटराज, अॅम्बॅसॅडर-कोठेही


**राजमाता जिजाऊ साहेबांच्या जीवनाचा सचित्र आलेख**

**राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे भव्य प्रकाशन !**

# राजमाता

**लेखिका : सौ. शालिनी पाटील**

**प्रकाशन : जिजाऊ साहेबांच्या पुण्यतिथीस**

**दि. १७ जून १९७६**

**मूल्य : रुपये १८।–**

**प्रसिद्धीपूर्व सवलतीचे मूल्य : रुपये १०।–**

जा ! काही मंडळी तुम्हाला लगेच घेरतील. तुम्ही जर साहेबाच्या गोऱ्या कातडीचे असाल, तर तुम्हाला लगेचच एअरपोर्टचा रस्ता धरावा असेच वाटेल.

महालक्ष्मीचे देऊळ, माहीम-भायखळा इथली चर्चे, महंमदअली रोडची मस्जिद, हाजिमलंगबाबाची यात्रा वगैरे ठिकाणे तर भिकाऱ्यांच्या बरकतीचीच. ठराविक वारी लायनी लावून बसायचे. जागा मिळण्यासाठी पुजाऱ्यालाही लाच द्यायला ते कमी करत नाहीत. इथे धर्मभेद नाही. 'बळी तो कान पिळी' हा साधासुधा न्याय. आंधळ्या, डुचक्या म्हाताऱ्याला जरब बसवून, भीक मागायला लावायची अन् निम्मा माल लुटायचा हा इथला न्याय.

महारोगी आणि हिजडेही भिका मागतात, त्याचप्रमाणे रात्री दारूभट्टी लावायचे अन् भडवेगिरी करायचे कामही करतात. पूर्वी जेव्हा दारूबंदी जोरात होती तेव्हा दारूभट्ट्यांवर काम करायला महारोग्यांना भरपूर डिमांड होती. हल्ली रिस्क जास्त म्हणून कामाचा दरही जास्त. नाहीपेक्षा आपली फळी ढकलत ढकलत भीक मागितलेली चांगली.

चांगल्याचुंगल्या घरातली पोरं पळविण्याच्या अनेक आख्यायिका आपण ऐकतो. हिंदी पिक्चरमध्ये कधीमधी बघतोदेखील, पण माझ्या संचारात मात्र मला अशी उदाहरणे वा आख्यायिका ऐकायला मिळाल्या नाहीत. कारण भिकाऱ्यांच्याच शब्दांत– 'नसतं झेंगाट कोन मागं लावून घेतोय. चांगल्या घरचं पोरं तवाच वळखू येतंया. मंग धांधल करायची आणि पोलिसांचे रट्टे खायचे, सांगितलंय कुनी 'लस्कर'च्या भाकरी बडवायला? शिवाय भिकाऱ्यालाही भरपूर लेंढार होतंयच की वो!'

होय, भिकाऱ्याला भरपूर लेंढार होतंय. इथे फॅमिली प्लॅनिंगचाच काय पण आपल्याला पोरं किती झालीत, ह्याच्या गणिताचाही पत्ता नसतो. लग्न-बिग्न आणि निरोध-नसबंदी तुम्हा-आम्हा पांढऱ्या कॉलरवाल्यांना. इथे कॉलर निळीसुद्धा नाही. इथे ती आहे काळी. त्यामुळे 'आपली आय हीच' एवढा पत्ता जरी पोराला लागला तरी मोप झाले, शिवाय दादांची दादागिरी असतेच.

मुंबईप्रमाणे पुण्यातही भिकाऱ्यांचा धंदा तेजीतच होता. खोपोलीचे रमाकांत हॉटेल लागल्यापासून ते पुणे स्टेशनपर्यंत हे भिकारी पाठलागावर असतात. पिंपरीच्या मेनरोडवर असलेल्या रॉक्सी हॉटेलपाशी एक मध्यमवयीन मद्रदेशीय बया, 'ओ बाबा–ओ बाबा' करत तुमचा पिच्छा पुरवते तर रमाकांतपासची एक बाई–तुम्ही पैसे न दिलेत तर खुदाला तुम्हाला जन्नममध्ये पाठविण्यासाठी विनंती करते.' रेल्वेमध्ये भीक मागणारे वेगळेच. यांच्याकडे पास वा तिकीट असायचा नियमच नाहीय. बारकी पोरं–पोरीसुद्धा– 'हसता हुआ नूरानी चेहरा' किंवा, 'काले कव्वे से डरीओ!' ही गाणी म्हणत, नसलेले भाग हलवीत भीक मागतात. म्हातारे एकतारी बडवीत, 'हरी' हाका घालतात. लेकिन धंदा एकच–पैसा कमावणे.

पुण्याच्या स्टेशनसमोर असलेल्या जागेत तर भिकाऱ्यांचा एक फार मोठा अड्डाच आहे. तिथेच संसार उभे आहेत. चुली पेटविल्या जात आहेत. भीक मागून पैसा गोळा केला जातोय. रात्री नूरजहाँ किंवा बीबीजान सारख्या तरुण पोरी धंद्यालाही बसतायत. पोलीसचौकीही या ठिकाणापासून जेमतेम हाकेच्या अंतरावर आहे. पण धंदा मात्र जोरातच चालू आहे.

महाराष्ट्र सरकारतर्फे टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायसेन्स या संस्थेला भिकाऱ्यांच्या प्रश्नावर अभ्यास करण्याची विनंती करण्यात आली आहे. या संस्थेतच विद्यार्थी असताना मी स्वत: चेंबूरच्या बेगर्स होमला व्हिजीट दिली होती. नंतर नुकतेच जाऊन आलो. पण तिथल्या सोशल वर्कर्सच्या ओपिनियनमध्ये काहीच फरक पडला नाहीय.

भीक मागणे हा एक किफायतशीर धंदा झालाय. जोपर्यंत समाज भीक घालायला तयार आहे व जोपर्यंत तो ते पुण्यकर्म समजत आहे तोपर्यंत हा प्रश्न असाच भेडसावत राहणार.

भिकाऱ्यांना इतक्या सहजतेने पैसे मिळत असतात की कष्ट करून, घाम गाळून पैसे कमवावयास ते तयार नसतात. म्हणूनच असे सांगावेसे वाटते की, भिकाऱ्यांपेक्षा भीक घालणारेच जास्त मोठे गुन्हेगार आहेत.

यापुढे सांगतो की, आमच्या ह्या उदार जनतेकडे जेव्हा आम्ही ऑर्गनाईज्ड् चॅरिटीसाठी पैसे मागायला जातो तेव्हा साव्वे रुपयाचे तिकीट विकत घेणेही त्यांच्या जिवावर येते.

मुंबईत आता भिकारी दिसत नाहीत. बरेच धरणाच्या कामावर गेलेत, तर काहींना बेगर्स होममध्ये ठेवण्यात आलेय. काही लॉटरीची तिकीटे विकतायत. पण उद्या जर ही 'भिकारी हटाव' मोहीम संपली तर पुन्हा हेच आपली झोळी फैलावून पुन्हा उभे राहतील. यासाठी मागणी एकच–

–'भिकारी तो हटावही
परंतु–भीक घालणारेही हटाव.'

□ □

क्रीडांगण

डॉ. नरेंद्र दाभोलकर

## सोलापूर

# भुईर सुवर्ण चषक स्पर्धा

यंदाच्या अश्विनीकुमार भुईर सुवर्ण चषक स्पर्धा सोलापूरला पार पडल्या. मोठचा दिमाखात ! अनेक वैशिष्टचांसह ! एकाच स्पर्धेत विजेत्या संघाला मिळणारे दोन सुवर्ण चषक, बांगला देशाच्या संघाविरुद्ध कबड्डी कसोटीचा सामना खेळण्यासाठी होणाऱ्या भारतीय संघाची निवड ही त्यांतील दोन प्रमुख आकर्षणे.

कबड्डीचा आणि सोलापूरचा संबंध जवळचा आणि जिव्हाळ्याचा! गुणसंख्येने आणि गुणवत्तेनेही सोलापूरची कबड्डी वरच्या दर्जाची ! महाराष्ट्रातून राष्ट्रीय स्पर्धा गाजविणारे डझनभर खेळाडू तरी या शहराने दिले.

ज्यांच्या झंझावाती खेळाच्या आठवणींनी क्रीडारसिकांची मने अजून रोमांचित होतात ते यल्लाप्पा जेनुरे आणि बन्सी रोणे या गावातले. कबड्डीतील विलिंग्लडन समजला जाणारा भुईर सुवर्ण चषक मुंबईबाहेर नेण्याचा अभूतपूर्व पराक्रम करणारा हा एकमात्र जिल्हा ! आणि राजकारणातली सगळी पादत्राणे क्रीडांगणाबाहेर काढून ठेवून, सगळे राग, रंग, लोभ विसरून जावून, एकजुटीने कबड्डी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी झटणारी ही एकमेव महानगरपालिका आणि तिचे नगरपिते. पूर्वी सोलापूरात तीन स्पर्धा भरत. जय भवानी, भैय्या क्रीडा आणि बाली त्रेस मंडळाच्या. साऱ्यांनाच आर्थिक ताण आणि इतर ओढाताण. सोलापूरचे वैशिष्टच म्हणजे कबड्डीच्या मैदानावर गाजलेले अनेक खेळाडू निघाले ते थेट मेहेरबान म्हणून महानगरपालिकेतच गेले. अर्थात वेगवेगळचा पक्षातून. पण त्यांनी खेळात आपले राजकारण आणले नाही आणि सोलापूरात तीन स्पर्धांऐवजी एकच भव्य क्रीडासोहळा कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉलचा चालू केला. कबड्डी विजेतेपदासाठी सुरेख असा महापौर सुवर्ण चषक घडविला. गेल्या तीन वर्षांपासून या स्पर्धा दिमाखाने भरतात. यंदा योग थोडा वेगळा होता. राज्य असोसिएशन आयोजित करत असलेल्या भुईर सुवर्ण चषक स्पर्धा, दरवर्षी लाखाचे बजेट मुंबईत उभे करणे अवघड पडू लागल्याने प्रयोग म्हणून तीन वर्षे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात भरवावयाचे ठरले. त्यातही यंदा या सामन्यातच बांगला देशाच्या संघाबरोबर लढण्यासाठी भारतीय संघ निवडण्याचे ठरविले. ही सुवर्णसंधी सोलापूरने साधली. भुईर सुवर्ण चषकाबरोबरच महापौर सुवर्ण चषकाचेही सामने जाहीर करून एकाच स्पर्धेत दुप्पट सोने लुटण्याचा कांचनयोग खेळाडूंना प्राप्त करून दिला.

दरवर्षी या सामन्यात महाराष्ट्रातील अजिंक्यपदाच्या चाचणी स्पर्धेत, बाद स्पर्धेत प्रवेश करणारे आठ जिल्हे व भारतातील इतर निवडक सोळा संघ भाग घेतात. यंदा मात्र भारतीय संघाची निवड डोळ्यासमोर ठेवून परप्रांतातील संपूर्ण प्रांताचे प्रतिनिधीत्व करणारा संघच बोलावला होता. त्यामुळे टाटानगरच्या राष्ट्रीय स्पर्धेपेक्षाही ही राष्ट्रीय स्पर्धा अधिक कसदार बनली. (कारण टाटानगरला महाराष्ट्र राज्याचा एकच संघ उतरला होता. या वेळी महाराष्ट्रातील आठ जिल्हे उतरल्यामुळे महाराष्ट्रातील खेळाडूंना अधिक न्याय मिळाला. बाद पद्धतीच्या सामन्यात आठपैकी पाच जिल्ह्यांनी प्रवेश करून ही गुणवत्ता सार्थही केली.)

अ गटात हॅटट्रीकची जोद्द धरून उतरलेल्या मुंबई जिल्ह्याबरोबरच ठाणे जिल्हा, बिहार, आंध्र व हैद्राबाद हे इतर संघ होते.

मुंबई जिल्ह्याने सर्वांना सहजपणे हरवले खरे; पण ठाण्याच्या संघाने बराच काळपर्यंत मुंबईकरांच्या नाकात दम आणला होता. तीन खेळाडू आत असताना ठाण्याच्या कोळीने तारक राउळ आणि केशरीनाथ पवारच्या घेतलेल्या पकडी दीर्घकाळ लक्षात राहतील. हातात काळजीपूर्वक आघाडीचा गुण घेणे आणि प्रभावी क्षेत्ररक्षण व गरजेनुसार आक्रमक चढाई यांच्या आधारे तो सांभाळणे याचा मुंबईने सुयोग्य उपयोग केला. विभागीय उपविजेतेपद मिळवताना मात्र ठाणे जिल्ह्याला अनपेक्षितपणे बराच त्रास पडला. घिसडघाईच्या खेळामुळे ठाणेकर विहार राज्याकडून हरले. बिहार राज्य आंध्रकडून पराभूत झाले आणि आंध्र ठाण्याकडून. त्यामुळे गुण समान झाल्यावर पुन्हा बाद पद्धतीचे सामने खेळवण्यात आले. या वेळी मात्र ठाणेकरांनी चूक केली नाही.

ब गटात पुणे आणि जळगाव जिल्ह्याबरोबर होते कर्नाटक, दिल्ली आणि पंजाब. उत्तरेतली धुसमुसळी कबड्डी, महाराष्ट्रातील (मध्यभारतातील) शास्त्रशुद्ध सफाईदार कबड्डी आणि दक्षिणेतील आपल्या सुधारलेल्या दर्जाचा आणि पकडतंत्रावरील प्रभुत्वाचा साक्ष देणारा खेळ ! अशी भारतीय कबड्डीतील तीन रूपे या एकाच गटातील सामन्यात दिसून आली. महिन्यापूर्वीच झालेल्या टाटानगरच्या राष्ट्रीय स्पर्धेत विदर्भाशी खेळताना फाजील आक्रमकता आणि पश्चिम बंगालबरोबर आत्यंतिक बचाव आणि दोन्हीकडे पराभव, यामुळे शहाणा झालेल्या कर्नाटकाने विभागीय विजेतेपद मिळवताना कोणतीही चूक केली नाही. पंजाबच्या तगड्या जवानांना हरवताना त्यांनी आपल्या सांघिक बचावाचे सुरेख दर्शन दिले. पुणेकर मात्र खेळले, त्यांच्या नेहमीच्या धडाडीच्या आक्रमकतेने. ते तसे खेळले आणि त्यांना ते जाचलेदेखील. पण चुरशीच्या सामन्याने स्पर्धेची रंगत मात्र एकदम वाढली. खरे तर दिल्लीचा संघ टाटानगरइतका बलवान नव्हता पण पकडीच्या अनाकलनीय पद्धतीने पुणेकरांना त्यांनी तडाखेबंद लोण दिला. शास्त्रशुद्ध क्षेत्ररक्षणाविरुद्ध खेळण्याचा सराव नसलेल्या महाराष्ट्रीयन खेळाडूंना ही रांगडी अशास्त्रीय आक्रमकता नेहमीच धोक्याची वाटते. पंजाबबरोबर खेळतानाही हेच

पृष्ठ ३१ वर

# आज्ञांकित

श्री. मा. भावे

वरिष्ठांच्या आज्ञेचे पालन हे समाजरचनेतील महत्त्वाचे मूल्य आहे. एकत्र राहायचे म्हणजे शास्त्याची आवश्यकता भासते; आणि शास्ता म्हटला की त्याची आज्ञा आणि त्या आज्ञेचे पालन या गोष्टी आल्याच. आधुनिक समाजात 'मुक्तोऽथवा पशुः' या कोटीतील मनुष्य सोडल्यास प्रत्येकास शासनाच्या आज्ञांविषयी जागरूक राहावे लागते. बहुसंख्य हुकूम हे दैनंदिन स्वरूपाचे असल्याने त्याविषयी झगडा निर्माण होत नाही. परंतु काही हुकूम सदसद्विवेकाला न पटणारे असतात. अशा आज्ञांचे पालन माणसे का करतात, हा अभ्यसनीय प्रश्न आहे.

विवेक आणि अधिकारी व्यक्तीची आज्ञा यांतील झगडा सनातन आहे. परशुरामाने वडिलांच्या आज्ञेवरून आईला ठार मारले, हे याचे आपल्या पुराणातील उदाहरण. संपूर्ण गीतादेखील याच स्वरूपाच्या कल्लोळाचे समाधान करण्यासाठी लिहिली गेली. विवेकाच्या टोचणीविरुद्ध हुकुमाची अंमलबजावणी करावी की नाही, या प्रश्नावर प्लेटोनेही लिहिले आहे. सनातनी तत्त्वज्ञ नेहमीच असे सांगत आले की, समाजधारणेसाठी आज्ञापालन विवेकापेक्षा महत्त्वाचे आहे; तर मानवतावादी तत्त्वज्ञ व्यक्तीने विवेक तोडू नये असे ठासून सांगतात.

या तत्त्वचर्चेपेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा नैतिक प्रश्नांतून बहुसंख्य माणसे काय वाट काढतात ही आहे. हे तपासण्यासाठी स्टॅन्ले मिलग्रॅम या मानसशास्त्रज्ञाने निरनिराळ्या समाजातील माणसे घेऊन एक प्रयोग केला. प्रयोगाची पद्धत अशी: प्रयोगात माणसे तीन: विद्यार्थी, शिक्षक आणि शास्त्रज्ञ. (प्रत्यक्ष ही माणसे विद्यार्थी अगर शिक्षक होती असे नाही.) प्रयोगात शिक्षकाचे वर्तन तपासावयाचे. विद्यार्थी हा खोटा, म्हणजे एक नटच त्या कामासाठी निवडला होता. एका कागदावर शब्दांच्या जोड्या लिहिल्या होत्या. तो कागद विद्यार्थ्याने वाचल्यानंतर शिक्षकाने प्रत्येक जोडीतील पहिला शब्द विचारायचा. विद्यार्थ्याने जोडीतील दुसरा शब्द सांगण्याचा प्रयत्न करायचा.

विद्यार्थी चुकला, तर शिक्षकाने शिक्षा म्हणून त्याला विजेचा झटका द्यायचा. त्यासाठी निरनिराळे दाब दाखविणारी स्विचेस ठेवली होती. त्यांचे दाब १५ पासून ४५० व्होल्ट्सपर्यंत होते. झटका बसला की विद्यार्थी किंचाळे आणि 'आता बस्स झाले, मला सोडा,' अशी विनवणी करी. अशा विनवणीला न जुमानता, शास्त्रज्ञाच्या आज्ञेवरून शिक्षक झटके देत कुठपर्यंत जातो याची पाहणी प्रयोगात करावयाची होती. अर्थात, प्रयोगातील झटके खोटे होते; पण शिक्षकाला ते माहीत नसे. शिक्षकाचा विश्वास बसावा म्हणून प्रयोग सुरू होण्यापूर्वी त्याला एक बारकासा खरा झटका देऊन त्याची खात्री पटवीत.

प्रयोग करण्यापूर्वी प्रयोगातून काय निष्पन्न होईल याविषयी अनेक व्यक्तींचे अंदाज मिलग्रॅम यांनी मागविले होते. त्यांत सामान्य माणसे, प्राध्यापक, मनोवैज्ञानिक आणि विद्यार्थी यांचा समावेश होता. त्या सर्वांनी सांगितले की, १५० व्होल्टच्या झटक्याने विद्यार्थी किंचाळला की शिक्षक प्रयोग सोडून देईल आणि शास्त्रज्ञाचा हुकूम जुमानणार नाही. फक्त चार टक्के लोक ३०० व्होल्टपेक्षा जास्त दाबाचे झटके देतील; आणि हजारात एखादाच जास्तीत जास्त दाबाच्या स्विचचा उपयोग करील.

पण प्रत्यक्ष प्रयोगाने हे सर्वच अंदाज चुकीचे ठरविले. पहिल्या प्रयोगात ४० पैकी २५ जणांनी शेवटपर्यंत भाग घेऊन अगदी ४५० व्होल्टचे धक्केदेखील दिले. त्यानंतर या प्रयोगाच्या अनेक आवृत्त्या झाल्या. पण आज्ञाधारक व्यक्तींचे प्रमाण साठ टक्क्यांपेक्षा कधीच खाली आले नाही. म्यूनिकमध्ये तर हे प्रमाण पासष्ट टक्के इतके मोठे होते.

## छळवादी प्रवृत्ती

अंदाज आणि प्रत्यक्ष यांच्यातील या तफावतीचा उलगडा कसा करावयाचा ? एक मत असे की, प्रत्येक मनुष्याला दुसऱ्याचा छळ करावासा वाटतोच. या प्रयोगात त्या वृत्तीला वाट मिळाली. एखाद्या माणसाला दुसऱ्या मनुष्यावर पूर्ण अधिकार गाजविण्याची मुभा दिली, दुसऱ्या माणसाचा कोणताही छळ करण्याची परवानगी दिली तर पहिल्या माणसाच्या मनातील छळवादी प्रवृत्ती जाग्या होतात आणि तो जनावरासारखा वागतो. या प्रयोगात हेच झाले. विद्यार्थ्याचा पूर्ण छळ करण्याची शिक्षकाला संधी मिळाली, इतकेच नाही तर त्यात काही वावगे नाही असा दिलासाही मिळाला. त्याचा पुरा फायदा शिक्षकाने घेतला.

या मताचा खरेपणा तपासण्यासाठी वरचाच प्रयोग थोडा बदल करून करण्यात आला. बदल असा की, किती दाबाचा झटका द्यायचा हे शिक्षकावर सोपविण्यात आले. पण त्याचबरोबर शिक्षकाला असे पुनः पुनः सांगितले की, कितीही दाबाचा झटका त्याने दिला, तरी हरकत नाही. त्यावेळी असे दिसून आले की, १५० व्होल्टपेक्षा जास्त दाबाचे झटके पाच टक्के लोकांनीसुद्धा दिले नाहीत; आणि बहुतेकांनी विद्यार्थ्याला अजीबात त्रास होणार नाही इतक्या सौम्य झटक्यांचाच उपयोग केला.

यावरून ही गोष्ट सिद्ध झाली की, छळवादी वृत्तींचा प्रभाव दुर्लक्षणीय असून आज्ञापालनाची प्रवृत्ती हीच महत्त्वाची आहे. दुसऱ्याला स्वतःहून त्रास न देणारी माणसे जर कुणाची आज्ञा असेल तर जनावरासारखी वागू शकतात; आपल्या कृतीचे परिणाम दिसत असूनही अगदी टोकाला जाऊन दुसऱ्याचा छळ करतात आणि नीती, विवेक यांची पर्वा न करता हुकुमाची अंमलबजावणी करतात. आज्ञा झुगारण्याचे आंतरिक सामर्थ्य फारच थोड्यांच्या ठिकाणी असते.

## माणसे हुकूम का पाळतात ?

विवेकाला न पटणाऱ्या आज्ञा माणसे का पाळतात याचे एक साधे कारण भिडस्तपणा हे आहे. अधिकारी व्यक्तीच्या तोंडावर 'मी तुझी आज्ञा पाळणार नाही' हे सांगणे शिष्टाचाराला धरून वाटत नाही. वरील प्रयोगात आणखी एक बदल केला, तेव्हा हे उघड झाले. तो बदल म्हणजे शास्त्रज्ञाने प्रयोगाच्या ठिकाणी स्वतः हजर न राहता फोनवरून सूचना द्यायच्या. हा बदल केल्यावर असे दिसून आले की, सुरुवातीच्या

प्रयोगात साठ टक्के शिक्षक शेवटपर्यंत झटके देत असत, ते प्रमाण वीस टक्क्यांवर आले. ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे की, अधिकारी व्यक्तीची भीड शिक्षकाला पडली पण विद्यार्थ्याला जाचणारा छळ त्याच्यावर परिणाम करू शकला नाही.

आज्ञांकितपणाचे दुसरे कारण असे की, आपल्या हातून घडणाऱ्या गोष्टींची जबाबदारी आपली नसून अधिकाऱ्यांची आहे, अशी आज्ञांकिताची समजूत असते. नीतीची जाणीव नाहीशी होत नाही, पण नैतिक गुन्ह्याची जबाबदारी आपली नाही अशी सुखद समजूत करून घेतली जाते. स्वामिनिष्ठा, कर्तव्य, शिस्त अशी गोंडस नावे आज्ञापालनाला दिली जातात.

जर विवेकाची टोचणी चालूच राहिली, तर निराळ्या सबबी सांगितल्या जातात. उदाहरणार्थ, वरील प्रयोगांतील कित्येक शिक्षक स्विचेस दाबल्या–न दाबल्यासारखे करीत. आपण कसे चांगले आहोत, हुकूम पाळतानाही आपण माणुसकी सोडलेली नाही, हे दाखविण्याची खटपट त्यात होती. कित्येकजण शास्त्रज्ञांशी थोडी घासाघीसही करीत. पण त्यात शास्त्रज्ञांचे हुकूम झुगारण्याचा हेतू नसून, आपल्या विवेकाला गोंजारण्याचाच असे. कारण अशा शिक्षकांनी झटके देण्याचे थांबविले, असे होत नसे. काहीजणांच्या बाबतीत असेही झाले की, प्रयोगाच्या तंत्रातच ते इतके गुरफटून गेले की, आपण काय करतो आहो याचे भानही त्या शिक्षकांना उरले नाही.

## अधिकार आणि अधिकारी

आज्ञापालन करीत असता घडणाऱ्या वाईट गोष्टींची जबाबदारी आपली नसून आज्ञा देणाऱ्याची म्हणजेच अधिकाऱ्याची आहे, ही जाणीव आज्ञापालनात महत्त्वाची आहे, हे आपण पाहिले. अधिकाराचा हा प्रभाव कशावर अवलंबून असतो याचीही थोडी छाननी वरील प्रयोगांत मिलग्रॅम यांनी केली. अधिकारी व्यक्ती प्रत्यक्ष हजर असली तर हुकुमाची तामिली होण्याचे प्रमाण जास्त असते. दोन अधिकारी व्यक्ती विरुद्ध आज्ञा देत असतील, तर आज्ञापालन होत नाही. त्याचप्रमाणे आपल्याबरोबरची माणसे हुकूम पाळत नाहीत असे दिसले तर अधिकार झुगारण्यास प्रोत्साहन मिळते.

या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, वर सांगितलेल्या प्रयोगात शास्त्रज्ञाचा अधिकार अगदीच तकलादू होता. बक्षीस देणे किंवा शिक्षा करणे यांपैकी काहीच त्याच्या अधिकारात नव्हते. सैनिकी अधिकारी किंवा मालक किंवा शिक्षक यांना सैनिक, नोकर आणि विद्यार्थी यांच्यावर जसा अधिकार गाजविता येतो तसा अधिकार येथे शास्त्रज्ञाला नव्हता. तरीही आज्ञापालनाचे प्रमाण साठ टक्के होते. म्हणजे बक्षिसी किंवा शिक्षा यांच्यापेक्षा आज्ञा पाळण्याची वृत्ती हीच महत्त्वाची आहे, असे दिसते.

आज्ञापालन ही क्रिया केवळ मानसशास्त्राने अभ्यासता येईल अशी नाही. ज्या समाजात मनुष्य राहतो, तो समाज व्यक्तीवर आज्ञापालनाचे संस्कार करीत असतो. ते अपरिहार्य आहे. कचेरीत, कारखान्यात किंवा सैन्यात कामे व्हावयाची असतील, तर प्रत्येकाला स्वतःचे मत बाजूला ठेवून दुसऱ्याची आज्ञा मानावीच लागणार. दुसरे असे की, आधुनिक समाजात प्रत्येक व्यक्ती काही विशिष्ट काम करीत असते. त्यामुळे तिला संपूर्ण परिस्थितीचा आवाका येण्याचा संभव कमी असतो. वरून आलेल्या आज्ञेचे पालन आपण केले, त्याचे परिणाम काय झाले हे कळण्याची शक्यताही नसते.

## राजकीय सत्ता

नाझी राजवटीत ज्यू लोकांवर अनेक अत्याचार झाले. त्यांच्यासाठी शिरकाण–छावण्या उघडण्यात आल्या. विषारी वायूने भरलेल्या कोठडीत अनेकांना फेकून देण्यात आले. हे सर्व करणारी सगळी माणसे काय नरभक्षक होती? शिरकाण–छावणीतील प्रत्येक अधिकाऱ्याकडे एकूण सर्व नृशंसकर्माचा इतका थोडा भाग सोपविलेला असे, की आपण पाळलेल्या हुकुमातून निष्पन्न झालेल्या मनुष्यहत्येची आपल्यावर जबाबदारी येते, असे कोणासच वाटत नसे.

पण या पराकाष्ठेच्या गोष्टी सोडून देऊ. नेहमीच्या व्यवहारातील गोष्टी घेतल्या, तरी वरील प्रयोगाचे निष्कर्ष महत्त्वाचे ठरतात. आज्ञापालनात तात्त्विक किंवा नीतीविषयक भूमिका दुय्यम महत्त्वाची असते. प्रयोगांतील शिक्षकांना आपण विद्यार्थ्याला झटके देण्यात वावगे वागत आहोत, हे पूर्णपणे पटलेले होते. असे आपण वागता कामा नये, असा निश्चयही ते करीत होते. फक्त तो निश्चय प्रत्यक्षात येत नव्हता. जुलमी राजवट राबवायला जुलमीच माणसे लागतात असे नाही. साधारण माणसेसुद्धा जुलमी राजवट सामावून घेऊ शकतात.

दुष्ट व क्रूर अशा आज्ञादेखील माणसे बिनतक्रार मानतात, हा निष्कर्ष निश्चितच अस्वस्थ करणारा आहे. मग यावर इलाज काय? आपण समाजात वाढतो, त्याचे संस्कार पचवतो आणि कळसूत्री बाहुली बनतो. पण असे असले, तरी आपण जाणीव असणारी बाहुली आहोत, या जाणिवेतच आपल्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. आज्ञा पाळणे हे समाजधारणेला आवश्यक असले तरी त्यामुळे स्वतंत्र नागरिक म्हणून आपणावर असलेली जबाबदारी कमी होत नाही. उलट, अधिकारावर येणाऱ्या व्यक्ती मानवतावादी आहेत किंवा नाहीत हे अधिक खोलवर तपासण्याची आपली जबाबदारी वाढते. आजपर्यंत राजकीय सत्तांचे विविध प्रकार वापरून झाले आहेत. आणखी काही व्यवस्था शोधता येणार नाहीत असे नाही. सदसद्विवेकाची जरब सत्ताधाऱ्यांना वाटेल अशी एखादी व्यवस्था शोधून काढता येईलही. मानवी प्रज्ञा कुंठित करण्याची कुपी अजून कोणाजवळही नाही. [आधारित]

पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# कहानच्या लेखणीचा एकाकी लढा

प्रत्येक वृत्तपत्रात काम करणाऱ्या पत्रकाराला अनेक बऱ्या–वाईट धमक्यांना तोंड द्यावे लागते.

परंतु दक्षिण अमेरिकेतील बऱ्याच देशात सध्या अतिरेकी मारेकऱ्याचे लक्ष्य पत्रकार बनला आहे. निर्भिडपणे आपली मते मांडणाऱ्या पत्रकाराला धमक्या आणि छळाला तोंड द्यावे लागत आहे.

ब्यूनॉस आयर्स येथील उजव्या विचारसरणीच्या एका नियतकालिकात संपादकीय पानावर एक पत्र प्रसिद्ध झाले. त्यात म्हटले होते–

महाशय, शाईशी खेळणाऱ्या माणसाला म्हणावं, तुला आता बंदुकीच्या गोळीशी खेळावं लागणार आहे. तयार राहा–एल् कॉडिलो, ब्यूनॉस आयर्स.

या पत्राचा खरा अर्थ फक्त एकाच व्यक्तीला कळाला. कारण त्याला मिळालेली ती खुनाची धमकी होती. ब्यूनॉस आयर्स येथून निघणाऱ्या 'ला ओपिनिआँ 'या डाव्या विचारसरणीच्या दैनिकातील राजकीय प्रतिनिधी हेरिबर्तो कहान याला उद्देशून ते पत्र होते. 'अर्जेंटाईन अँटी कम्युनिस्ट अलायन्स' या 'ट्रिपल ए' म्हणून प्रसिद्ध असलेल्या उजव्या अतिरेकी संघटनेने दिलेली ही खुनाची धमकी होती.

हेरिबर्तो याचा गुन्हा काय तर त्याने एक लेखमाला लिहिली, त्यात इसाबेल पेराँ यांच्या मंत्रिमंडळातील ( सध्या काढून टाकलेले ) जोस रेगा यांचे व 'ट्रिपल ए' संघटनेचे गुप्त राजकीय संबंध त्याने उघडे केले. त्याचे परिणाम आता हेरिबर्तो याला भोगावे लागत आहेत.

त्याच्यापुढे तीन पर्याय सध्या आहेत. एक म्हणजे धमकीकडे दुर्लक्ष करणे, दुसरा देश सोडून पळून जाणे व तिसरा मार्ग म्हणजे धमकीला वृत्तपत्रातच जाहीर उत्तर देणे.

देश सोडून जाण्याचा आग्रह त्याच्या कुटुंबियांनी त्याला केलेला आहे, परंतु त्याने तिसरा मार्ग स्वीकारला आहे. त्याने एक निवेदन काढले असून ते प्रसिद्ध केले आहे. त्यात तो म्हणतो, 'मला, माझ्या पत्नीला किंवा माझ्या एक वर्षे वयाच्या मुलीला काही दगाफटका झाल्यास त्याची जबाबदारी पेरॉनिस्ट संघटनेचा पाठिंबा असलेल्या एल् कॉडिलो व सरकार यांच्यावर राहील.'

हेरिबर्तो याचा हा एकाकी लढा म्हणजे लेखणीच्या साहाय्याने बंदुकीशी लढण्यातीलच एक प्रकार आहे. त्याला शरीररक्षक नाहीत. तो एकटादुकटा ब्युनॉस आयर्सच्या रस्त्यावरून फिरत असतो. त्याच्याच 'ल ओपिनिआँ' वृत्तपत्रातील वार्ताहर जॉर्ज मनी याला अशीच धमकी मिळाली होती. त्यानंतर तो बेपत्ता झाला व दोन दिवसांनी रस्त्यावर त्याचे प्रेत सापडले होते.

जे अर्जेंटिनात तेच चिलीत. दक्षिण अमेरिकेत निर्भीड पत्रकारांना जीवावर उदार होऊन काम करावे लागते. मग ते उजव्या विचारसरणीचे असोत किंवा डाव्या. कारण दोन्ही विचारसरणींचे अतिरेकी मारेकरी गट तयार आहेत. तुम्ही थोडं वेगळं, स्पष्ट लिहिलंत की, ठार मारण्याची धमकी आलीच म्हणून समजा.

चिलीतील मार्सिया कॅटलबरीचा झालेला छळ अमानुष आहे. तीस वर्षे वयाची ही पूर्वाश्रमीची रूपसुंदरी एक निर्भीड पत्रकार आहे. लष्करी सरकारविरुद्ध तिने थोडी टीका केली. झाले, तिला तावडतोब अटक. त्यानंतर तिचे काय झाले कुणालाच कळले नाही. नुकतीच ती बाहेर आढळून आली आहे. पण तिचा स्मृतिभ्रंश झाल्याचे तिच्या जवळच्या मित्रांना आढळून आले आहे.

तुरुंगात तिचा अमानुष छळ झाला. तिने माफीपत्र लिहून देण्यास नकार दिला. त्याचा परिणाम अमानुष हाल. सध्या तिच्या डोक्यावरचे केस निम्मे गळाले असून धड जेवण करता येणे कठीण झाले आहे. चिलीतील गुप्त पोलीसखात्याचा शॉर्टफॉर्म आहे 'डिना' ( D. I. N. A. ). या गुप्त पोलिसांनीच ग्लॅडी डिझा या पत्रकाराचा खूप छळ केला.

परागवे व उरुग्वे येथील पत्रकारांना नेहमी मारहाण होते. कधीकधी तुरुंगात रवानगी. ग्वाटेमाला येथील परिस्थिती अतिशय भयंकर आहे. या वर्षी तेथील बऱ्याच पत्रकारांचे खून झाले. ब्राझील येथील पत्रकारांची घरे रात्री-बेरात्री ठोठावली जातात. त्यांना तपासणीसाठी बाहेर काढलं जातं. त्यात मारहाण, शॉक देणे व टबमध्ये बुडविणे या प्रकारांचाही समावेश असतो. दक्षिण अमेरिकेत पत्रकार हेच हल्लेखोरांचे लक्ष्य बनलेले आहेत. परंतु या वर्षी अत्याचाराचा कहरच झाला आहे, असे ब्यूनॉस आयर्समधील एका प्रकाशकाचे मत.

अर्जेंटिनातील परिस्थिती सर्वांत वाईट आहे. तेथे या वर्षी ६२० राजकीय खून झाले. एका महिला पाक्षिकात फॅशनवर लिहिणाऱ्या अॅना बासुआल्डो हिला एकाएकी पळविण्यात आले. तिच्यावर पिस्तुल रोखून मारेकऱ्यांतील एक म्हणाला, 'पत्रकार हे देशद्रोही, कम्युनिस्ट किंवा ज्यू असतात.' अॅना सुदैवाने बचावली व स्पेनमध्ये सुखरूप पोहोचली.

फक्त डाव्या विचारसरणीच्या पत्रकारांना अतिरेकी उजव्या गटाची भीती आहे असे नाही. डेव्हिड कॅसेलबर्ड या उजव्या विचारसरणीच्या संपादकाला रस्त्यावरून उचलून नेण्यात आले व गोळी घालण्यात आली.

इंटर अमेरिकन प्रेस असोसिएशनच्या साओ पाऊलो येथील परिषदेत दक्षिण अमेरिकेतील दहा राष्ट्रांत वृत्तपत्र-स्वातंत्र्य नसल्याचे जाहीर करण्यात आले. असे असले तरी दक्षिण अमेरिकेतील पत्रकारांनी एकतंत्री राजवटीविरुद्ध निकराची झुंज वेळप्रसंगी आपला जीव धोक्यात घालून चालू ठेवल्याचेही या परिषदेत नमूद करण्यात आले आहे. ◻

## ◻ आणि हे दुसरे चित्र

खळबळजनक बातम्या मिळविण्यासाठी अमेरिकन पत्रकारांची सतत धडपड चालू असते. त्यासाठी वाटेल ते धाडस स्वीकारण्याची त्यांची तयारी असते. निरनिराळ्या रेडिओ, टी. व्ही., वृत्तसंस्था त्यावर अमाप पैसा खर्च करतात.

पृष्ठ १८ वर

# फ्रीडम ॲट मिडनाईट : एक आव्हान

लेखांक पहिला । गोपाळ गोडसे

: १ :

लॅरी कॉलिन्स आणि डॉमिनिक लेपियर या दोन लेखकांनी फ्रीडम ॲट मिडनाईट हे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यकालावर पुस्तक लिहिले आहे. हे लेखक दीक्षित इतिहासज्ञ ( क्वालिफाईड हिस्टोरिअन्स ) आहेत असा त्यांनी स्वतःचा समज करून घेतला आहे. आणि लोकांनी त्यांना तसे समजावे असाही त्यांचा आग्रह आहे.

इतिहासज्ञाला ऐतिहासिक घटनांशी प्रामाणिकपणा ठेवावा लागतो. पूर्वग्रहाने पछाडलेला माणूस इतिहासज्ञ होऊच शकत नाही. त्याला जसे वाटते तसा इतिहास नसला म्हणजे तो स्वतःचे ग्रह ऐतिहासिक म्हणून वाचकांच्या माथी मारतो. थोडक्यात म्हणजे तो घटनांचे विकृतिकरण करतो आणि आपण खरे तेच सांगत आहोत, असा आभास निर्माण करतो. काही तरी निंदानालस्तीजनक आणि खळबळजनक लिहावे, म्हणजे समाजात वाद निर्माण होईल, त्यायोगे आपला 'इतिहास' ग्रंथ खपेल ही दृष्टी ठेवणारा माणूस इतिहासज्ञ नसतो.

या तात्त्विक चर्चेचे वाचकांना खरे म्हणजे काही प्रयोजन नाही. पण फ्रीडम ॲट मिडनाईटच्या लेखकांनी तो प्रसंग आणला आहे. त्यांनी एक आव्हान दिले आहे. 'आम्ही म्हणतो तसाच इतिहास घडला आहे !' त्यामुळे त्यांच्या त्या तथाकथित इतिहासाची आणि मेंदूची चिरफाड करण्याचे काम कुणाला तरी करावेच लागणार ! माझा अधिकार आहे तेवढ्या कक्षेतील शवच्छेदन मी करणार आहे.

पुस्तकाच्या पृष्ठ ४३८ ते ४३९ च्या मधल्या पानावर काही छायाचित्रे आहेत. त्यांत गांधीहत्या अभियोगातील आरोपींचे एक समूहचित्र आहे. या समूहचित्रासोबतचा उल्लेख असा आहे, 'महाविद्यालयाच्या संवाद मंडळाने वार्षिक अंकात देण्यासाठी छायाचित्रासाठी बसावे तसे गांधींचे मारेकरी आपल्या अभियोगापूर्वी बसले आहेत.'

खोडसाळ समूहचित्र



छायाचित्रात पुढची ओळ डावीकडून उजवीकडे–१ : नारायण आपटे, २ : स्वातंत्र्यवीर सावरकर, ३ : नथूराम गोडसे ४ : विष्णू करकरे, ५ : दिगंबर बडगे.

मागची ओळ–६ : शंकर किस्तैय्या, ७ : गोपाळ गोडसे, ८ : मदनलाल पाहवा.

यात डॉ. परचुरे दिसत नाहीत. तेही आरोपी होते.

गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव, सूर्यदेव शर्मा हे आणखी तीन आरोपीही नाहीत.

कटात गोवलेले सर्वच मारेकरी असले आणि त्यांनी स्वतःचे चित्र काढून घेण्याचा प्रपंच केला असला, तर भूमिगत व्यक्तींसकट छायाचित्र घेण्याला काहीच प्रत्यवाय नव्हता. मग हे चित्र खरे का ? की व्यक्तींची सुटी चित्रे गोळा करून एकत्र छायाचित्र सिद्ध करण्याची एक क्रिया असते, तशा क्रियेने हे समूहचित्र बनविले आहे ?

चित्र खरे आहे !

आम्ही काही अभियुक्त तेव्हा मुंबई आरक्षी आयुक्तांच्या कार्यालयात ठेवले गेलो होतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांना आर्थर रोड बंदिगृहात ठेवले होते. दि. ११-३-४८ ला त्यांना गांधीवध अभियोगातील एक आरोपी म्हणून गोवले होते.

दि. ११ मे १९४८ ला आरक्षींनी स्वा. सावरकर यांना आयुक्तांच्या कार्यालयात आणले आणि एका खोलीत ठेवले. आम्हा इतर आरोपींना थोडयाच वेळात त्या खोलीत नेले. ती छायाचित्रणाची खोली होती.

तेथे काही खुर्च्या मांडल्या होत्या. त्यांतील एका खुर्चीवर स्वा. सावरकर बसलेले आम्ही पाहिले.

आरक्षींनी काही क्रम ठरविला होता. त्या क्रमाप्रमाणे त्यांनी आम्हा आरोपींना बसविले किंवा उभे केले. छायाचित्र घेतले. ते 'हे' छायाचित्र आहे ! डॉ. परचुरे ग्वाल्हेरच्या किल्ल्यात बंद होते. त्यांना छायाचित्रासाठी मुंबईस आणले नव्हते. त्यामुळे त्यांचे चित्र या समूहचित्रात नाही. आणखी तीन आरोपी भूमिगत म्हणून अनुपलब्ध होते. त्यांना आणण्याचा प्रश्नच नव्हता.

या छायाचित्राविषयी आपल्या विधिज्ञ-जवळ बोलण्याची संधी सावरकरांना तीन दिवसांनी मिळाली. कै. श्री. शि. वि. देवधर त्यांना १४-५-४८ ला आर्थर रोड बंदिगृहात भेटण्यास गेले होते. दि. १८-५-४८ ला स्वा. सावरकरांनी एक प्रतिज्ञा-पत्र चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट यांना प्रस्तुत केले. त्यात त्यांनी म्हटले आहे, 'गांधी अभियोगात संशयित म्हणून जे धरले आहेत त्यांच्यासमवेत मला बसवून आमचे समूहचित्र काढले गेले. या छायाचित्राचा माझ्याविरुद्ध पुरावा बनविण्यासाठी दुरुपयोग केला जाईल अशी मला शंका आहे. न्यायाधीशांनी ती छायाचित्रे, त्यांच्या मूळ प्रती आपल्या स्वाधीन घ्याव्यात.' ( मुद्रित अभिलेख प्रमाण डी १८, पृष्ठ ७.)

अभियोग उभा राहिल्यावर नगरवाला आरक्षी उपायुक्त यांची साक्ष झाली. त्यात त्यांनी स्पष्टीकरण दिले की, भारतीय दंड विधानाच्या अमुक धारेखाली (सेक्शनखाली) कोणाला पकडले असेल तर छायाचित्रे घेऊन ठेवण्याचा नियम आहे. या छायाचित्रांनी अभियुक्तांचा परस्पर संबंध दाखविण्याचा हेतू नव्हता.

आरोपीच्या पक्षाने ते स्पष्टीकरण स्वीकारले. न्यायाधीश श्री. आत्मचरण यांनीही ते स्वीकारले. त्याप्रमाणे इतर पुराव्यांवरून जे दोषी ठरले त्यांना त्यांनी शिक्षा दिल्या. ज्यांच्याविरुद्ध पुरावा नव्हता त्यांना सोडून दिले.

स्पष्टीकरण स्वीकारले नाही ते केवळ फ्रीडम अॅट मिडनाईटच्या लेखकद्वयाने. हे छायाचित्र कोठले, म्हणजे कोणत्या वेळी काढलेले, याचे काही विवेचन न देता, छायाचित्रातील व्यक्तींनी ते स्वतःच काढून घेतले आहे, असा आभास त्यांनी निर्माण केला आहे. इतिहासातील काही घटना न बोलल्या तरीही इतिहासाचे विकृतिकरण होते, त्याचे हे उदाहरण आहे. पण लेखकद्वयाचा विकृतिकरण हाच हेतू असल्याने त्यांनी हेतुपुरःसर हा क्षुद्र भाव दाखविला आहे. न्यायालयाने स्वा. सावरकर यांना निर्दोष म्हणून सोडून दिले. तसेच छायाचित्रात दिसत असलेल्या शंकर किस्तैयाला उच्च न्यायालयाने सोडून दिले. लेखकांना हे ठाऊक आहे, तरीही चित्रातील व्यक्तींना त्यांनी गांधींचे मारेकरी म्हटले आहे.

लेखकांनी गांधीजींना एवढ्या संदर्भापुरते उंचीवर नेऊन ठेवण्याचा आटापिटा केला आहे. त्यासाठी एक साधन त्यांनी वापरले आहे; ते म्हणजे विरोधकांचे चारित्र्यहनन. विरोधकांना निंदेच्या तळघरात नेऊन कोंबले की गांधी तितक्या फुटाने अधिक उंच दिसतील हे त्यांचे गणित !

## : २ :

फ्रीडम अॅट मिडनाईटच्या लेखकांनी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे चार वर्षे अविश्रांत श्रम घेतले. बाराशेवर लेखकांशी चर्चा केली. तीस लक्ष रुपये (तीन लक्ष डॉलर्स) व्यय केले आणि हा ग्रंथ पुढे टाकला. त्यांनी १-१-१९४७ ते ३०-१-१९४८ हा कालखंड निवडला आहे.

इतिहास म्हणून काही लिखाण पुढे टाकले तर ते सप्रमाण असावे, हा इतिहासज्ञाचा हेतू असतो. जो कालखंड लेखकांनी निवडला आहे, त्या कालखंडातील ऐतिहासिक व्यक्तींची आणि घटनांची व्याप्ती मोठी असल्याने आणि लेखक परदेशी असल्याने त्यांना अशा भेटीगाठीतून साहित्य मिळविणे आणि त्या साहित्याचा खरेपणा पडताळून पाहणे हाच उपाय होता.

पण इतके करूनही या जोडगोळीला 'इतिहास' लिहिता आला नाही. सावरकर या विषयाच्या परिघात तसेच गांधीवध या विषयाच्या परिघात त्यांनी ज्या काही गाठीभेटी घेतल्या त्यात त्यांना नथुराम आणि सावरकर यांच्याविषयी कोणी अनुदार उद्गार दिले नाहीत. चारित्र्यहनन करणाऱ्या भंगड कथा पुरविणे तर दूरच !

नाना आपटे यांचा कोठे काही स्त्रियांशी संबंध आला असेल तर ते कधी तोंडावर तिरका हात ठेवून 'नाही नाही' असे बोलले नाहीत. वैयक्तिक चरित्रातील काही घटनांचेच ज्यांना महत्त्व वाटते, काही तरी सापडले सापडले असा साक्षात्कार होतो, अशा तथाकथित वास्तववादी लेखकांना त्यांनी सुखेनैव लिंगाभोवती पिंगा घालू दिला. आजही नाना आपटे असते तर असल्या गोष्टी लिहिल्या म्हणून त्यांनी त्याविरुद्ध ओरड केली नसती.

फ्रीडम अॅट मिडनाईटच्या लेखकांना त्यातील थोडी फार माहिती मिळाली. समजा त्याचे त्यांनी वृद्धिकरण केले तर, एक तर अतिशयोक्तीचा भाषालंकार म्हणून क्षम्य असेल किंवा लेखकांना कुठे घोटाळण्यात आनंद वाटतो याचे दर्शन होऊन त्यांची पातळी कळेल.

पण सावरकर आणि नथुराम यांच्यासंबंधी कोठेच काही ऐकिवात आले नाही. नथुरामने स्वतःच्या चारित्र्याचा कधी बडेजाव केला नाही की त्या भांडवलावर प्रतिष्ठा मिळविली नाही. ब्रह्मचर्यावर भाष्ये केली नाहीत, की माझा आदर्श पुढे ठेवा असा अहंकार मांडला नाही. पण तो चारित्र्यशुद्ध माणूस होता हे त्याला ओळखणारे त्याचे विरोधकही जाणतात.

न्यायालयाने बडगेचा पुरावा सावरकरांच्या संबंधात अग्राह्य मानून फेकून दिला. स्वतःच न्यायपीठावर आहोत असे मानणाऱ्या ह्या तथाकथित इतिहासज्ञांनी बडगेचा पुरावा ग्राह्य धरला आणि सावरकरांना गांधीवधाच्या प्रमुख सूत्रधारांत समाविष्ट केले. पण तेवढ्याने त्या लेखकांचे समाधान झाले नाही. सावरकरांना खाली खेचणारा 'इतिहास' लिहिलाच पाहिजे ! सावरकर आणि नथूराम यांच्याविषयी काही चारित्र्यहीनतेची माहिती तर हाताला लागत नाही; मग या जोडगोळीने त्यांच्या हाताशी असलेली मापनपट्टी घेतली. ती त्यांनी सावरकर आणि नथूराम यांच्या चारित्र्याला लावली ! जमले ! यात एका फटक्यात आपल्याला अप्रिय असलेले दोन पक्षी मरतील असे त्यांना वाटले. आजपर्यंत कोणी न हाताळलेला लिंगविषय आपण लोकांपर्यंत प्रथमच पोहोचवू शकू ! दोघेही दुष्कीर्ती होतील आणि एकीकडे त्यांच्या चारित्र्याची जेवढी दुष्कीर्ती होईल तितकीच गांधीजींच्या चारित्र्याची महती वाढेल !

लेखकद्वयाच्या अशा भंगड तर्कटातून निघालेले हे संशोधन ! म्हणून त्यांनी हे 'संशोधन' वाचकांच्या माथी मारले आहे. आरोपींचे जे समूहचित्र दिले आहे, त्यांत सावरकरांचे वर्णन या जोडगोळीने केले आहे- 'समलिंगभोगी !'

सावरकरांवर त्यांच्या कार्यासाठी, तत्त्वज्ञानासाठी श्रद्धा असलेला कोणीही उठून लेखकाचे, तो जेथे दिसेल तेथे थोबाड रंगवेल. या लेखकद्वयांपैकी एकाला–लेपियरला–दिल्लीच्या त्याच्या वार्तापरिषदेत एका पत्रकाराच्या प्रश्नाच्या धारेवरून त्याची काहीशी कल्पना आली असावी. डॉमिनिकने उत्तर दिले, गोपाळ गोडसे याच्याशी झालेल्या अनेक दिवसांच्या बोलण्यातून ही घृणास्पद गोष्ट त्याला कळली !

प्रश्न विचारणारा स्तिमित झाला असेल; कष्टी झाला असेल. 'काय ऐकतो आहे मी हे !' असेही त्याला वाटले असेल.

'गांधीहत्या आणि मी' या माझ्या पुस्तकाने मी लोकांना अधिक परिचित झालो. पुस्तकाची हिंदी, कानडी भाषांत भाषांतरे झाल्याने आणि मल्याळम् आणि उडिया भाषेत काही लेख प्रसिद्ध झाल्याने परिचयाची व्याप्ती वाढली. कोणत्याही प्रांतात गेलो आणि व्यक्तिगत परिचय झाला की पुस्तकाचा उल्लेख मधून मधून होत असतो.

पंचावन्न कोटींचे बळी या पुस्तकात नथूराम यांचे न्यायालयीन वक्तव्य समाविष्ट आहे. इतर भाग मी लिहिलेला आहे. त्याही पुस्तकाची वरीलप्रमाणेच भाषांतरे झाल्याने त्या माध्यमातूनही मी लोकांना परिचित आहे.

माझ्या स्वतःच्या नथूरामविषयी भावना काय आहेत, सावरकरांविषयी काय आहेत यांची कल्पना वाचकांना माझ्या पुस्तकांतून आलेली आहे. जय मृत्युंजय हे स्वा. सावरकरांचे जीवन-दर्शन कवितांमधून घडविणारे माझे आणखी एक पुस्तक आहे. काही प्रमाणात त्यामुळेही मी परिचित आहे. त्यातून सावरकरांविषयीच्या माझ्या भावना ते ते लोक जाणतात.

लेपियरला ही गोष्ट तशी अवगत नाही. त्यामुळे गोपाळ गोडसे यांनी मला अमुक सांगितले, हे विद्वान लोक सहज गिळून बसतील, अशी त्याने भाबडी कल्पना करून घेतली आहे.

पण तरीही काही वेळा लोक चक्रावतात ! पुष्कळ लोकांना माझा परिचय असेल त्याचप्रमाणे अनेकांना माझ्या अस्तित्वाची जाणीवही नसेल. एवढा मोठा लेखक ठाशीवपणे नथूरामच्या भावाचेच नाव स्वतःच्या हिडिस लिखाणाच्या समर्थनार्थ सांगत आहे, तेव्हा यात काही तथ्य असलेच पाहिजे, अशी धारणा होणे स्वाभाविक आहे. मला तशी काही पत्रेही आली.

पंडित व्रजनारायण व्रजेश एक चुटका सांगत. एका शेटजीला त्याच्या लेखनिकाची थट्टा करण्याची लहर आली.

सुतकी तोंड करून तो लेखनिकासमोर बसला. धन्याला काही तरी दुःख आहे इतपत लेखनिकाने तर्क केला. 'काय झाले शेटजी ?' त्याने विचारले. शेटजीने काही आढेवेढे घेतले. 'कसे सांगावे हेच कळत नाही ! फार वाईट झाले.' तो मोठ्या कष्टाने म्हणाला. लेखनिकाचे कुतूहल आणखी ताणले गेले. तो म्हणाला, 'सांगा तरी मला काही करता येईल का ?' शेटजी म्हणाले, 'तुझ्यावरच तर प्रसंग आहे. तू काय कपाळ करणार ! तुझी बायको विधवा झाली ! कसे सांगू तुला ?'

लेखनिक ओक्साबोक्शी रडू लागला. भोवतालचे लोक जमले. एकाएकी याला काय झाले म्हणून ते चौकशी करू लागले.

त्याची बायको विधवा झाल्याने तो रडतो आहे हे त्यांना कळले. त्यांनी त्याला सांगितले, 'अरे मूर्ख माणसा, तुझी बायको विधवा होणे म्हणजे तू मरणे नाही का ? तुला थट्टा कळत नाही ?'

स्वतःला आवरून लेखनिक म्हणाला, 'माझ्या थोडेसे लक्षात आले ते. पण शेटजींसारखा प्रतिष्ठित माणूस सांगत आहे, त्यात काही तरी खरे असले पाहिजे असे मला वाटले !'

लेपियरने विश्वासवंचनेने (कॉन्फिडन्स ट्रिकने) फड मारला. ध्वनिमुद्रित पट्ट्यांची चवड दाखवायची, कागदांचे काही गठ्ठे दाखवायचे अन् म्हणायचे, 'हा काय माझ्याजवळ पुरावाच आहे सगळा !' त्याला ठाऊक आहे, पुरावा पडताळून पाहण्यास कोणाला वेळ नसतो अन् आपले काम होऊन जाते ! आपल्यावरचा रोष कमी होतो अन् दुसऱ्याकडे जातो !

हा प्रकार मला कळला. मी अस्वस्थ झालो. ती अस्वस्थता मापनपट्टीत बसणार नाही. मानसशास्त्राचा अभ्यास ज्यांना करावयाचा असेल त्यांनी लक्षात घ्यावे की, जे काही रक्तपात आपण वाचतो, ऐकतो त्यांतील काहींचे कारण, एखादे असत्य एखाद्याच्या माथी मढविणे हे असते. त्या उत्तेजित भावनेत एखादा इतका तीव्र प्रतिकार करतो की, त्यातून रक्तपातही संभवतो. भले न्यायालयात तो समर्थनीय ठरो वा न ठरो.

अस्वस्थतेची तीव्रता कोणतीही असो. हातात लेखणी घेतली आहे. प्रतिकाराला काळ्या–पांढऱ्यांची मर्यादा आली आहे. अंगावर आलेले गदळ प्रथम झटकून टाकले पाहिजे.

[ क्रमशः ]

# गुजरात

## फोडाफोडीच्या डावास यश

वा. दा. रानडे

तामिळनाडू मागोमाग गुजरातेत राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली. विरोधी पक्षांचा सत्तेचा शेवटचा बुरुज ढासळला. गुजरातेतील जनता आघाडीचे सरकार तामिळनाडूनंतर ४१ दिवस टिकून राहिले हेच विशेष. बाबूभाई पटेलांचे सरकार पाडण्यासाठी सत्तारूढ काँग्रेसचे दोन बाजूंनी प्रयत्न चालू होते. त्यांपैकी एक होता फोडाफोडीचा खेळ आणि दुसरा प्रयत्न म्हणजे गुजरातेत कायद्याचे राज्य नाही, हिंसा व दहशतीचे वातावरण आहे, केंद्राचे आदेश तेथील सरकार मानीत नाही असे आरोप करून तेथे राष्ट्रपतींची राजवट आणावयाची. या दोन मार्गांपैकी पहिल्या मार्गास यश आले.

फोडाफोडीच्या हालचाली गेल्या जूनमधील निवडणुकांच्या आधीपासूनच काँग्रेस पक्षाचे नेते करीत होते. निवडणुकीपूर्वीच संघटना काँग्रेसचे एक प्रमुख नेते हितेंद्र देसाई यांना जनता आघाडीपासून अलग काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. संघटना काँग्रेसने जनसंघाशी युती करावी हे हितेंद्रभाईंना मान्य नव्हते. त्यामुळे निवडणूक मोहिमेत त्यांनी उत्साहाने भाग घेतला नाही. गेल्या १७ जूनला जनता आघाडीचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्यानंतर आठच दिवसांनी म्हणजे २५ जूनला आणीबाणी जाहीर झाली. त्या दिवशी हितेंद्रभाईंनी संघटना काँग्रेसचा राजीनामा दिला. पण लागलीच काँग्रेस प्रवेश न करता त्यानंतर तीन महिन्यांनी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला. संघटना काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर काँग्रेसला मिळाल्याच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या. काँग्रेस प्रवेशाच्या या लाटेपुढे बाबूभाई सरकार फार काळ टिकणार नाही असे वातावरण निर्माण करण्यात आले. पण त्यात प्रचाराचाच भाग अधिक होता. कारण जनता आघाडीचा एकही आमदार फुटला नव्हता.

हा डाव फसल्यानंतर किमलोपला फोडण्याचे प्रयत्न झाले. निवडणुकांत जनता आघाडीस निर्णायक बहुमत मिळाले नव्हते. एकूण १८२ सभासदांत आघाडीचे बळ ८७ होते. म्हणजे बहुमतासाठी आणखी किमान पाच सभासदांचा पाठिंबा आवश्यक होता. किमलोपने पाठिंबा दिल्यामुळेच आघाडीचे मंत्रिमंडळ बनू शकले. तेव्हा किमलोपला आघाडीपासून फोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या. किमलोपमध्ये या प्रश्नावर दोन तट होते. एक गट जनता आघाडीच्या बाजूचा तर दुसरा गट काँग्रेसच्या बाजूचा होता. त्यांच्यात एकमत होईना तेव्हा १२ फेब्रुवारी १९७६ ला किमलोपचे विसर्जन करण्यात आले. किमलोपचे विसर्जन झाले. बाबूभाई मंत्रिमंडळास आता किमलोपचा पाठिंबा न राहिल्याने त्यांचे बहुमत संपुष्टात आले असा याचा सोयीस्कर अर्थ काँग्रेस नेत्यांनी लावला. पण किमलोपचा लोप झाला तरी त्याच्या बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा जनता आघाडीच्या सरकारला होता म्हणूनच त्यानंतर एक महिना मंत्रिमंडळ टिकून राहिले, पण यांपैकी आठ सभासद काँग्रेसला मिळाले व जनता आघाडीच्या एका सभासदाने आघाडीचा पाठिंबा काढून घेतला तेव्हा चित्र पालटले. विधानसभेत नागरी पुरवठा खात्याच्या मागण्यांवर ८७ विरुद्ध ८९ मतांनी सरकारचा पराभव झाला. सरकारच्या बाजूच्या ८७ सभासदांत जनता आघाडीचे ८३ व ४ अपक्ष होते. आघाडीचे दोन सभासद उपस्थित नव्हते. सभापतींनी मत दिले नाही. ही तीन मते पडती तर सरकारचा पराभव झाला नसता. पण बाबूभाईंच्या सरकारमागे स्थिर बहुमत राहिले नव्हते. आज ना उद्या ते गडगडलेच असते. जनता आघाडीत फूट पाडण्यात काँग्रेसला फारसे यश आले नाही. आघाडीचे फक्त दोन सभासद फुटले व त्यातलाही फक्त एक काँग्रेसला मिळाला. पण किमलोपच्या १२ सभासदांपैकी बहुसंख्य काँग्रेसला मिळाल्यानेच सरकारचा पराभव झाला. निवडणुकीत काँग्रेसला ७५ जागा मिळाल्या होत्या. विधानसभेतील १२ मार्चच्या मतदानाच्या वेळी हे बळ ८४ पर्यंत वाढले. याशिवाय पाच अपक्ष सभासदांनी काँग्रेसच्या बाजूने मते दिली.

तामिळनाडूप्रमाणे गुजरातेतही राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली असली तरी, दोन्ही राज्यांच्या परिस्थितीत एक फरक आहे. तामिळनाडूत विधानसभा बरखास्त करण्यात आली. गुजरातेत ती स्थगित ठेवली आहे. काँग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्यासाठी अवधी हवा आहे. त्यासाठी राष्ट्रपतींची राजवट आणण्यात आली. विरोधकांचे सरकार पाडले पण काँग्रेसमध्ये तरी एकजूट कोठे आहे ? मुख्यमंत्री निवडण्यापासून आता ही गटस्पर्धा सुरू होईल. विधानसभेत काँग्रेसच्यामागे हुकमी बहुमत नाही. फोडाफोड करूनसुद्धा निर्णायक बहुमत काँग्रेस मिळवू शकलेली नाही. अपक्ष सभासदांच्या पाठिंब्यावरच तिला विसंबावे लागणार आहे. आता या अपक्ष सभासदांना काँग्रेसमध्ये सरळ सामील करून घेण्याचे प्रयत्न होतील. विसर्जित किमलोपचा काँग्रेसला मिळालेला गट आणि हे अपक्ष सभासद आपली किंमत मागितल्याशिवाय राहणार नाहीत. मंत्रिमंडळात त्यांचे प्रतिनिधी घ्यावे लागतील. सर्वांचेच समाधान करणे कठीण असल्याने काही सभासद असंतुष्ट राहतील व त्यातून अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता आहे.

फोडाफोडीचा डाव खेळून काँग्रेसने मिळविलेला हा विजय काही मोठा भूषणावह नाही. किमलोपचा पाठिंबा घेतल्याबद्दल काँग्रेसचे नेते जनता आघाडीवर टीका करीत होते. पण त्यांनी तरी दुसरे काय केले ? चिमणभाईंच्या नेतृत्वाखालील या संधिसाधू गटाच्या सभासदांना कोणते गुण पाहून त्यांनी पुनः काँग्रेसमध्ये घेतले ? संधिसाधूंच्या प्रवेशाने पक्ष बळकट होत नाही. शिस्तबद्ध पक्षउभारणीच्या दृष्टीने काँग्रेसने या सभासदांना दूर ठेवायला पाहिजे होते. पण सत्ता हाती घ्यायची घाई झालेले पक्ष हा विचार करीत नसतात.

जनता आघाडीचे सरकार गडगडले हे एका दृष्टीने चांगलेच झाले. विरोधी पक्षांना तो मोठा धक्का आहे. विरोधी पक्षांच्या पूर्वीच्या सरकारांबाबत आलेलाच अनुभव जनता आघाडीच्या सरकारबद्दलही आला. किमलोपच्या पाठिंब्यावर अवलंबून राहावे लागल्याने आघाडीला अनेक तडजोडी कराव्या लागल्या. नगदी पिकांवरील कर मागे घ्यावा लागला. जनता आघाडी उजव्या पक्षांचीच आहे, तिच्याकडून फारशा पुरोगामी पावलांची अपेक्षा करणेही चुकीचे होते. देशात प्रभावी विरोधी पक्ष सत्तेच्या राजकारणातून नव्हे, तर जनतेतील कार्यातूनच उभा राहील. हा मार्ग लांबचा असेल पण तोच खात्रीचा आहे. □

# तेलिया राजाच्या दरबारातील संगीत खुर्ची

## उत्तरार्ध : अनिल बर्वे

तूर्त गुजराथ राज्य सरकार विरुद्ध केंद्र सरकार यांचे परस्परांविरुद्ध जोरदार प्रचार-युद्ध चालले आहे.

पण त्रयस्थाच्या भूमिकेतून आपण काही निष्कर्ष काढू शकतो ते असे–

–गुजराथ निवडणुकांत ग्रामीण भागात इंदिरा कॉंग्रेसला मिळालेले घवघवीत यश पाहता–तसेच सत्ता स्थिर व्हायच्या आधीच निवडणुका घेण्याचा जनता मोर्चाचा निर्णय पाहता-शासकीय पातळीवरून जनता मोर्चाच्या सरकारने पंचायती निवडणुकांत हिंसाचाराला उत्तेजन दिलेले नाही !

–पंचायत निवडणुकांत झालेल्या हिंसाचाराबाबत गुजराथ प्रदेश कॉंग्रेस कमिटीने नेमलेल्या ठाकोर कमिशनवर पूर्ण विश्वास ठेवणे योग्य नाही. न्यायालयीन चौकशीचा निर्णय बाहेर येईपर्यंत वाट पाहावी.

–पोलीस रेकॉर्डच्या नोंदी पाहता अधिक उमेदवार असतानाही विधानसभा निवडणुकांपेक्षाही पंचायती निवडणुकांत हिंसाचार कमी घडला आहे. तेव्हा राष्ट्रपती शासनाच्या कालखंडापेक्षा जनता मोर्चाचा कालखंड तुलनात्मक दृष्ट्या अधिक शांततेचा आहे.

–बाबूभाई पटेलांच्या कारकीर्दीआधी चिमणभाईंच्या कारकीर्दीत ११२ तरुण 'देवाला प्रिय' झाले तर हितूभाईंच्या शासनात पाच हजार मुसलमान 'अल्लाला प्यारे' झाले. तेव्हा चिमणभाई आणि हितूभाई यांच्यापेक्षा तरी बाबूभाईंची कारकीर्द निश्चितच शांततेची आहे !

पंचायत निवडणुकांचा भाग वगळता एरवीच गुजराथेत शांतता जास्त. एकतर गुजराथ्यांची बांछोड करवाना वृत्ती हे कारण, आणि तुलनेने दारिद्र्य कमी. गुजराथेचा गरीब डोक्याला जेवढे गुंडाळतो तेवढे आपल्याकडला गरीब कमरेलासुद्धा बांधत नाही. परिणामी शांतता जास्त.

वीस लाखांचं अहमदाबाद शहर. पण गुन्हेगारीचे प्रमाण अल्पच. इथली मोठी गुन्हेगारी म्हणजे स्मगलिंगची. पण आणीबाणीनंतर केंद्र सरकारने २९० स्मगलर्सना अटक करण्याच्या सूचना राज्य सरकारला दिल्या. पैकी २७३ स्मगलर्स पकडून तुरुंगात घातले गेले. १२ जणांना सबळ कारणाभावी कोर्टाने सोडून दिले आणि फक्त पाच स्मगलर्स फरारी आहेत.

गुजराथ सरकारने स्मगलरांचा बंदोबस्त करण्यात चांगलीच जागरूकता दाखविली हे केंद्र सरकारनेही मान्य केले आहे. राज्यमंत्री श्री. ओम मेहता (मिनिस्टर ऑफ होम अफेअर्स) यांनी मुंबईत एका सभेत गुजराथ सरकारबाबत प्रशंसोद्‌गारही काढले आहेत.

तेव्हा राहता राहिला तो बडोदा, पेटलाद, नडियाद येथील जातीय दंगलींचा प्रश्न. पेटलाद, नडियादला काही मी गेलो नाही. बडोद्याला मात्र गेलो. तेथे बरीच खोलवर चौकशी केली. त्यातून निष्पन्न हे झाले की, एक किरकोळ मारामारी पतंगावरून मुलांच्यात झाली. गल्लीतल्या मारामारीचे जातीय दंगलीत रूपांतर होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त अनावश्यक वाढवून शांतता प्रस्थापित केली गेली

–अशा प्रकारची मारामारी बडोद्यात झाली आहे, याचाही अर्ध्याहून अधिक बडोद्याला पत्ता नव्हता. पण हितूभाईंनी बडोद्यातही दंगल झाली असा फतवा काढला. तेव्हा बडोदेकरांना गुजराथेत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणणारी एक दंगल आपणास माहीत नसतानाही होऊन गेली हे कळले. बडोदेकरांना 'दंगल' जाणवली नाही, कारण शाळा, कारखाने, दुकाने, व्यापार, सारं सारं काही सुरळीत चालले होते. पेटलादचे रहिवासी बडोद्याला नी नडियादला प्रचंड दंगल झाली असे समजत आहेत, तर नडियादवर बडोदा, पेटलाद पेटले अशा कल्पनेत आहेत.

बाबूभाई पटेल मात्र म्हणतात की, 'राज्य सरकारला अडचणीत आणण्यासाठी प्रयत्नपूर्वक असे आरोप केले जात आहेत.'

–आता बाबूभाई खरे बोलतात की खोटे बोलतात ?

ज्याचे त्याने ठरवावे.

शांतिब्रह्म हितूभाईंच्या पोटात 'अंडरग्राऊंड प्लेस' खुपत आहेत. आणि ही गोष्ट तेवढी शंभर टक्के खरी आहे. राज्य सरकारचे धोरण विचारस्वातंत्र्य असावे असे असल्याने विरोधी पक्षांची बरीच पत्रके, पुस्तिका गुजराथेत छापल्या जातात. सी. पी. एम. ने प्रसृत केलेली '२० पॉईंट प्रोग्रॅम ए कुएल होक्स' ही पुस्तिकाही सुरतहूनच प्रसिद्ध झाली आणि जोपर्यंत गुजराथेत जनता मोर्चाचे राज्य आहे तोपर्यंत अशी पत्रके छापली जातीलच.

...पण जर खुद्द मुख्यमंत्र्यांची निवेदने सेन्सॉर प्रसिद्ध होऊ देत नसेल तर आपली बाजू जनतेसमोर मांडायला 'जनता मोर्चाकडे' भूमिगत पत्रकांशिवाय दुसरा मार्ग तरी कोणता ?

□

एक मार्ग आहे.

तो म्हणजे राज्य सरकारने स्वतःच लिफलेटस्, पुस्तिका प्रसिद्ध करणे. कारण राज्य सरकारच्या प्रकाशनावर सेन्सॉरशिप नाही परिणामी गुजराथ राज्य सरकारने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकांना चांगली डिमांड आहे. एरवी सरकारी पुस्तिका कधी कुणी वाचते तरी का ?

पण राज्य सरकारलाही स्वतःची शासकीय बंधने असतातच. सरकारवरील आरोपांना उत्तरे देता आली तरी सत्ताधारी पक्षावरील

आरोपांना उत्तरे देण्याचे काम सरकारी प्रकाशनांना करता येत नाही. ते शासकीय संकेतात बसत नाही.

आणि म्हणूनच गुजराथेत शांतता आहे यावर चार पुस्तिका काढणारे गुजराथ सरकार...सरकार कोसळणार की पडणार यावर काही लिहू–बोलू शकत नाही.

गुजराथेत केंद्र सरकारने लादलेली सेन्सॉरशिप किती असह्य आहे हे पाहावयाचे असेल, तर १५ ऑगस्ट ७५ ला मुख्यमंत्री बाबूभाई पटेल यांनी केलेल्या भाषणाची, राज्य सरकारने प्रसिद्ध केलेली पुस्तिका वाचावी : 'Let us work to transform Swarajya into Swarajya and build up our nation.' या स्वातंत्र्य-दिनानिमित्त दिलेल्या संदेशपर भाषणात मुख्यमंत्र्यांनी सांगितले–

'सेन्सॉरच्या चुकीच्या धोरणामुळे सेन्सॉरशिपमध्ये बसणाऱ्या कित्येक गोष्टींना कात्री लावली जाते. उदा., काही दिवसांपूर्वी मी विधानसभेत म्हटले, 'गुजराथच्या जनतेचे मी अभिनंदन करतो. कारण तिने आमच्या विनंतीप्रमाणे शांतता राखली.'

वस्तुतः बाबूभाईंच्या या वाक्याने वीस कलमी कार्यक्रमाला नाही-तर शांततेला कोठे धोका निर्माण होतो ? पण सेन्सॉरने एवढे वाक्य कापून टाकले. का ? कशासाठी ?

मला तरी वाटतं की, गुजराथ सरकारविरुद्ध हिंसाचाराच्या अप-प्रचाराची जी धुळवड हितूभाई साजरी करीत आहेत त्याला हे वाक्य आडवे येऊ नये म्हणूनच सेन्सॉरची कात्री लावली गेली असावी.

असेच दुसरे मासलेवाईक उदाहरण म्हणजे विधानसभेत विचारल्या गेलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले–

'विधानसभा निवडणुकांत काँग्रेस प्रचारार्थ आलेल्या इंदिराजींच्या दौऱ्याचा खर्च ५४ लाख रुपये आला. पैकी ४५ लाख राज्य सरकारने केला असून ९ लाख रुपये काँग्रेस पक्षाने द्यावयाचे आहेत.'

सेन्सॉरने विधानसभेतील या प्रश्नोत्तरालाही कात्री लावली. का ? कशासाठी ?

लोकांना आपण कररूपाने सरकारच्या बोडक्यावर मारलेला पैसा कुठे कुठे, कसाकसा मातीत गेला हे समजावून घ्यायचा अधिकार नाही का ? मग सेन्सॉरची कात्री कशाला ?

मला तरी वाटतं,

प्रचारदौऱ्यासाठी पंचेचाळीस लाख रुपये शासकीय तिजोरीतून खर्ची टाकणे हा सत्तेचा गैरवापर आहे, याची जाण केंद्राच्या सदसद्-विवेक बुद्धीला असावी. तेव्हा झाला प्रकार जनतेच्या लक्षात येऊ नये म्हणून व विरोधकांनी जाहीर टीका करून त्याची टोचणी आपल्याला लावू नये म्हणून सदर प्रश्नोत्तराला सेन्सॉरच्या घशात घातले गेले असावे.

तर,

संगमावर बसलेल्या रेसिडेंटमुळे शेवटच्या पेशव्याला बोलायचीही चोरी व्हायची तशी सेन्सॉरमुळे बाबूभाईंची अवस्था झालीय.

गुजराथच्या जनतेलाही शेंडाबुडखा नसलेली सेन्सॉरशिप नकोशी झाली आणि म्हणूनच अहमदाबादेतल्या केंद्र सरकारच्या 'प्रेस इन्फॉरमेशन ब्युरोच्या' इमारतीवर 'सेन्सॉरशिप हटाव' अशा मोठ-मोठ्या घोषणा रंगवून ठेवलेल्या आहेत.

सेन्सॉरच्या कृपेने चिमणभाई, हितूभाईंच्या कारकीर्दीपेक्षा बाबूभाईंची कारकीर्द अधिक शांततामय आहे हे जसे आपणास ठावे नाही तसेच बाबूभाई, चिमणभाई, हितूभाई हे सारेच नगदनारायणाच्या जपमाळेतीलच मणी आहेत हेसुद्धा आपणास माहीत नाहीय...

आता हे तिघेही नगदनारायणाचेच बंदे कसे ?

–तर ते असे–

¤

९ फेब्रुवारी ७६;

जनता मोर्चाचे मुख्यमंत्री बाबूभाई पटेल यांचा ६५ वा वाढदिवस. त्या निमित्ताने भद्रमधील संघटना काँग्रेसच्या ऑफिसमध्ये सभा आयोजित करण्यात आली होती.

भद्र म्हणजे अहमदाबादेतील शनिवार पेठ. मराठी माणसांची वस्ती. परप्रांतात येऊन स्थायिक झालेली ही मंडळी खाऊनपिऊन सुखी. आणि खात्यापित्या मध्यमवर्गाप्रमाणे जनसंघाची पाठीराखी. जनसंघ जनता मोर्चात असल्याने १०५ हुतात्म्यांचा जनक असलेल्या मोरारजी देसायांच्या, संघटना काँग्रेसच्या मुख्यमंत्र्याविषयी त्यांनाही प्रेम.

तरीसुद्धा सभेची गर्दी २५०–३०० पेक्षा जास्त नव्हती. माणसांची ही कमतरता जनमानसात स्थान न राहिल्याने की सभेचे संयोजन नीट नसल्याने ?

बाबूभाई आले.

गांधीजींचा साधेपणाचा वारसा सांगत आले. असला हा तथा-कथित साधेपणा भारतीय माणसाला लोभवतो. भाबडा भारतीय माणूस साधेपणावर खूप होऊन पुढाऱ्याच्या बाकी राजनीतीचा फारसा विचार करीतच नाही. आणि म्हणूनच लखोपती असलेले पुढारीही वेष गबाळा ठेवून जनतेत राबता ठेवतात.

भारतीय माणूस त्याच्यावर खूष राहतो.

.. याउलट ह्यातच्या ह्यात कष्टकरी वर्गासाठी मोजलेले, वर्षा-नुवर्षे तुरुंगात खितपत पडलेले, कष्टकरी वर्गाचेच राजकारण करणारे म्हातारे पुढारी म्हातारपणी मिळालेल्या मानसन्मानाने आणि अनुयायांच्या थैलीने जरा गाडीत बसले, कुठे परिषदेला विमानाने गेले, हिन्दू कॉलनीत नाहीतर पारशी कॉलनीत, आयुष्याच्या उतरणीला एखाद्या ब्लॉकमध्ये येऊन राहिले, तर लगेच, 'हेच का तुमचे तत्त्वज्ञान' म्हणून नाक उडवतो.

'वेष असावा बावळा परी अंतरी नाना कळा' या चालीचे लख-पती जनतासेवक हे सारे जाणूनच असतो. आणि म्हणूनच निवड-णुकांसाठी, सत्तेसाठी, लाखो रुपये खर्च करणारे व तेवढेच सत्तेच्या फायद्यातून वसूल करणारे पुढारी सभासंमेलनात मात्र एक–दोन रफू केलेले खादीचे कुडते घालूनच जातात.

खादीच्या कुडत्यांचा रफू त्याच्या दिवाळखोर राजनीतीचीही लाज झाकतो.

बाबूभाई आले.

गांधीजींचा वारसा सांगत साधेपणाने आले !

बोलले; अगदी खणखणीत बोलले !

बोलण्यात निष्कर्षाचा तेवढा खणखणाट होता.

बाबूभाईंनी सेन्सॉरची रड गायली; केंद्र मदत करीत नाहीचा

ठेका लावला आणि आघाडी सरकार कोसळणार नाही, निदान एवढ्यात कोसळणार नाही, याची हमी दिली.

विधानसभेत बहुमत नसताना बाबूभाईंनी ही हमी कशाच्या जीवावर दिली ?

पड्याआडच्या तेलिया राजाशी केलेल्या समझोत्याने दिली. तो समझोता समजून घेऊच. पण त्याआधी नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे;

बाबूभाईंनी गुजराथेत राजकीय कार्यकर्त्यांना पकडणार नाही, इथे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आहे याचा पुनरुच्चार केला.

याला म्हणतात झाकली मूठ सव्वा लाखाची.

गुजराथेत फार कोणी अटकेत नाहीत. आणि अटकेत असतील तरी कसे ?

देशभर ज्यांची धरपकड झाली आहे ते जनसंघ, संघटना काँग्रेस, समाजवादी, भालोद वगैरे लोक सरकारातच आहेत. कम्युनिस्ट पक्षाचा गुजराथेत फारसा जोर नाही; तेव्हा त्यांना अटक करण्यात फारसा अर्थ नाही. आणि सी. पी. एम. चा तर जनता मोर्चाला सपोर्टच आहे; उरता उरले काँग्रेसवाले.

आणि बाबूभाईंनी काँग्रेसवाल्यांना पकडण्याचा विचार करणे म्हणजे जुनागढच्या नबाबाने वल्लभभाई पटेलांना पकडण्याचा विचार करण्यासारखे आहे. शिवाय पंचवीस वर्षे सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसवाल्यांना चळवळी, निदर्शने करायची सवय नसल्याने ते बाबूभाईंचे सरकार पाडण्यासाठी केवळ दरबारी कारस्थानेच तेवढी करीत असतात.

तेव्हा आम्ही कोणाला पकडले नाही अशा वल्गना व्यर्थ. आणि कोणाला पकडले नाही यावरून काही जनता मोर्चा लोकशाही ठरत नाही. ज्या संघटना काँग्रेसच्या नेत्यांनी ४८, ६२, ६५ मध्ये सर्व प्रकारची दडपशाही विरोधी पक्षांवर केली त्यांनी बाईंच्या नावे खडे फोडण्यात काय अर्थ आहे ? आणि नागा–मिझोंवर 'बंबार्डिंग' करावें असे म्हणणारे जनसंघीय लोकशाहीवादी कसे ठरू शकतील ?

–तेव्हा बाईंची लोकशाही शंभर नंबरी नाही म्हणताना जनता मोर्चाचे नेते तेवढे सोळा आणे आहेत हा युक्तिवाद करण्यात काही फारसा अर्थ नाही. असो.

जाता जाता कम्युनिस्ट पक्षाविषयी थोडेसे :–

गुजराथेत सी. पी. आय., सी. पी. एम्. दोघेही नगण्य. दोघांचा एकही आमदार इथे विधानसभेत नाही. बोनस कपातीच्या वेळेस सी. पी. एम्. ने मोर्चा काढला होता. त्याला पाऊणशे लोक होते, तर सी. पी. आय. च्या मोर्चात २०० लोक होते. अगदी अलीकडे आंदोलन म्हणावे असे एक आंदोलन सी. पी. आय. ने केले ते सायकल–रिक्षावाल्यांचे. अहमदाबादेत ५००० सायकल–रिक्षावाले आहेत. सायकल–रिक्षामुळे रहदारीला, खरे म्हणजे मोटारींना अडथळा येतो हे कारण. आंदोलनानंतर परमिट देऊ असे मोर्चा सरकारने आश्वासन दिले. पण परमिटांचा आजतागायत पत्ता नाही.

नाही म्हणायला पोलिसांचा त्रास दूर झाला. राजमार्गावरून नाही तरी गल्लीबोळांतून रिक्षावाल्यांचा धंदा सुरू झाला.

तेव्हा–

ज्याची नगण्य ताकद आहे; त्या सी. पी. एम्. च्या सपोर्टने मोर्चा सरकार स्थिरावणार नाही; अथवा सी. पी. आय. च्या हितूभाईंच्या सूरात सूर लावण्याने कोसळणार नाही. तरीपण सी. पी. आय. मोर्चा सरकार पाडावे असे का म्हणते ते कळत नाही. कदाचित ही सूडबुद्धी असावी. केरळातील कम्युनिस्टांचे सरकार पाडण्यात जनसंघादी मंडळींनी जो उत्साह दाखवला होता त्याचा हा बदला असावा.

––पण तेव्हा कम्युनिस्ट सरकार पाडण्यात पुरोगामी आणि लोकशाहीवादी इंदिराजींनीच काँग्रेस अध्यक्षा म्हणून पुढाकार घेतला होता, हेही विसरून कसे चालेल ?

□

लिहिता लिहिता विसरलोच.

विषय चालला होता बाबूभाईंच्या भाषणाचा.

बाबूभाईंच्या भाषणात स्वतःच्या सत्तेची निश्चिती होती. निदान हे अधिवेशन तरी सुरळीत पार पडणार याची खात्री होती व ती खात्री आज यथार्थही ठरली.

किमलोप संस्थापक चिमणभाईंना जरी आपली सेवा केंद्रस्थानी रुजू करायची इच्छा असली तरी किमलोपचे दुसरे नेते वल्लभभाई यांना हातचा मेवा घालवायचा नव्हता. परिणामी आपसातील लाथाळींनी किमलोप विसर्जित करावी लागली. बारा आमदारांपैकी नऊ आमदारांनी बाबूभाईंना पाठिंबा दिला. मोर्चा सरकारचे राज्यशकट चालू राहिले.

किमलोपच्या धुराळ्यातून चिमणभाईंच्या हाती धुपाटणे आले तरी वल्लभभाईंनी आपला डाव साधला.

किमलोपच्या नऊ आमदारांच्या पाठिंब्यासाठी जनतेच्या नावे सत्तेवर चढलेल्या 'मोर्चा सरकारला' बागाईतदारांच्या हातावर जमिनीचे, करकपातीचे, भावांचे, लेव्हीचे उदक सोडावे लागले. किमलोप विसर्जित झाल्याने चिमणभाईंचे चेअरमनपद संपले; पण वल्लभभाईंचे विरोधी गटनेता हे विधानसभेतील स्थान मात्र राहिले. तेलिया राजाच्या किमलोपचे नऊ आमदारांनी बाबूभाईंना सपोर्ट करून काय काय मिळवले ?

त्याचा तपशील हा असा :––

दोन वर्षांच्या दुष्काळी परिस्थितीनंतर या वर्षी बंपर क्रॉप आले. आपोआप भाव उतरले. (त्याचे श्रेय देशात इंदिराजी आणि गुजराथेत बाबूभाई, दोघेही घेताहेत.) आता जर लेव्ही व्यवस्थित वसूल केली तर पुढील वर्षीही भावांवर नियंत्रण राहू शकेल.

जेव्हा पिके चांगली आहेत, तेव्हाच सरकारी गोदामे भरून ठेवणे जनतेच्या हिताचे आहे.

––पण जनतेचे हित आणि धनदांडग्यांचे हित समान कधीच नसते. आणि मोर्चा काय किंवा काँग्रेस काय, दोघेही धनदांडग्यांचे मीठ खाल्लेले. नमकहराम कसे होणार ?

––तेव्हा बाबूभाईंनी सक्तीची लेव्ही काढून 'व्हॉलेंटरी लेव्ही' जाहीर केली. किमलोपचे मालक संतुष्ट झाले. मोर्चाचा राज्यशकट चालू राहिला.

इंदिराजींची आणीबाणी जाहीर होताच जमीनवाटपाची यंत्रणा व त्यांच्या शिलेदार बारगिरांची इच्छा नसतानाही लँडसीलिंग देशभर जारी झाले. मोर्चा सरकारने लगेच सीलिंग अठरा बिघे असावे की

तीस बिघे असावे हे ठरविण्याकरिता पॅनेल नेमले. त्या पॅनेलचे चेअरमनपदी वल्लभभाई पटेलांना नेमले.

पॅनेल नेमले म्हणजे भरपूर अवधी मिळाला. आता या काळात पॅनेल ठरवेल त्यापेक्षा जास्त जमीन असेल त्यांना ती 'योग्य प्रकारे' हस्तांतरित करता येईल. अशा रीतीने भट्टीवाल्याने पिंपे हलवण्याची खूण केल्यावर पोलिसांनी छापा टाकून बाटल्या जप्त कराव्यात, त्याप्रमाणे सीलिंग येईल. जनता, सरकारच्या पुरोगामी धोरणांनी खूष होईल. धनदांडगे आणि श्रेष्ठीही, 'सरकार मुलखाचे चलाख हो!' म्हणून खूष होतील.

—तेव्हा लँड पॅनेलचे चेअरमन असलेले वल्लभभाई बरे मोर्चा सरकार पाडून देतील?

तेव्हा मथितार्थ हा की, कॉंग्रेस सरकार नि मोर्चा सरकार यांच्यात तसा काही फरक नाही. सारी साठमारी, सारा झगडा पेशवाईच्या वस्त्रांसाठी आहे. जनतेचे उतराई कोणीही होणार नाही.

बरे, ज्या भ्रष्टाचाराविरुद्ध आणि तत्त्वभ्रष्टतेविरुद्ध नवनिर्माण, जे. पी., मोर्चा सरकार आदी साकार झाले, त्या भ्रष्टाचार निर्मूलन आणि तत्त्वनिष्ठेचे काय?

—त्याचे भजे इतिप्रमाणे;

'मकरंद देसाई.'

जनसंघाचे आमदार आणि मोर्चा सरकारचे हाऊसिंग मिनिस्टर. यांना बडोद्यातील अ‍ॅलेंबिक ब्रिजचे (रेल्वेवरील ओव्हरब्रिज) कॉन्ट्रॅक्ट मिळाले होते ललितचंद्र मगनलाल पटेल यांच्याकडून. हे ललितचंद्र मगनलाल त्यावेळी स्टँडिंग कमिटीचे चेअरमन होते. कॉंग्रेसचे हे मोठे पुढारी. सोळा कंपन्यांचे डिस्ट्रिब्युटर.

—आता जनसंघाच्या आमदारास कॉंग्रेसच्या पुढाऱ्याने एवढे मोठे कॉन्ट्रॅक्ट का द्यावे? बडोद्यातील लोक म्हणतात, 'अ‍ॅलेंबिक ब्रिज'-मध्ये फार पाणी मुरले आहे.

खरे-खोटे त्यांचे त्यांना ठाव!

'रमेश गुप्ता.'

हे जनसंघाचे कार्यकर्ते. कॉर्पोरेशनला उभे होते. आजकाल जनता मोर्चाचे प्रवक्ते होऊन बसलेले आहेत. यांना 'भेसळी'बद्दल शिक्षा झाली होती असे कानी आले.

धवल आणि शुद्ध चारित्र्याच्या जनसंघाने यांना मुळात तिकीटच का द्यावे?

वाजपेयींना विचारले पाहिजे.

आता तत्त्वनिष्ठा मोर्चाकृत नमुना पाहू.

'नवीनचंद्र बारोट.'

हे मजूर महाजनचे पुढारी आणि मोर्चा सरकारचे श्रम व स्थानिक स्वराज्याचे मंत्री.

हाच इसम बडोदा कॉर्पोरेशनचे वेज बोर्डाचा अध्यक्ष होता. स्वतः अध्यक्ष असताना याने म्युनिसिपल कामगारांसाठी जे वेजेस मान्य केले होते तेच आता मंत्री झाल्यावर देण्यास महाजन तयार नाहीत. कॉर्पोरेशन आणि गांधीनगर येथे दोन्ही ठिकाणी मोर्चाचे राज्य. वेजेस यांनीच मान्य केलेले. तरी पण द्यायची तयारी नाही. चार महिने बोंबाबोंब चाललीय. 'हॅलो, हॅलो ला हलकट उत्तर,' प्रमाणे यांचा विचारच चालू आहे...चालू राहील,...चालू राहणार.

इंजिनीअर कामगारांबाबत हीच अवहेलना. महाराष्ट्रात लहान उद्योगधंद्यांतही कामगारांना किमन २२१ रु. मिळतात. गुजराथेत ३.५० रु.-ते ५ रु. रोज आहे. तेव्हा महाराष्ट्र सरकारप्रमाणेच गुजराथ सरकारनेही 'इंजिनीअरिंग वर्कर्स वेज बोर्ड' नेमावे; अशी मागणी झाली. याही मागणीला उत्तर नाही. मंत्री मजूर महाजनचा पण कामगारांचे हित पाहत नाही. पाहील तरी कसा? बापूजींनी स्थापलेली ही मजूर महाजन भद्र येथे दोन मजली टोलेजंग इमारतीत वास करत असते. कामगारांचे जीवनमान वाढविण्यापेक्षा आध्यात्मिक उत्थान करण्यात गर्क असते. कस्तुरबा फंड, महादेव फंड असे वेळोवेळी फंड जमवत असते. याव्यतिरिक्त दरमहा वर्गणीचे पासष्ट हजार रुपये जमतात. त्यामुळे दुमजली इमारतीचा कारभार आणि पुढाऱ्यांचे राजकारण व्यवस्थित चालते. या मजूर महाजनने गिरणी कामगारांना एकसंध बांधलेले नाही. डिपार्टमेन्टवाईज युनियन्स बनवल्या आहेत. वीव्हरांची एक युनियन; रींग खात्याची दुसरी युनियन; जॉबरांची तिसरी युनियन.

अशा कार्यपद्धतीने म्हणे मालक-कामगार सलोखा राहतो. अन्नदाते गिरणी मालक रागवत नाहीत.

मालकांना यातना होणार नाहीत हे प्रथम पाहायची मजूर महाजनची पूर्वपरंपरा.

एक ऐतिहासिक बोधप्रद किस्साच सांगतो.

१९१८ सालची गोष्ट.

गिरणी कामगारांनी गांधींच्या नेतृत्वाखाली पगारवाढीसाठी संप लढवला. बापूजी उपोषणाला बसले. मालकांचे हृदय पाझरले व तडजोडीने संप मिटला. दुसरे दिवशी बापूजींनी आपल्या शंकरपाल या सहकाऱ्याला सांगितले, 'शंकरपाल, कल तुम तांगा लेकर आश्रममे आना. मुझे अंबालालभाईसे और लेडी चिनूभाईसे मिलने जाना है।' शंकरलालने विचारले, 'किस लिये?' तेव्हा बापूजी उत्तरले, 'मजदूरोंकी हड़तालसे उन्हें बड़ा दूख हुआ होगा. अतः मुझे उनसे मिलके क्षमा मांगनी चाहिये!'

तर,—

अशी ही मजूर महाजनची परंपरा. त्यांच्या 'न्यायपूर्ण लडाईका मार्ग' मध्ये खालील तत्त्वेही अंतर्भूत आहेत.

१ : **उचित मांग** : मालकांना परवडेल अशीच मागणी.

२ : **हृदयपरिवर्तन** : संपाचा हेतू हृदयपरिवर्तन असावा. आपली मागणी संपूर्ण पूर्ण झाली नाही पण मालकाचे हृदयपरिवर्तन झाले असेल तरी चालेल.

३ : **प्रेमाचे संबंध** : मालक—कामगार संबंध प्रेमाचेच असले पाहिजेत.

४ : **परस्पर सद्भाव** : मालकाविषयी सद्भावना ठेवलीच पाहिजे.

५ : **शांती के लिये पूरी सावधानी** : संपकाळात गडबड होताच कामा नये.

(गांधीजी और मजदूर प्रवृत्ती—ले. शंकरलाल बँकर.)

तेव्हा बापूजींनी वीस साली गॅरेजमध्ये स्थापलेली 'मजूर महाजन' भद्रमधल्या टोलेजंग इमारतीत उगाच नाही गेली.

नाहीतर आमचे डांगेबाबा. अहमदाबादेपेक्षा मोठी आणि एकजुटीची त्यांची गिरणी कामगार युनियन. वर पुन्हा म्हणे रशिया-

कडून पैसे खातात तरी दळवी बिल्डिंगमधल्या घाणेरड्या जागेतून काय त्यांना हालता येत नाही ! असो.

तर स्वतःच दिलेल्या शब्दांशीही बांधीलकी न ठेवणारे असे हे मोर्चा सरकार. सर्व थरांतील श्रीमंतांना सांभाळून घेणारे. कारण सद्भावना, हृदयपरिवर्तनाचा गांधी मार्ग. जनसंघही याच 'गांधी-मार्गा'वरून चालला आहे.

¤

गुजराथेतील आजवरच्या कोणत्याही सरकारने शेंगदाण्यावर लेव्ही टाकली नाही ती काय उगाच नव्हे. तेलिया राजा संतप्त झाला तर तो गादीवर बसू देत नाही.

जी गोष्ट तेलिया राजाची तीच दूध उत्पादकांची !

बडोदा जिल्ह्यातील श्रीमंत शेतकऱ्यांनी 'बडोदा जिल्हा दूध उत्पादक संघ' काढला. मोठी डेअरी काढली. रोजी ७५ हजार लिटरचा दूधपुरवठा बडोदा शहराला करतात. 'सहकारी समाजवादाचा' पाळणा हालावा म्हणून यांना सरकारने स्वस्त जमीन, वीज, पाणी तातडीने पुरवले. केंद्राने, राज्याने क्रेडिट दिले. पठ्ठ्यांनी वर्ल्ड बँकेचेही कर्ज काढले. केअरकडून दूध—पावडरही सवलतीत घेतात.

तर गुजराथच्या या सहकार महर्षींनी एका झटक्यात लिटरला पन्नास पैसे दर वाढवला. जनतेने आंदोलन केल्यावर लिटरला दहा पैसे कमी केला. तेव्हा भाव पुन्हा पूर्वपदावर आणावेत म्हणून जनता आपल्या जनता मोर्चाच्या सरकारकडे गेली. मोर्चाला सरकारने उत्तर दिले.

'हा खाजगी उद्योग समूह आहे. आम्ही काय करणार ?'

आता हे काय उत्तर झाले ?

स्मगलर्स, साठेबाज, मटकावाले यांचे खाजगीच उद्योगधंदे असतात. म्हणून सरकारने काय लक्ष घालू नये ?

जीवनावश्यक वस्तूंचे भावासंबंधी काही कायदे—अधिकार सरकारकडे आहेत की नाहीत ?

स्वस्त जमीन, वीज, पाणी, क्रेडिट देताना तो खाजगी धंदा आहे हे लक्षात नाही आले. फक्त भाव बांधून देतानाच त्यांचे खाजगीपण लक्षात आले काय ?

खरी भानगड अशी की,

दूध उत्पादक संतप्त झाले तर निवडणुकांसाठी जीपगाड्या, पैसा कोठून येणार ? आणि तो नाही आला तर जनतेच्या हितासाठी जनता मोर्चा राज्य तरी कसे करणार ?

—आणि एकंदर जनतेच्या हितासाठी तडजोड ही केलीच पाहिजे नाही का ?

¤

## ६२ कलमी कार्यक्रम

बाबूभाईंच्या भाषणात 'गरिबी हटाव' कोठे नव्हती. वीस कलमी कार्यक्रमही नव्हता. कारण तो काही जनतेचा नव्हे. तेव्हा जनता मोर्चाने त्याची काळजी कशाला करावी ?

—तरी पण 'तुम्हारा नेहला तो हमारा देहला' या चालीवर बाईंचा वीस कलमी तर बाबूभाईंचा ६२ कलमी कार्यक्रम तेवढा जाहीर झाला आहे. पण देशभर वीस कलमीच्या अंमलबजावणीची जशी प्रसिद्धी चाललीय तशी काही जनता मोर्चाच्या ६२ कलमीसाठी चालू नाही.

—जिथे दुंदुभीच वाजत नाही तिथे रणशिंगे कोण फुंकणार. पण एकंदरीत ६२ कलमी कार्यक्रम हा चांगलाच गुळचट आहे. कर्मदरिद्र्यांपासून गर्भश्रीमंतांपर्यंत सर्वांनाच मानवणारा आहे. त्यातली काही वानगीची कलमे व अंमलबजावणी सांगतो.

कलम पहिले : जनता मोर्चा सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनासाठी गांधीवादी मार्ग अवलंबेल. खादी, ग्रामोद्योग, दारूबंदी, अस्पृश्यतानिवारण यांबाबत कठोर अंमलबजावणी करेल.

मजूर महाजनचा 'गांधी—मार्ग' तुम्ही पाहिलाच आहे. बेघर हरिजनालाही आपण पाहिले. तेव्हा या कलमाला काही अर्थ आहे का ?

सारी बासष्ट कलमे ही अशी : खेड्यांना पाणी पुरवू, प्रौढसाक्षरतेचे वर्ग चालवू, भ्रष्टाचार-निर्मूलन करू, लोकायुक्त नेमू इ. इ.

आता हा काय प्रोग्राम झाला ?

प्रोग्राम म्हणजे तुम्ही काय करू इच्छिता ते सांगणे नसून वांछिले ते अंमलात कसे आणाल ते सांगणे आहे.

आणि तेवढेच जनता मोर्चा सांगत नाही.

आणि म्हणूनच समाजवादी, जनसंघ, सिंडिकेट, मार्क्सवादी कम्युनिस्ट आदी सर्व आवळ्याभोपळ्यांची मोट बांधली गेलीय.

बासष्ट कलमी कार्यक्रमात त्वरित 'पंचायत निवडणुका घेऊ' अशी घोषणा होती. आणि तेवढी मात्र अंमलात आणली गेली. पण १८ वर्षांच्या वरील तरुणांना मताधिकार न देताच. आणि १८ वर्षांवर मताधिकार घ्यायचे तर बासष्ट कलमी कार्यक्रमात अंतर्भूतच आहे.

तेव्हा असे हे जनतेच्या सुखदुःखाशी संबंधित नसलेले 'मोर्चा सरकार' लवकरच जनतेत अप्रिय होईल ही काँग्रेसवाल्यांची अटकळ काही खोटी नाही.

पंचायत निवडणुकांत निष्पन्न तेच झाले. शहरी मध्यमवर्ग, व्यापारी यांच्या पाठिंब्याने शहरात मोर्चा विजयी झाला तरी व्हॉलेंटरी लेव्ही, लँड पॅनेल इ. मुळे खेडोपाडी सणकून मार खावा लागला. अर्थात पडलो तरी नाक वर या न्यायाने काँग्रेस, जनता मोर्चा दोघेही टक्केवारी, जागा, सिटा यांचे आकडे घेऊन मीच जिंकलो, मीच जिंकलो ओरडत आहेत.

पण एकंदर निकाल पाहता दोघांनाही जल्लोष करायचे काही कारण नाही. काटा इकडे तिकडे हालतोय, नेमके वजन दाखवत नाहीय.

—तर अशा मोर्चा सरकारला करवाढ करावी लागली नसती तरच नवल. अर्थसंकल्पात ३४ कोटींची करवाढ जाहीर झाली. सामान्यांची चामडी काढली तरी तेलिया राजाला चिमटा काढलाच आहे, या समाधानाने जनता चूप करावी.

आठवडा लोटला. रोज मरे त्याला कोण रडे या न्यायाने जनता शांत झाली नि हळूच तेलिया राजावरील चार कोटींचे कर मागे घेतले गेले !

वल्लभभाई पटेल काही उगाच 'मोर्चा सरकारला' पाठिंबा देत नाहीय.

आणि हितूभाई कितीही ओरडले तरी केंद्रीय मुत्सद्दी शहाणे आहेत. त्यांना एवढ्यातच गुजराथमधले मोर्चा सरकार पडायला नको आहे. समजा, आताच जर मोर्चा सरकार उलथून कारभार हाती घ्यावा लागला तर खजिन्यातील खडखडाट पाहता राष्ट्रपती अंमलात करवाढ करून जनतेचा असंतोष पदरी घ्यावा लागेल. तेव्हा करवाढ करायचीय ती मोर्चा सरकारला करू देत. ती करवाढ विधानसभेत संमत होऊ देत. मग पाहून घेऊ. असे सारे धोरण.

तेव्हा मद्रासेच्याच मार्गाने गुजराथचे मोर्चा सरकार जाणार हे उघड आहे. फक्त जाईल ते केंद्राच्या सोयीने, आणि मोर्चा सरकार राहिले काय, काँग्रेस सरकार आले काय,

शेतकरी राजा वेठीला राबणार;

तेलिया राजा राज्य करणार !

हा गुजराथच्या राजनीतीचा मूळ सिद्धान्त कोठे बदलत नाही. ◻

मुक्काम बडोदा.

स्थळ अलकापुरीतील मैदान. नानासाहेब गोऱ्यांचे भाषण आहे. मैदानावर पाणी शिंपलेले आहे. खुर्च्या मांडल्या आहेत. सुंदर स्टेज आहे. सत्ताधाऱ्यांची सभा आहे ते लगेच जाणवतेय. मैदानासमोर गाड्यांचा ताफा.

जमाव जमतो. शांतपणे. उत्साह नाही. गीतेतला 'स्थितप्रज्ञ' कसा असतो ते जमावाकडे पाहून समजले. गर्दी बरी होती. पण अलोट वगैरे नाही.

खरे तर, आपले 'मोर्चा सरकार' राहील का जाईल हे पाहायला जनतेमध्ये केवढे औत्सुक्य पाहिजे. पण काही नाही.

मग नानासाहेब बोलले. नवीन काही नाही. भाषण संपले, लोक पांगले, परिणाम काही नाही.

नानासाहेबांनी आपल्या भाषणात काँग्रेस कशी संधिसाधू आहे, वचनपूर्ती कशी केलेली नाही ते सांगितले. प्रश्न फक्त इतकाच आहे, ज्या मोर्चा सरकारला वल्लभभाईंच्या किमलोपच्या मेहरबानीवर जगावे लागत आहे, केव्हाही गरजेप्रमाणे चालते व्हावे लागणार आहे, वचनपूर्तीचे राजकारण करता येत नाहीय ते सत्ता का सोडत नाही ?

जर आता 'मोर्चा सरकारने' जनतेला स्पष्ट आणि स्वच्छ शब्दात सांगितले, 'आम्हाला बहुमत मिळाले तरच राज्य करू. कोणाच्या मेहरबानीने राज्य केले तर वचनपूर्ती होणार नाही, आणि दिला ग्रेसफुली राजीनामा तर जनता बहुमताने मोर्चा सरकारला निवडून देईल.

बाईंच्या नावाने खडे फोडणाऱ्यांनी बाईंनी ग्रेसफुली निवडणुका घेऊन बहुमत मिळवले होते हे विसरू नये. पण मोर्चातील पक्षांना सत्तेचा मोह सुटत नाही आणि राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला सामोरे जायची हिंमत नाही.

— आणि इथेच तेलिया राजाची जीत आहे. तो सर्व प्रकारे आपला स्वार्थ साधून घेतो आहे. आणि 'जनता मोर्चा' नाव घेऊन सत्तेवर चढलेले सरकार पदोपदी जनतेचे हितसंबंध पायदळी तुडवून तेलिया राजाला मुजरे घालीत आहे.

## समाप्त

---

## दुसरे चित्र

पृष्ठ ५ वरून

वृत्तसंस्थांची खळबळजनक बातम्या मिळविण्यातील स्पर्धा जीवघेणी असते. क्लॅरेन्स न्यूटन मेडलीन याने तिचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला.

पॅट्रिक ओ'केफे या पत्रकाराला तो भेटला. सीबीएस् नेटवर्क या मोठ्या वृत्तसंस्थेचा ओ'केफे याचा जवळचा संबंध. टिमस्टर्स युनियनचे अध्यक्ष होफ यांचे प्रेत कुठे दडविलेले आहे, हे मी दाखवून देतो, असे मेडलीनने ओ'केफे याला सांगितले. पूर्वी होफ यांचा शरीररक्षक म्हणून काम केल्याचेही मेडलीनने सांगितले. त्याच्या धिप्पाड शरीरयष्टीकडे पाहून तसा विश्वासही बसला.

होफ यांचे प्रेत सापडले तर ती वर्षातील सर्वांत खळबळजनक बातमी ठरणार होती. त्यामुळे सीबीएस् नेटवर्कने पैसे खर्च करण्याची तयारी दर्शविली. ओ'केफे याच्याकडे दहा हजार डॉलर्स देण्यात आले. सीबीएस्च्या टी. व्ही. युनिटला घेऊन मेडलीन निघाला. वाटेत त्यांनी एका हॉटेलमध्ये मुक्काम केला. तो व ओ'केफे एकाच खोलीत उतरले. सकाळी उठून पाहतात तो पैसे व मेडलीन दोन्ही गायब. मेडलीनला शोधण्याचा प्रयत्न वाया गेला.

काही महिन्यांनंतर मेडलीनने न्यू ओर्लिन्स येथील एका मोठ्या वृत्तपत्राच्या वृत्तसंपादकाला फसविण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. त्यानंतर एफ्बीआयच्या एजंटने त्याला अटक केली, त्यावेळी त्याच्याकडे फक्त दोन हजार डॉलर्स शिल्लक होते.

मेडलीन जर हॉलिवूडला गेला तर त्याला चित्रपटात काम मिळून लाखो डॉलर्स मिळू शकतील, असे ओ'केफे याला वाटते. ◻

कथा

# ग्रीक साहित्यलक्ष्मी सॅफो

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

ग्रीस देशाची संस्कृती जगातील प्राचीनतर संस्कृतींपैकी एक आहे. आजच्या त्रिखंड-विजयी पाश्चिमात्त्य संस्कृतीची बीजे ग्रीक संस्कृतीत सापडतात. इ. स. पूर्व ३५००पासून इ. स. पूर्व १४६ पर्यंतचा दीर्घकालिक काळाचा पट्टा या प्राचीन संस्कृतीच्या तेजस्वी चढउतारांनी व्यापलेला आहे. या शेकडो वर्षांच्या कालमर्यादेत ग्रीकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण विलक्षण चढउतारांनी भरलेला आहे. प्राचीन ग्रीक स्त्रीला प्राचीन इजिप्तमधील स्त्रीएवढा किंवा वेदकालीन स्त्रीचा दर्जा असल्याचे दिसत नाही. सुवर्णयुगात म्हणजे सम्राट पेरिक्लसच्या काळी तर स्त्रीचा दर्जा भयंकर अवस्थेला पोचला होता. असे असले तरी याच ग्रीक संस्कृतीने जगाला सॅफोची देणगी दिली, हे आश्चर्य आहे.

ग्रीसमधील लेस्बॉसची भूमी लाव्हारसाने समृद्ध बनविलेली होती. फुलबागा, फळबागा, विशेषतः द्राक्ष-बागा भरपूर होत्या. इसवी सनपूर्व ७ व्या शतकाच्या अखेरीस व्यापारी आणि कामगार यांनी संगनमत करून प्रचलित सरंजामशाहीला मूठमाती दिली. त्या 'जनतेने' पिटॅकसला आपला सर्वेसर्वा म्हणून निवडले! पिटॅकसचा पाडाव करण्याचे प्रतिगामी सरंजामशहांचे सर्व प्रयत्न धुळीला मिळाले. या लब्धप्रतिष्ठित उठावगिरांत सॅफो होती. सॅफो-ग्रीकांची मधुराणी! ग्रीक कवींच्या नवरत्नांपैकी एक असलेली सॅफो! या राजबंडामध्ये सॅफोची साथ अल्केईस नावाच्या दुसऱ्या प्रथितयश कवीने केली.

अल्केईसने पिटॅकसच्या लोकसत्ताक दादागिरीविरुद्ध आपल्या काव्यांतून भडिमार केला. त्याच्या काव्यात राजकारणाचा रंग भरपूर मिसळलेला होता. बंड बीमोड करू शकणारा या साहित्यिक तोफखान्याला शरण गेला–वैतागला आणि त्याने अल्केईसला हद्दपार केले. अल्केईसचे काव्य राजकारण, रण आणि मदिरा यांचे गुणगान करणारे आहे. परंतु पिटॅकसशी प्रत्यक्ष रणांगणावर दोन हात करण्याचे सामर्थ्य नसल्याने, अल्केईसने लेस्बॉसमधून पळ काढला.

अल्केईसच्या परागंदा सहकाऱ्यांत सॅफो होती. 'लेस्बॉसची सॅफो' या नावाने विश्वविख्यात झालेल्या या ग्रीक साहित्यलक्ष्मीला लेस्बॉसचा निरोप घ्यावा लागला. सॅफोसारखी सर्वज्ञात व सर्वश्रुत कवयित्री जगाच्या इतिहासात आजवर पुन्हा झाली नाही, असे म्हणणे विशेष धाडसाचे ठरणार नाही. अनेकांना जिवंतपणी कीर्ती प्राप्त होते, अनेकांना मरणोत्तर कीर्तीचा लाभ होतो; सॅफोसारखी कीर्ती फार थोड्या भाग्यवतींना लाभते. सॅफोचे नाव गेली अडीच हजार वर्षे रसिकांच्या रसवंतीचे भूषण ठरले आहे. दोन शब्दांत सॅफोची महती वर्णन करायची झाली तर ते शब्द म्हणजे 'थरथरणारी व्याकुळता.' (Trembling intensity.)

स्टोबेईस लिहितो – मोठी मार्मिक घटना आहे–

'एकदा संध्याकाळी मस्तपैकी मदिरापान चालले होते. मामला मोठा मदहोष होता. सोलोनचा पुतण्या पिऊन मस्त झाला होता. त्याने एक गाणे गुणगुणायला सुरुवात केली. ते गीत सॅफोचे होते. सोलोन इतका खूष झाला त्या गाण्यावर की बस्स्! सोलोनने ते गाणे शिकण्याचा हट्ट धरला. सोलोनचा दोस्त म्हणाला, 'गड्या, हे गाणे शिकण्याची आत्ताच का घाई?' सोलोन धुंदीत मान डोलावत म्हणाला, 'मित्रा, काळाचा काय भरवसा? मृत्यू आता जरा वेळाने आला तर हे गाणे शिकलेले असावे!'

संतपुरुष सॉक्रेटिसने सॅफोचा गौरव 'सुंदर' या एका शब्दात केला आहे. तत्त्ववेत्त्या प्लेटोने तर सॅफोला देवतेसमान लेखले आहे. प्लेटो म्हणतो :

'लोक सांगतात, कलांच्या नऊ अधिष्ठात्री देवता आहेत! केवढी मोठी गलती ही! त्यांना सॅफोचे नाव माहिती नाही का? सॅफो ही ग्रीकांची दहावी अधिष्ठात्री देवता (Muse) आहे!'

स्ट्रॅबोने सॅफोविषयी एवढा आदरभाव व्यक्त केला आहे की, त्याला तुलनाच नाही. स्ट्रॅबो म्हणतो, 'सॅफो अतुलनीय स्त्री आहे. ज्ञात इतिहासात सॅफोच्या काव्याची किंचित बरोबरी करू शकेल अशी स्त्री आढळणे मुष्किलच.'

कवी म्हटले की ग्रीकांना फक्त होमरचे नाव ठाऊक होते; कवयित्री म्हटले की सॅफो!

ग्रीकांच्या ह्या साहित्यलक्ष्मीचा जन्म इ. स. पूर्व ६१२ च्या सुमारास झाला. इ. स. पूर्व ५९३ मध्ये जो राजकीय एल्गार झाला, सत्तास्पर्धेचा तमाशा झाला त्यात सॅफो सक्रिय सहभागी होती. त्या वेळी सॅफोने वयाची वीस वर्षेदेखील पूर्ण केली नव्हती. ऐन तारुण्यात राजकारण आणि लेखणी सॅफोने सारख्याच सफाईने हाताळली. सॅफो सौंदर्यखनी म्हणून मशहूर नसली तरी पुरुषवर्गाला तिचे विलक्षण आकर्षण होते. सॅफोची कुडी लहानखोर, केसांचा आणि डोळ्यांचा रंग सर्वसाधारण ग्रीक स्त्रीपेक्षा गडद असाच होता. सॅफोचा नाजुकपणा आणि नजाकत अनुपमेय होती. तिचे मन विजेसारखे तल्लख होते. तिच्यातील कोवळ्या पालवीसारखी थरथरणारी कोवळीक राजकारणात राहूनदेखील कोळपून गेली नव्हती. सॅफो स्वतःविषयी म्हणते, 'माझे अंतःकरण अर्भकासारखे आरपार आहे.' मात्र तिच्या काव्यातून होणारे तिच्या अंतरंगाचे दर्शन वासनांनी ओतप्रोत भरलेले असेच आहे. ती मनस्वी स्वभावाची होती.

प्लुटार्क सॅफोविषयी म्हणतो : सॅफोचे शब्द, शब्द नाहीत; अग्निकण आहेत. तिच्या अपार अंतःकरणातून बाहेर पडणारे शब्द वासनांची झगझगीत झालर लेवून बाहेर पडतात.

सॅफोची 'लाडकी विद्यार्थिनी' ॲथीसने सॅफोचे वर्णन केले आहे. सॅफोच्या गळ्यात, अंगाखांद्यावर फुलांच्या माळा रुळत. तिला केशरी, निळी, लालसर निळी वस्त्रे पसंत होती. आजकालच्या रूढ शब्दात सॅफोचे वर्णन करायचे तर तिच्यात प्रचंड प्रमाणात 'Sex appeal' होते. पिटॅकसने सॅफोसह अल्केईसला हद्दपार केले होतेच. अल्केईस सॅफोला लिहितो : प्रिय सॅफो, नील–किरीट परिधान करणाऱ्या सुंदरी, शुद्ध सुहासिनी सॅफो, मला तुला काही सांगायचे आहे; पण लाज वाटते ग!' या इष्कबाज विनवणीला

सॅफोने दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे : ' अल्केईस, तुला जे काही सांगायचे आहे, ते निश्चितपणे गैर नसणार. मग तुझा चेहरा शरमिंदा का ? योग्य ते सांगायला भीड कुणाची व कशासाठी ?' कवी अल्केईसने आपल्या बऱ्याच कवितांतून सॅफोची सौंदर्य-स्तोत्रे गायली आहेत. मात्र अल्केईसचे अस्फुट प्रेम तसेच विरून गेले. अल्केईसची साद सॅफोने साथ न दिल्यामुळे व्यर्थच गेली, असे म्हणावे लागेल.

सॅफोच्या ठिणग्या आणि प्रतिस्पर्ध्यांच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या लेखणीच्या भयाने पिटॅकसने तिला दोनदा हद्दपार केले. दुसऱ्या हद्दपारीच्या काळात तिने सीसिलीमध्ये असता अँड्रॉस नावाच्या धनिकाशी विवाह केला. या विवाहाचे फळ म्हणजे सॅफोची कन्या—क्लीस. सॅफोचे क्लीसवर जीवापाड प्रेम होते. ' माझी छकुली क्लीस सोनुली आहे. लेस्बॉसचे राज्य दिले तरी मी बदल्यात क्लीस देणार नाही.' सॅफोची परिस्थिती राज्य नको म्हणण्यासारखीच झाली होती. अँड्रॉसच्या अकाली निधनामुळे त्याची अमाप संपत्ती सॅफोला आपोआप मिळाली. पाच वर्षांच्या अज्ञातवासानंतर सॅफो पुनश्च लेस्बॉसला परतली. आर्थिक सुबत्ता सुखकारक होती. त्या जोडीला समाजातील बुद्धिमंतांचे नेतृत्व सॅफोकडेच होते. सॅफोची राहणी अगदी ऐपारामांची होती. ती म्हणते, ' I love soft living '

आता सॅफो आरपार पेटून उठली होती. तरुण मुलींसाठी तिने एक शाळा सुरू केली. सॅफोच्या शाळेत काव्य, नृत्य, संगीतादी विद्या शिकविण्याची उत्तम सुविधा होती. स्त्रीने स्त्रियांसाठी चालविलेले ग्रीसच्या इतिहासातील हे पहिलेच विद्यालय होते. सॅफो आपल्या विद्यार्थिनींना विद्यार्थिनी न मानता ' सख्या ' मानत असे. विनापती सॅफो एकामागोमाग एक याप्रमाणे आपल्या ' विद्यार्थिनींच्या प्रेमात ' पडत होती. ' या प्रेमाने माझे मन वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यात घुसळून निघालेल्या वृक्षाप्रमाणे घुसळून निघाले आहे,' असे ती म्हणते. अॅथीस नावाच्या विद्यार्थिनीवर तर सॅफोचा असा काही ' जीव जडला होता,' की काही विचारायची सोय नाही. अॅथीसने मात्र सॅफोबाईच्या प्रेमाकडे पाठ फिरवून एका सुयोग्य तरुणाला वरमाला घातली.

सॅफोने अॅथीसला उद्देशून काव्याची कारंजी उधळली आहेत.

' देवतुल्य मला तरी वाटतो तो,
मश्गुल आनंदात
जो सन्मुख तुला न्याहाळतो नीट, धीट,
दाट निकट जवळ तुझ्या,
जो ऐकतो एकांतात,
एकटाच तुझी चन्चंदेरी वाणी.
हसत प्यारभरी मंद मुस्कान. अग,
हे, हे एवढेच
शल्य दणकून टाकते माझे थरथरणारे उर
जर क्षणार्ध पाहू शकेन तुला मी तर
थंडच होऊन जाईल माझी आर्त–जवानी
खरंच ग, विधून गेली ग माझी जबानी
अन् आरपार, खोलपार वाहते धगधगती, अमीट
जळते भळभळणारी ज्वाला.
डोळ्यांना दिसत नाही समोर काहीच,
कानात उमटतात तेवढ्या आवाजांच्या लाटा खळाळा...
वाहतात घर्मबिंदूंच्या सरिता अंग अंगभर,
वाहते अनामिक थरथर
पावसाळी गवताच्या पात्यासारखी,
मृत्यूच्या भीतीने पूर्ण व्यापलेली मी.
अडखळते चाचपडते मी
हरवलेली, हरकलेली प्रेमाच्या समाधीत मी. '

◻

या सर्वांचा शेवट अॅथीसचे नाव शाळेतून काढण्यात व अॅथीसच्या विवाहात झाला ! आता अॅथीस कधीच दिसणार नाही या दुःखाने सॅफो विदीर्ण झाली.

लेस्बॉसच्या सॅफोचे हे ' लेस्बिअन प्रेम ' समसंभोगी होते की थोर कवीमनाची आर्त व्याकुळता होती. एका अपूर्ण कवितेत सॅफोला ' फुलणाऱ्या वसंताचा पदन्यास ऐकू येतो,' तर दुसऱ्या एका कवितेत ' गात्रे विकल करणाऱ्या प्रेमाच्या कडू-गोड वेदनांचा ' उल्लेख आहे. एके ठिकाणी सॅफोने प्रेमाला लालसर सफरचंदाची उपमा दिली आहे–' ते सफरचंद फांदीच्या अगदी टोकाला आहे. ते दिसते पण माझा हात पोचत नाही. '

सॅफोने प्रेमाखेरीज अन्य विषयांवर काव्यरचना केलेली आहे, पण काळाच्या कसरीने बरीचशी काव्यरचना खाऊन टाकलेली आहे. तिने रचलेल्या १२ हजार काव्यपंक्तींपैकी फक्त ६०० ओळी उपलब्ध आहेत. स्वतःच्या गीतांना तिनेच संगीतबद्ध केलेले होते. सॅफो आणि अल्केईस यांच्या काव्याची ' उत्तान लेस्बियन काव्य ' म्हणून रसिकजगात ख्याती आहे. इ. स. १०७३ मध्ये ख्रिस्ती धर्ममार्तंडांनी सॅफोच्या उत्तम आणि उत्तान कवितांची होळी केली. इ. स. १८९७ मध्ये आज उपलब्ध असलेल्या ६०० ओळी कशाबशा गोळा करून ग्रथित करण्यात आल्या.

पुरुषवर्गाने सॅफोला जिवंतपणी छळले. मृत्यूनंतर तर आपल्या लेखण्यांच्या जिभा सैल सोडून त्यांनी सॅफोला पुरेपूर बदनाम केले. अशी कंडी पिकली (की पिकवली ?) की फाओनने नकार दिल्यामुळे सॅफो मेली ! सुईडासने म्हटले आहे की, सॅफो वेश्येने कड्यावरून उडी टाकून जीव दिला ! मिनॅन्डर स्ट्रॅबो आणि ओव्हिड या साहित्यिकांनी सॅफोचा हृदयद्रावक अंत मिटक्या मारत रंगवला आहे. पुरुषी लेखनावरून सॅफोला आयुष्याच्या अखेरीला ' पुरुष-प्रियकर ' आवडू लागल्याचे दिसून येते. एका पुरुषाला उद्देशून सॅफोने लिहिले आहे :

' माझ्या स्तनात जर अजून दूध निर्मिण्याची क्षमता असेल, माझ्या गर्भाशयात बीज धारण करण्याइतपत ओलावा असेल, तर मी अजूनदेखील सुहागरात साजरी करण्यासाठी सजविलेल्या पलंगाकडे धडधडणाऱ्या हृदयाने आणि अडखळणाऱ्या पावलाने येण्यास सिद्ध आहे. पण आता ते शक्य नाही. ढळला रे ढळला दिन सुखया ! शरीर शुष्क झाले आहे प्रेमाची कळ या माझ्या थिजलेल्या, सुरकुतलेल्या शरीराला पेटवू शकत नाही. '

सॅफो कुठल्या अवस्थेत मेली याचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. तिने आपल्या मागे धगधगणारी वासना, उत्कट काव्य यांची चक्रवाढीने वाढणारी ठेव रसिकांसाठी ठेवलेली आहे. अविचारी वासनांचा लोट आणि अनंगरंगाने व्यापलेले अथांग अंतरंग तिच्या काव्यात ठायीठायी दिसून येते. नाजूक नजाकतीचा अविनाशी नजराणा हीच सॅफोची साहित्यक्षेत्रातली याद, तिला शतकानुशतके रसिक दाद देत राहतील.

जीवनाच्या अखेरीस शारीरिक क्षमता आटल्याची जाणीव व मृत्यूच्या वास्तवतेची कठोर जाणीव तिच्या अखेरच्या शब्दात स्पष्टपणे दिसून येते.

' रसिकांनो, काळाने माझ्या सर्वांगावर सुरकुत्यांचे जाळे टाकले आहे. केसांचा काळिमा नष्ट झाला आहे. वार्धक्याचे पांढरे निशाण मस्तकावर रोवले आहे......खचितच तारांकित रात्रीनंतर जशी गुलाबी उषा प्रकटते, तितक्याच अटळपणे प्रत्येक सजीवाचा माग काढत मृत्यू येतो. मृत्यूच्या मुखात प्रत्येक सजीवाचा एकच घास होतो !' ◻ ◻

# अर्वाचीन मराठी सारस्वतकार

लता किणीकर

'सारस्वत' ही संज्ञा अलीकडे भावनानिष्ठ वाङमयात म्हणजे काव्य–नाटकादी ललित वाङमयाला लावण्यात येते. येथे ही संज्ञा 'सरस्वतीच्या गंगाजळीत काळाच्या आणि अभिरुचीच्या जोड-चाळणीतून जे जे निवडून टिकून राहिले ते सारस्वत,' या अर्थाने उपयोजिली आहे. 'मराठी सारस्वताचा अर्वाचीन कालखंड' हा इ. स. १८१८ ते इ. स. १९५० असा मानण्यात आला आहे.

हा कालखंड सामाजिक प्रबोधनाचा आणि स्वातंत्र्य-समराचा कालखंड होय! नवी विद्या आणि नव्या विद्येच्या प्रसाराची नवी साधने आणि माध्यमे यांतून हे प्रबोधन आणि हे आंदोलन घडून येत होते. वाणी आणि लेखणी यांना या कार्यात फार मोठी जबाबदारी स्वीकारावी लागली. वृत्तपत्रकार, निबंधकार आणि ग्रंथकार यांच्याबरोबरीने कादंबरीकार, नाटककार आणि कवी यांना आपले सामर्थ्य पणास लावावे लागले. यातून नव्या जीवननिष्ठा आणि साहित्यनिष्ठा उदयास आल्या, रुजल्या आणि वाढल्या.

१८१८ ते १९५० हा कालखंड 'स्वराज्याचा अस्त' आणि 'स्वराज्याचा उदय' या घटनांचा गंभीरपणे विचार करणारा कालखंड आहे. देशस्वातंत्र्याच्या विचारावरोबर व्यक्तिस्वातंत्र्याच्याही विचाराला जोराने चालना मिळाली. या दोन मूल्यांच्या भोवती त्यांना केंद्र मानून, अर्वाचीन मराठी वाङमय वाढत, विकास पावत गेले. याच कालखंडात एका बाजूने निबंध-वाङमयाला आणि दुसऱ्या बाजूने काव्य–कादंबरी–नाटकादी ललित साहित्याला नवे रूप, नवी दिशा आली आणि ललित साहित्यात प्रामुख्याने दोन निष्ठा प्रबळपणे अवतरल्या–१. वास्तवनिष्ठा आणि २.सौंदर्यनिष्ठा (Romanticism). मराठी वैचारिक गद्यलेखनाला ललित-वाङमयाच्या आधीपासूनच प्रारंभ झाला होता. विद्यापीठीय शिक्षणानंतर निबंधवाङमय पुऱ्या जोमाने अखंडपणे वाढत गेले. नव्या जीवनजाणिवा, नवे दृष्टिकोण, नव्या जीवनप्रणाली यांचा ऊहापोह या निबंधसृष्टीत तार्किक आणि तात्त्विक पातळ्यांवरून अव्याहतपणे चालू राहिला. राजकीय आणि सामाजिक नवनवी तत्त्वज्ञाने आपणापुढे आली आणि एकप्रकारचा मूल्यसंघर्ष आपल्या जीवनात सुरू झाला.

जीवनप्रणाली आणि जीवनपद्धती यासंबंधी राजकीय आणि सामाजिक स्तरांवर मूल्य-संघर्ष चालू असता वाङमयीन क्षेत्रातही साहित्याच्या स्वरूपासंबंधी, त्याच्या प्रयोजनाविषयी आणि मूल्यांविषयी वादविवाद सुरू झाला होता. या काळात स्वातंत्र्य हा आपल्या जीवनाचा मूलमंत्र होऊन राहिला होता.

अर्वाचीन कालखंडाचे प्रवर्तन बाळशास्त्री जांभेकर यांनी केले. बाळशास्त्री जांभेकर म्हणजे अर्वाचीन महाराष्ट्रातील पहिले प्रबुद्ध मन होय! मराठी मनाचा मोहरा त्यांनीच प्रथम इहनिष्ठेकडे आणि राष्ट्रनिष्ठेकडे वळवला. बाळशास्त्र्यांनी इंग्रजी राज्याबरोबर आलेल्या 'विद्याखात्या'ची शक्ती ओळखली व तिचा नवजीवनदर्शनासाठी उपयोग कसा करावा, याचे दिग्दर्शन केले. बाळशास्त्री जांभेकर आणि परशुरामतात्या गोडबोले म्हणजे अर्वाचीन मराठी सारस्वताच्या दोन शाखांचे ललितेतर आणि ललित शाखांचे मूळ पुरुष होत.

ललित साहित्याच्या मूळ कल्पनेत हळूहळू बदल होत गेला. मराठी काव्यसृष्टीत Romantic वृत्तीला महत्त्व आले, तर कादंबरीसृष्टीत वास्तववादी दृष्टिकोण प्रकर्षाने अवतरला. हरिभाऊ आणि केशवसुत हे अनुक्रमे वास्तववादाचे आणि Romanticism चे पहिले प्रबळ उन्मेष होत. कलेचे स्वातंत्र्य तत्त्वतः या दोघांनाही मान्य होते. हरिभाऊंनी 'सामाजिक प्रबोधन' हे आपल्या कादंबऱ्यांचे प्रयोजन मानले आणि ध्येयवादी वास्तवता आपल्या साहित्यात आणली. केशवसुतांनी मुक्त अशी निर्भरशील कविता निर्माण केली. या नव्या निष्ठांनी मराठी काव्य, नाटक आणि कादंबरी पुढे आरपार बदलून गेली.

केशवसुत आणि तांबे यांच्या Romantic वृत्तीचा एक अनोखा आविष्कार प्रा. श्री. के. क्षीरसागरांच्या लेखनात आढळतो. आक्रमक टीकाकार म्हणून ओळखले जाणारे प्रा. क्षीरसागर हे वृत्तीने मूलतः Romantic तत्त्वज्ञानी आहेत. आत्मिक प्रेमावरील निष्ठेचा एक अपूर्व नजराणाच क्षीरसागरांनी मराठीला दिला आहे. त्यांची सर्जनशील टीका काव्याहून काव्य बनते. In his critical writings, there is a 'feel' of quivering sensibility in presence of beauty. He adds strangeness to beauty.

या कालखंडाचे प्रवर्तन ज्या दोन निष्ठांनी म्हणजे बाळशास्त्री जांभेकरांची इहनिष्ठा आणि परशुरामतात्या गोडबोल्यांची अभिजात साहित्यनिष्ठा यांनी केले, त्या निष्ठांची परिणत रूपे या कालखंडाच्या अखेरीस व स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीच्या पहिल्या दशकात आपणास मिळतात. ज्या वैचारिक गद्याचा उगम बाळशास्त्र्यांच्या 'दर्पण'–'दिग्दर्शन' मधून झाला आणि त्यातून पुढे मराठी निबंध-वाङमयाला प्रेरणा मिळाली त्या वैचारिक-गद्याची व निबंध वाङमयाची अव्यभिचारी निष्ठेने आयुष्यभर जर कोणी उपासना केली असेल तर ती डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी. तसेच स्वातंत्र्यनाशानंतर लगेच पहिल्या पिढीतच स्वराज्याच्या पुनःप्राप्तीचे जे स्वप्न बाळशास्त्र्यांनी पाहिले, त्याचे रक्षण आणि संवर्धन कसे करावे, याचेही दिग्दर्शन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. पु.

ग. सहस्रबुद्धे यांनी केले. एका अर्थी बाळशास्त्री जांभेकरांच्या कार्याची पूर्तताच डॉक्टरांच्या 'भारतीय लोकसत्ता' या ग्रंथाने केली आहे, असे म्हणावेसे वाटते.

अर्वाचीन काळात मराठी वाङमयाचा अभ्यास सर्व बाजूंनी करण्यात येऊ लागला. अशा वेळी प्राचीन वाङमयाच्या अभ्यासाची नियामक तत्त्वे कोणती आणि त्यासाठी अभ्यासकांच्या मनाची वाङमयीन तयारी आणि बैठक कशी असणे आवश्यक आहे, हे डॉ. वाटवे यांच्या साहित्यसंपदेवरून ध्यानी येते. त्यांनी 'प्राचीन मराठी पंडिती काव्य' हे आपले अभ्यासाचे क्षेत्र निश्चित करून त्याच्या आकलनास, आस्वादास आणि मूल्यमापनास लागणाऱ्या सर्व सामग्रीची सिद्धता करून ठेवली व स्वतः निर्णय दिले. त्यांनी संस्कृतमधील विदग्ध महाकाव्ये, नाटके आणि विनोद यावर जे दीर्घविवेचनात्मक निबंध लिहिले ते मराठीतील जुन्या अभिजात-वाङमयाच्या अभ्यासास अत्यंत मार्गदर्शक ठरणारे आहेत.

अर्वाचीन कालखंडात केवळ साहित्य-मूल्ये किंवा केवळ कलामूल्ये सिद्धरूपात अवतरली नाहीत. येथे जीवनमूल्ये आणि कलामूल्ये ही साहचर्याने, संमिश्रतेनेच साहित्यकला निर्मितीत आणि समीक्षेत कार्य झाल्याचे आढळते. किंबहुना निखळ कलात्मक-दृष्टीपेक्षा जीवनमूल्यांनाच अधिक स्थान लाभल्याचे दिसून येते. यामुळे अर्वाचीन मराठी सारस्वतातील मूलभूत जीवननिष्ठा कोणत्या, वाङमयीन प्रकार आणि प्रवृत्ती कोणत्या हे पाहणे आवश्यक ठरते व इष्टही ठरते. आणि ह्या निष्ठा आणि ह्या प्रवृत्ती जोपासणाऱ्या सारस्वतकारांची व्यक्तिमत्त्वे त्याहाळणे महत्त्वाचे ठरते. स्वराज्याचा अस्त आणि स्वराज्याचा पुनरुदय या प्रारंभिक आणि अंतिम महत्त्वपूर्ण घटनांमध्ये सामावलेला हा कालखंड स्वतःचे काही वेगळे व्यक्तिमत्त्व धारण करणारा आहे. त्याची ध्येये, त्याची स्वप्ने वेगळी आहेत, त्याची अभिव्यक्ती-पद्धती त्याची स्वतःची आहे. या कालखंडातील सारस्वताचे हे प्रकृतिचित्र स्वतंत्रपणे आस्वादण्यासारखे आहे.

प्रस्तुत ग्रंथात अर्वाचीन मराठी सारस्वतकारांचे एक विशिष्ट दर्शन घडविण्यात आले आहे. अर्वाचीन मराठी सारस्वतात ज्या मूलभूत जीवननिष्ठा आणि वाङमयीन प्रवृत्ती आढळतात; त्यांची उगमस्थळे सुस्पष्ट करून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. इंग्रजी राज्य आणि पाश्चात्य विद्या यांची जुनी परलोकनिष्ठा जाऊन जी इहनिष्ठा बळावली तिचीच व्यक्तिस्वातंत्र्यवाद, राष्ट्रस्वातंत्र्यवाद, प्रवृत्तिधर्मवाद, नवमतवाद ही नवी जीवनमूल्ये होत. तसेच इंग्रजी शिक्षण आणि इंग्रजी साहित्य यांची जुनी साहित्यदृष्टी जाऊन जी नवी साहित्यनिष्ठा जन्माला आली तिचीच अभिजातवाद, वास्तववाद, सौंदर्यवाद, कल्पनीयवाद, गूढवाद ही रूपे होत. अर्वाचीन मराठी सारस्वतात इहनिष्ठेची ही विविध रूपे त्यांनी प्रवर्तित केली त्या सारस्वतकारांचे एकत्रित दर्शन घडविण्याच्या हेतूने हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. ☐

**अर्वाचीन मराठी सारस्वतकार**
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई–४
पृष्ठे–१५३. मूल्य–१२।। रुपये


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |

रंगभूमी

शिरीष सहस्रबुद्धे

## प्रेक्षकांना आणि कानेटकरांनाही न गवसलेला

# कस्तुरीमृग

'कस्तुरीमृग' हे वसंत कानेटकर यांचं अलीकडेच रंगमंचावर आलेलं नवं नाटक. त्याला 'नवं' असं मी म्हणतो ते फार मर्यादित अर्थानं. कारण एरवी त्यात काही नवलविशेष, नवीन असं काय आहे, हे मला जाणवलेलं नाही. कानेटकर हे सदाहरित प्रतिभेचे नाटककार आहेत असा दावा त्यांचे चाहते करतात. तो मान्य केला तरी एक गोष्ट लक्षात घ्यावीच लागते की नाटककार म्हणून त्यांच्या कारकीर्दीत चढउताराचं प्रमाण खूपच आहे –व्यावसायिक चढउतार नव्हेत; कारण ते एक पूर्णपणे वेगळंच जग आहे; तर त्यांच्या नाटकाकडून अपेक्षित असलेला काही-एक किमान दर्जा आणि प्रेक्षकांना त्याद्वारे मिळणारं समाधान ( अर्थातच कलात्मक आनंद, आर्थिक नव्हे ), या अर्थाचे हे चढउतार आहेत. त्यांची अलीकडची काही नाटकं विचारात घेतली, तर असं निश्चितपणे वाटतं की, एक प्रदीर्घ उताराचा कालखंड सुरू आहे.

कस्तुरीमृग या कानेटकरांच्या नाटकाचा विषय आहे एका गणिकेची जीवनकहाणी. या नाटकात नावीन्याचा अभाव आहे, असं मी म्हणतो, तेव्हा त्याची सुरुवात विषयापासूनच झालेली असते. 'वेश्याजीवनावरील नाटकांची मराठी रंगभूमीला आता अपूर्वाई नाही.' वगैरे सतत बोललं–लिहिलं जात असलं, तरी तितक्याच उत्साहानं त्या विषयावरची नवनवी नाटकं सादर होत असतात. त्यामागे वेश्याव्यवसाय या महत्त्वाच्या सामाजिक समस्येविषयीची तळमळ किती, 'साध्याही विषयात' मोठा आशय शोधण्याची प्रवृत्ती किती, आणि अन्याय्य प्रेरणांचे प्रमाण किती हा प्रश्न विचार करण्याजोगा आहे. तथापि कानेटकरांच्या कस्तुरीमृगाची वेगळीक ती इतकीच की, हे नाटक चालू जमान्यातल्या वेश्याजीवनासंबंधी नसून सुमारे अर्धशतकापूर्वीच्या काळातलं आहे. त्या वेळच्या काही वास्तव व्यक्ती आणि सत्यघटना यांवर आधारून लिहिलेलं आहे. अशा प्रकारे, अगदी नजीकच्या इतिहासातील व्यक्ती, स्थिती किंवा प्रसंग यांच्या पायावर उभारलेलं कानेटकरांचं हे काही पहिलंच नाटक नव्हे. क्वचित अशीही शंका येते की नाटकाचा हा एक विशिष्ट साचा किंवा 'trend', कानेटकर जाणीवपूर्वक प्रेक्षकांपुढे पुनःपुन्हा आणताहेत. तो तसा अगदी नवा नसला तरी सोपा म्हणून, किंवा चटकन 'अपील' होणारा म्हणून, किंवा काही अन्य अज्ञात कारणांमुळे. कस्तुरीमृग हे नाटक त्याच ट्रेंडमधलं. त्याच्याआधी अल्पकाळच रंगमंचावर आलेलं 'विषवृक्षाची छाया' हे नाटक त्याच पंथातलं. त्यामानानं, 'हिमालयाची सावली' हे त्यांचं तत्पूर्वीचं नाटक अधिक सरळ वळणाचं होतं; एकाच कर्तबगार व्यक्तीच्या चरित्राचा स्पष्ट निर्देश करणारं होतं. उलट 'विषवृक्षाची छाया' आणि काही प्रमाणात 'कस्तुरीमृग' या दोन्ही नाटकांमध्ये विविध प्रवाह स्पष्ट जाणवतात, किंबहुना व्यक्ती-प्रसंगांची सरमिसळ जाणवेल अशाच सावधगिरीने केलेली आहे. केंद्रस्थानी मानलेल्या पात्र-प्रसंगांच्या जीवनाखेरीज, अन्य तत्कालीन व्यक्तींच्या किंवा स्थिती-घटनांच्या सावल्या कथेत पडलेल्या आढळतात. 'विषवृक्षाची छाया' तर याच हव्यासापायी, आपली प्रभावांची पृथगात्मता (Unity of Impression)-गमावून बसलं आहे, असा तक्रारीचा सूर ऐकू येतो. कस्तुरीमृगसंबंधी या तक्रारीला विशेष वाव नाही. कारण, कारण ही एकाच पात्राभोवती फिरणारी कथा आहे. तथापि एकूणच कानेटकरांच्या या फॉर्म्युलाच्या भवितव्यात मोठं यश दिसत नाही. व्यावसायिक आणि कलात्मक अशा दोन्ही यशांची सांगड घालण्यात 'हिमालयाची सावली' काही अंशी यशस्वी ठरलं असलं, तरी विषवृक्षाच्या सावलीला हे भाग्य लाभलेलं नाही; असं हळूहळू स्पष्ट व्हायला लागलेलंच आहे. 'कस्तुरीमृगा'चं चित्र अजून पूर्ण व्हायचंय. या पलीकडे जाऊन नाटकाचा एक लेखनप्रकार या दृष्टीनं या प्रकाराची अधिक खोलात जाऊन चिकित्सा करणं हे काम अधिकतर साहित्यसमीक्षकांचं आहे, असं वाटतं.

तेव्हा कस्तुरीमृग ही शोकान्तिका, वर म्हटल्याप्रमाणे गणिकेच्या कुळात जन्मलेल्या पण प्रतिभेचे देणे लाभलेल्या एका मनस्वी स्त्रीच्या आयुष्याची आहे. अर्थात यातून हे चरित्रकथनात्मक नाटक आहे असा ठोकळेबाज निष्कर्ष मला काढायचा नाही, पण तरीही मराठीतली पहिली स्त्री नाटककार मानली जाणारी ही स्त्री आणि तिच्या आयुष्यात (दुर्दैवानेच ? अपघातानेच ?) आलेले चार पुरुष, आणि न आलेला, पण यायला हवा होता असा एक पुरुष, यांची ही कहाणी आहे. या व्यावहारिक संदर्भाला सोडून पुढे जायचं, तर नाटकाच्या प्रारंभीच कानेटकरांनी केलेल्या निवेदनानुसार, ही शोकान्तिका केवळ एका गणिकेची किंवा एका प्रतिभासंपन्न कवयित्रीचीही नाही, तर

'ही शोकान्तिका आहे

स्त्री आणि पुरुष यातील युगायुगांच्या संबंधांची.

म्हणूनच जितकी कालची तितकीच आजची.

आणि कदाचित उद्याचीदेखील.'

परीक्षणाला इथपासूनच सुरुवात करायची, तर यातला 'कदाचित उद्याचीदेखील' हा भविष्यकाळाला दिलेला इशारा आहे, आणि 'कालची तितकीच आजची', हे वस्तुस्थितीची किनार असलेलं थोडंसं समर्थन आहे, अर्धशतकापूर्वीची पार्श्वभूमी निवडण्याचं. स्त्री-पुरुषातील युगायुगांच्या संबंधांची कल्पना हे नाटकात मांडलेल्या विशिष्टाचं, 'सार्वत्रिकरण अधिक उदात्तीकरण' वाटतं. मात्र त्यातून जो प्रातिनिधिकत्वाचा दावा

कानेटकर सूचित करतात तो पटत नाही, कारण नाटक बहुतांशी रेंगाळल्यासारखं वाटतं ते विशिष्टाच्या पातळीवरच.

अंजनी शिरोडकर ही एका गणिकेची मुलगी— पोरकेपणामुळे कुणा एका दुर्गा-मावशीच्या आश्रयानं वाढलेली. थोडं शिक्षण आणि ऐन विशीतच फुटलेले प्रतिभेचे पंख यामुळे गणिकेचं परंपरागत जिणं ठोकरून ती 'नक्षत्रांच्या जगात 'च अधिक रमते. रा. ब. पेंडशांसारखे अनेक ढोंगी स्त्रीभक्षक हात धुऊन मागे असतात, त्यांना दाद न देता ती आपलं पहिलं अल्लड प्रीतिपुष्प बेभानपणे पायावर वाहते ते भाऊराव पटवर्धन या क़लंदर नटश्रेष्ठाच्या पायी. पण तिचा हा देव, तिच्या सर्वस्वाचा नैवेद्य आनंदानं स्वीकारून— क्वचित ओरबडूनही— सर्वार्थानं तिच्याकडं पाठ फिरवतो. या धक्क्यातनं पुरती सावरतानाच तिचं मन साहित्यसम्राट दादासाहेब सरंजामे यांच्यावर जडतं. पण इथंही तोच अनुभव. भावपूर्ण—रम्य—स्वप्नाळू सहजीवनाच्या आड भिंतीसारखं अखंड उभं राहतं ते तिचं स्त्रीशरीर आणि तिचा जन्म, तिचं कूळ. दारुण दुःखाच्या आणि दारूच्या ज्वालांमध्ये सगळे पंख जळून बेचिराख झालेल्या उद्ध्वस्त अवस्थेत तिला अंतिम सत्य उमगतं—

'अरे, जिचा धुंद वास माझ्या प्रियकराच्या अंगाचा आहे असं समजून मी उरी फुटेतोवर धाव धाव धावले, ती स्वप्नांची कस्तुरी माझ्या पोटातच होती की रे!'

## अपयशाची खरी व्यथा

तेव्हा कस्तुरीमृगाच्या शोधाचा कथाप्रवाह हा असा अपेक्षित वळणं घेऊन अपेक्षित शेवटाकडेच नेणारा आहे. 'कथावस्तू' या दृष्टीनं पाह्यचं तर चपखलपणा आणि सफ़ाई ही दोनच प्रमुख वैशिष्ट्यं मनात भरतात. पण हा तांत्रिक चपखलपणा आणि मांडणीतली ही व्यावसायिक सफ़ाई हे गुण कानेटकरांच्या बहुसंख्य नाटकांमध्ये असतातच. तेव्हा लेखन 'तंत्राची' नाडी उमगलेला अनुभवी नाटककार आणि डॉ. श्रीराम लागू यांच्यासारखा सिद्धहस्त दिग्दर्शक यांची युती झाल्यानंतर, अभिनेत्यांचे जरूर ते सर्व सहकार्य मिळाल्यानंतर कस्तुरीमृगचा प्रयोग सफ़ाईदार—देखणा—रंगतीचा वगैरे होतो, हे अपेक्षांच्या चौकटीत बसणारेच आहे. पुढचा प्रश्न आहे तो हा की, या व्यावहारिक पातळीच्या वर जाऊन कानेटकर तुमच्याआमच्या अंतरंगाला कुठे भिडतात का? आणि या प्रश्नाच्या नकारात्मक उत्तरातच या शोकांतिकेच्या लेखनाचं आणि लेखकाचं अपयश आहे असं मला वाटतं. स्त्री-पुरुषांच्या युगायुगांच्या संबंधांना कानेटकर ताकदीनं हात घालतात ते फक्त नाटकाच्या शेवटी— अंजनी रक्तबंबाळ मनानं रक्त उसळल्यासारखं बोलते तिथे. 'पुरुष आणि स्त्री, नर आणि मादी म्हणून समोरासमोर आले की सगळे सुंदर संबंध नासायला लागतात,' असा काही व्यापक आणि मूलभूत विचार ते काहीसा अचानक का असेना पण शेवटी मांडतात. पण शेवटच्या प्रवेशात नाटककाराला जाणवलेली आणि (कदाचित त्यामुळेच?) प्रेक्षकांनाही कुठेतरी आतपर्यंत जाऊन भिडणारी अनुभूतींची उत्कटता, आधीच्या पूर्ण नाटकात इतरत्र कुठेही जाणवत नाही, ही कस्तुरीमृगाच्या लेखनातील अपयशाची खरी व्यथा आहे.

पात्रांच्या एन्ट्रीज् व एक्झिट्स्वर कानेटकरांचा पुरेसा ताबा आहेच. विशेषतः अंजनीच्या आयुष्यात येऊन जाणाऱ्या पुरुषांच्या बाबतीत ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. एखाद्या पात्राची व्यक्तिरेखा उभी करण्याची त्यांची शैलीही जुनीच पण पुरेशी प्रभावी आहे. मात्र पुरेशा मनोविश्लेषणाच्या अभावी, त्या पात्राच्या बोलण्यातून मिळणाऱ्या सूचना आणि इतरांचे त्याच्याविषयीचे स्पष्ट-अस्पष्ट शेरे, मतं यातूनच ही बरीचशी बाह्य ओळख होते. आणि यामुळेच कानेटकरांच्या याही नाटकात नेहमीप्रमाणेच संवादाला अतिरिक्त महत्त्व प्राप्त झालेलं आहे. काही थोडी सुभाषितवजा टाळीची वाक्यं वगळता, संवादात खास उल्लेखनीय असं काहीच नसलं, आणि क्वचितप्रसंगी तर ते कृत्रिमच वाटत असले, तरी नाटकाच्या चौकटीत त्यांना मिळालेल्या महत्त्वपूर्ण स्थानामुळे 'अॅक्शन'ला आणि परिणामी दिग्दर्शनालाही फारसा वाव या नाटकात नाही. डॉ. लागू यांच्यासारख्या दिग्दर्शकालाही संवाद व तदनुरूप हालचाली व्यवस्थित बसवण्यापलीकडे काही चमक विशेषत्वाने दाखवता येऊ नये, हा दोष बहुतांशी 'स्क्रिप्ट'चाच आहे, असं मी म्हणेन. अंजनीची काव्याची आवड दाखविण्यासाठी तिने बालकवी ठोंबरे यांची भेट मागण्याचा प्रकार हा कृत्रिम, कामचलाऊ आणि काहीशा बटबटीत लेखनाचं व संवादाचं उत्तम उदाहरण म्हणून दाखवता येईल.

अशा काही ठळक अपयशांबरोबरच कानेटकर, डॉ. लागू आणि अन्य कलाकार यांनी ज्या एका प्रांतात लक्षात ठेवण्यासारखं यश मिळवलं आहे, तो व्यक्तिरेखाटनाचा. काही मोजक्या व्यक्तिरेखा त्यांची नेमकी नस पकडून आणि समर्थपणे पेलून त्यांनी उभ्या केल्या आहेत. यात सिंहाचा वाटा अर्थातच चार भूमिका करणारे डॉ. लागू, अंजनीची भूमिका जिवंत करणाऱ्या रोहिणी ओक आणि गणिकेच्या घरच्या दुबळ्या पुरुषाची कथा-व्यथा जगणारे मोहन गोखले यांच्याकडे जातो. रा. ब. पेंडसे आणि पंत ठेंगे या दोन भूमिका डॉक्टरांनी ज्या सहजपणे त्यातल्या फरकासह आणि बारकाव्यांसकट उभ्या केल्या, त्याची दाद सामान्य प्रेक्षकाकडूनही उत्स्फूर्तपणे मिळत होती. त्या मानाने भाऊराव पटवर्धन आणि दादासाहेब सरंजामे या व्यक्तिरेखांमध्ये एकसुरीपणा काही वेळा टाळता आला नाही. अंजनी ही तर मध्यवर्ती व्यक्तिरेखा होती. चित्रकाराचा कुंचला पाठोपाठ उलटसुलट दिशांनी फिरावा, तशी परस्पर विसंगत वृत्तींचा मेळ घालू पाहणारी ही भूमिका तशी अवघड असूनही ताकदीने साकारली गेली. विशेषतः तिसऱ्या अंकातले त्यांचं भावदर्शन परिणामकारी आहे, चटका लावून जाणारं आहे. मात्र एखाद्या भावपूर्ण क्षणी, ओक यांचा विशिष्ट आवाज त्यांना पुरेशी साथ देत नाही, क्वचित परिणाम उणावतो अशी माझी वैयक्तिक तक्रार आहे. अन्य सर्व सहकारी कलावंतांनी उत्तम साथ दिलेली आहे. मात्र अंजनीचा बालमित्र, तिचा तबल्यावरचा साथीदार, तिचा आधार, हितचिंतक आणि सल्लागार, पण तरीही तिच्या घरी बराचसा आश्रितासारखा असणारा मंगेश ही कॅरॅक्टर कस्तुरीमृगमधली सर्वाधिक 'कॉम्प्लेक्स' पण वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने चितारलेली आहे. या नाटकातलीच नव्हे तर रंगभूमीवरचीच ती एक आगळीवेगळी ठरावी. तो दुबळा असला, तरी तिला सतत सावरायचा प्रयत्न करतो. तिचा 'फ्रेंड गाईड अँड फिलॉसॉफर' म्हणता येईल असा तो आहे. त्याच्या दुबळेपणाचंही त्याचं स्वतःचं असं एक तत्त्वज्ञान आहे. आयुष्यात त्याला अखंड निखाऱ्यावरच चालायला लागल्यानं हे तत्त्वज्ञानही पोळलेलं

पृष्ठ २८ वर

आयुष्याच्या भीषण जंगलात भेटणाऱ्या
श्रद्धा, प्रेम, सत्य, निष्पापपणा
या माणुसकीच्या सुंदर झऱ्यांचा शोध
इंगमार बर्गमन नावाचा स्वीडिश दिग्दर्शक
आपल्या चित्रपटातून घेत असतो.



# माणसाकडून माणसाकडे

अशोक प्रभाकर डांगे

तुम्हाला एखादी पंधरा–सोळा वर्षांची मुलगी आहे का ?
मग ती दिसायलाही सुंदर आहे का ?
आणि स्वभावानं ती अगदी सरळ, निष्पाप, भाबडी आहे ?
शिवाय तुम्हालाही ती खूप प्रिय आहे ? असणारच.
तुम्ही लाडातच तिला वागवता.
तिच्या अवखळ बोलण्यात हरवून जाता.
तिच्या गोबऱ्या गालांचे गालगुच्चे घेता.
म्हणजेच तुम्ही एखाद्या प्रेमळ बापासारखेच वागता.
आता समजा तुमचंच नाव टोरे आहे.
आणि तुमच्या लाडक्या मुलीचं नाव तुम्हीच ठेवलंयत कॅरीन.
पण तुम्ही काही एवढेच नाही आहात. फक्त प्रेमळ.
तुम्ही चांगलेच कर्तव्यकठोर आहात.
अगदी घरातल्या कर्त्या पुरुषानं असावं तेवढं.
शिवाय आणखी एक खूप महत्त्वाची गोष्ट.
तुम्ही श्रद्धावानही आहात.
परमेश्वराच्या अस्तित्वाला तुम्ही मानता.
तुमच्या दृष्टीनं ती एक सर्वश्रेष्ठ शक्ती आहे.
तोच जीवन घडवणारा निर्माता आहे.
आणि तोच जीवन उद्ध्वस्त करणारा विधाता आहे.
म्हणूनच तुम्ही जगताय त्याच्याच अस्तित्वाच्या सावलीला.
तुम्ही प्रत्येक गोष्ट त्याच्या विश्वासावरच करता.
आणि मग परिस्थितीची परिणती त्याच्यावरच सोपवता.
म्हणूनच आज सकाळी तुम्ही आपल्या कोवळ्या मुलीला दूर एकटी धाडायला तयार झाला आहात.
तुम्हाला हे माहितेय की वाटेत जंगलं आहेत, अवघड डोंगर–दऱ्या आहेत.
त्यातून घोड्यावर बसून तिला एकटीनंच जायचं आहे.
पण ह्या साऱ्या तपशीलांपेक्षा तुमचं कर्तव्य मोठं आहे.
कारण ' ओडिन ' नावाच्या देवावर तुमची अपरंपार श्रद्धा आहे.
वसंत ऋतू नुकताच सुरू झाला आहे.
आणि तुमच्या कुवार मुलीला ' व्हर्जिन कँडलस् ' घेऊन ओडिनच्याच चर्चमध्ये जायचं आहे आणि तिथल्या चर्चमध्ये त्या लावायच्या आहेत.
तुमच्या बायकोचं नाव मेरेटा आहे.
तुम्ही तसं आयुष्याची वाट खूपच चालून आलाहात.
तुमचे केस करडे झालेयत.
तशीच तिही जराशी थकलीच आहे म्हणा.
तिला प्रेम करण्यासारखी एकटीच मुलगी उरलीय.
तशी तुम्ही दोघांनी एक कुठेतरी फसलेली पोरं सांभाळलीय.
इंगेरी तिचं नाव.
ती जरा वेडसर आहे.
तसंच तिला कुणापासून तरी पोटही आलंय.
म्हणजे ती आता कुंवार तर निश्चित नाहीयेय.
मेरेटाच्या हातात एवढंच आहे तिच्यावर सारखं रागावणं.
कॅरीन एकटी जाण्याच्या कल्पनेनंच मेरेटा चांगलीच घाबरलीय.
कारण कॅरीन तशी जराशी आजारीही आहे. शिवाय मेरेटाला काल रात्री काही तरी भीषण स्वप्नही पडलंय.
म्हणूनच ती प्रेमळ आई तिचं जाणं टाळू पाहत्येय.
तिच्या आयुष्यावर नेहमीसारखंच प्रेमाचं पांघरुण घालत्येय.
तुम्ही ऐकत नाही.
मग मेरेटाचंही स्वाभाविकच काही चालत नाही.
ती जड मनानंच प्रवासाच्या तयारीला लागत्ये.
तिचं जेवण बांधून देते.
शिवाय कॅरीनला प्रवासासाठी तयार करते.
अगदी नवा सुंदर पोषाख चढवून.
पण मुलगी पण तुमच्यासारखीच हट्टी आहे.
ती म्हणते मी एकटी नाही जायची.
इंगेरी पण येऊ देत बरोबर.

कारण त्या बिचारीला कधीच कुठे जायला मिळत नाही.
तुम्हालाही आता ऐकण्याशिवाय गत्यंतर नसतं.
तुम्ही दोघींनाही घोड्यावर बसवता.
वेशीपर्यंत बरोबर जाता.
आणि मग आपल्या आकाशासारखे खोल निळे डोळे असणाऱ्या
आपल्या लाडक्या लेकीला निरोप देता.
आणि एक सुंदर गाणंही म्हणता.
वसंतऋतू आला आहे.
आता इथली सुंदर रानं,
पानाफुलांनी वहरून जातील.
आणि इथल्या डोंगराडोंगरातून
अवखळ नद्या, नाले भरभरून वाहू लागतील.
कॅरीन जाते. आताच तुमची भूमिका अवघड बनते.
कारण आता तुम्हाला तिच्या येण्याचीच वाट पाहायची असते.
कदाचित ती उद्या येईल. कदाचित परवाही.
तुम्ही अस्वस्थपणे वावरता.
तुमची बायको अस्वस्थ होते.
तशी तिच्या मनात त्या स्वप्नाची पाल चुकचुकतच असते.
आणि अखेर तेच खरं ठरतं.
तुमच्या वाट पाहण्याला अर्थच राहत नाही.
कारण कॅरीन आता येणारच नसते.
तुम्ही मात्र वाट पाहताय. उगाचच. दारात उभं राहून.
तशी येतात तीन अज्ञात माणसं. त्या संध्याकाळी
तुम्ही त्यांना विचारताय. प्रश्नच प्रश्न.
कोठून आला. कोठे चाललात. वगैरे वगैरे.
त्यांची उत्तरं पण तयारच असतात.
उत्तरेकडून आलो.
उत्तरेत यंदा जबरदस्त थंडी पडली.
गुरं गोठून गेली.
पुष्कळ माणसं उपासमारीनं मेली.
आम्ही चाललोयत दक्षिणेकडे. कामाच्या शोधात,
निदान पोट तरी भरता येईल.
तुम्हाला तर सगळं ऐकून ठाऊक होतंच.
त्यातले दोघे प्रौढ आहेत. एक पोरगा आहे.
ते तिघे भाऊ धनगर आहेत.
मग तुम्ही परत एकदा कर्तव्य बजावता.
त्यांना त्या रात्रीपुरता आसरा देता.
त्यांना आपल्याबरोबर जेवायला घालता.
थोरले दोघे अन्नावर तुटून पडतात.
धाकटा मात्र घाबरलेला, बावचळलेला दिसतो.
तो टेबलावरच ओकतो.
थोरला म्हणतो, त्याची भूक मेलीय दुष्काळात.
म्हणून त्याला अन्नाचीही आजकाल शिसारीच येते.
तुम्हालाही ते पटतंय. पटायलाच हवं.
पण तेवढ्यावर भागण्यासारखं नसतं.
रात्री त्या लहान पोराच्या अवेळी किंचाळण्यानं जागी झालेली
मेरेटा उठून खाली जाते.
तर ते म्हणतात, आमच्या भावाला दुष्काळाची स्वप्नं पडतायत.
शिवाय ते आणखी एक गोष्ट करतात.
आपल्या जवळचा एक सुंदर मौल्यवान झगा तिच्याजवळ देतात
आणि म्हणतात,
तुम्ही थोर मनाची माणसं आहात.
आम्हाला घरात आसरा दिलात.
हा किमती झगा पाहा.
तो आमच्या बहिणीचाच आहे.
बिचारी दुष्काळात मेली.
पण करणार काय. पोट जाळायला हवं ना.
तुम्हाला योग्य वाटेल ती किंमत आम्हाला द्या.
तुमचे खूप उपकार होतील.
मेरेटा म्हणाली, ठीक आहे. मी मालकांना सांगीन.
ते ह्याची योग्यच किंमत तुम्हाला देतील.
तुम्ही मुळीच काळजी करू नका.
ती खोलीबाहेर आली. तिनं दार बाहेरून गच्च लावून घेतलं.
आणि तिथल्याच पायरीवर बसून ती एकटीच ढसढसा रडू लागली. वेळ असाच गेला.
मग मेरेटानं हाक मारली. तुम्ही जागे झालात.
तिनं तो सुंदर पिवळा झगा तुम्हाला दाखवला.
ती एवढंच म्हणाली.
त्या लोकांनी विकत दिलाय.
हा कॅरीनचा आहे.
आणि ह्याला ताजं रक्तही लागलंय.
बापरे ! तुमचं रक्त जागच्या जागी गोठलं.
सारं निळं आकाशच डोळ्यांपुढे फिरलं.
म्हणजे त्या सैतानांनी तुमच्याच मुलीचा खून केलाय हेच सत्य आहे.
वेडसर इंगेरीनं आणखी खूपच पाहिलंय.
कॅरीनला आधी सोडून आलेली आणि मग तिच्या मागून सावली-सारखी नकळत गेलेली ती वेडी पोर आता मध्यरात्री भेदरून एकटीच परतलीय.
ती पस्तावून डोकं आपटतेय तुमच्या पायांवर.
मी ते सारं पाहिलं, सारं पाहिलं.
ते तिघे तिला भेटले. गोड बोलले.
तिनं आपलं जेवण त्यांना देऊ केलं.
ते मस्त जेवले. प्याले.
मग त्यांनी तिच्यावर बलात्कार केला.
आणि मग झाडाचं पोक डोक्यात घालून तिला ठार मारलं.
मला सुरुवातीला खूप बरं वाटलं.
कारण मला तिचा द्वेषच नेहमी वाटायचा.
पण मग मी हादरले. चिडले. दगडही उचलला.
पण तो भिरकवायचं बळच मला उरलं नाही.
मला क्षमा करा, क्षमा करा.
मीच तिला मारलंय. मीच तिला मारलंय.

मीच खरी गुन्हेगार आहे.
मलाच मारून का टाकत नाही.
आता सारं सत्यच वीज होऊन तुमच्यावर कोसळलंय. हे सत्य सैतानाचं आहे.
पण तुम्ही मात्र पुरते बांधील आहात.
आपल्या कठोर कर्तव्याला.
मग तुम्ही तरी दुसरं काय करणार आहात.
तुम्ही आता रानात जाता जाता.
दुःखानं बेभान होऊन जाता.
पिसाटून एका झुडपालाच गदगदा हलवता.
आणि आवेगानं मोडून टाकता.
मग त्या पवित्र झुडपाच्या वाकवलेल्या फांद्यांनी तुम्ही आपलं नागवं अंग शेकून काढता.
एखाद्या धर्मकार्याला जावं तसं तुम्ही स्नान करून पवित्र होता.
आणि तुम्ही. तुमचं नाव टोरे.
त्या सैतानांच्या बंद खोलीचं दार हलकेच उघडता.
तेव्हा तुमच्या हातात असतं सारं अस्तित्व.
म्हणजेच मांस छिलायची धारदार सुरी.
तुम्ही हलकेच आत जाता.
बरोबर तुमची धीराची पत्नी मेरेटा पण असते.
त्यांची चामड्याची थैली तुम्ही उघडता.
तुमचा अंदाज अगदी अचूक ठरतो.
त्यात तुमच्या मुलीची, कॅरीनची, अंतर्वस्त्र असतात.
मग त्या सैतानांना तुम्ही उठवता.
ते समजतात. घाबरतात.
मग एकाला तुम्ही भोसकता.
दुसऱ्याला भोसकून शेकोटीतल्या ज्वालांवर जळत ठेवता.
तिसरा लहान भेदरतो. मेरेटाच्या आसऱ्याला जातो.
आणि एवढं होऊनही ती त्याला जवळ घेते.
खरं त्या लहान भावाचा दोष तरी कोणता असतो,
कारण बलात्कार कळण्याइतकाही तो मोठा नसतो
आणि नंतर खून करण्याइतका क्रूरही नसतो.
तो असतो साऱ्याचा निष्पाप साक्षीदार.
आणि तुमच्या मुलीच्या बेवारशी प्रेतावर मूठभर तरी माती टाकणारा एक सच्चा पोर–एक माणूस.
पण तुम्हाला ते कुठं ठाऊक असतं.
तुम्ही त्याला ओढून घेता आणि–
सरळ भिंतीवर आपटून ठार मारता.
कारण हेही तुमचं कर्तव्यच आहे.
निदान तसं तुम्हाला वाटतंय.
आता सारं संपलंय. शांत झालंय.
रडणाऱ्या, छाती फोडून घेणाऱ्या मेरेटाला घेऊन तुम्ही जंगलाकडेच धावताय. इंगेरी वाट दाखवतेय.
तुमच्या लाडक्या लेकीचं नागवं प्रेत दाट रानात बेवारशी पडून आहे.
कॅरीन आता कधीच परत येणार नाहीयेय.
फक्त शांत हसऱ्या चेहऱ्यानं निष्पाप निळ्या आकाशाकडे पाहत्येय. एवढंच. ◻

श्रद्धा, प्रेम, सत्य, चांगलेपणा यांचा विलक्षण शोध इंगमार बर्गमनसारखा दिग्दर्शक त्याच्या ह्या व्हर्जिन स्प्रिंगमध्ये डोळसपणे घेताना दिसतो. खरं तर ही एक अद्‌भुत लोककथा. स्वीडनसारख्या देशात शतकानुशतके सांगितली गेलेली. पिढ्यापिढ्यातून प्रवास करत आलेली. म्हणूनचं बर्गमन काळाचा कुठलाही संदर्भ न देता ती घडवतो. त्यातलं वातावरण तसं जुनाट. त्यातली लाकडी भांडी, लाकडी घरं, जंगलं सारेच संदर्भ काळाच्या जाणीवेपलीकडचे.

त्यातला टोरे हा माणूस बर्गमन कालचं प्रतीक म्हणून स्वीकारतो. पण श्रद्धेपेक्षा परमेश्वरावरचं प्रेम हाच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा आहे.

त्याचं परमेश्वरावरचं प्रेम सच्चं आहे. हा त्याचाच पाईक आहे. त्याच्यासाठीच तो जगतो. म्हणूनच त्याच्यासाठी होणारे सर्व उपचार हा पाळतो. आणि म्हणूनच हा पवित्र मेणबत्त्या चर्चकडे नेण्याची आपल्या मुलीवर सक्ती करतो. कारण त्याच्या दृष्टीनं ते एक ईश्वरी कार्य आहे. आणि म्हणूनच ते पार पाडणंही अटळ आहे. आता हा माणूस जसा मुलीला चर्चमध्ये पाठवतो तसाच तो तिच्यावर बलात्कार करून तिचा खून करणाऱ्या सैतानांची निर्दय हत्याही घडवतो. आणि मग परमेश्वराची विनवणी करतो. त्याला हे मुळीच समजू शकत नाही. तो परमेश्वरालाच प्रश्न विचारतो.

तू हे सारं का केलंस ?
त्या निष्पाप मुलीवर तू बलात्कार का होऊ दिलास ?
आणि नंतर तिचा खून का करवलास ?
आणि त्यानंतर माझ्याकडून खुन्यांना का मारवलंस ?
मी तुला समजूचं शकत नाही.
मी तुला समजूच शकत नाही.
तरी सुद्धा मी तुझीच क्षमा मागतो.
माझ्या पापांबद्दल माफी मागतो.

ह्या श्रद्धावान माणसाला प्रेम समजते. दया समजते. निष्पापणा समजतो. ह्या साऱ्या दैवी देणग्या आहेत असं तो मानतो. तरीसुद्धा त्याला बलात्कार समजत नाही. द्वेष उमगत नाही. खून समजत नाही. निष्पाप आणि निर्दय, प्रेमळ आणि क्रूर, सुंदर आणि ओंगळ ह्या परस्परविरोधी प्रतिमा तो त्याच्या ईश्वराच्या व्यक्तिमत्त्वात पाहूच शकत नाही. हे सारेच विरोधाभास त्याला अगम्य वाटतात. पण ते सारे जगून, अनुभवूनही तो त्यांच्या पलीकडे जाऊन पोहोचतो. कारण मुळातच ह्या माणसाचं परमेश्वरावर प्रेम आहे आणि प्रेमात गुण पाहावे लागतात आणि दोषही जाणून घेऊन बाजूला सारावे लागतात. म्हणूनच टोरे परमेश्वराला कोणतीच दूषणं देत नाही; आपल्या मुलीचा खून करणाऱ्या परमेश्वरावर चिडत, संतापत नाही, उलट त्याला समजून घेण्याचाच प्रयत्न करताना दिसतो. आणि यापुढे जाऊन तो परमेश्वराला उघड उघड दोषी म्हणायलाच तयार नसावा असे वाटते. कारण तो जे काही करवतो, तो सारा न्यायच असतो. वास्तवता असते आणि ती वास्तवता स्वीकारणे हेच त्याच्यासारख्या परमेश्वराच्या पाईकाचे कार्य असते. परमेश्वरी शक्तीवर

दुर्दम्य श्रद्धा ठेवणारा टोरे आपल्या पापाबद्दल मात्र दिलगीर असतो. आणि त्या पापाच्या क्षालनासाठीच तो तिथे ईश्वराचे चर्च बांधण्याचा निर्धार करतो आणि ते सुद्धा त्याच्या स्वतःच्या हातांनी. श्रमांनी. कारण त्याच्या हातून घडलेल्या खुनांचा जिम्मेदार ईश्वर नसतो, तर स्वतःच टोरे असतो.

टोरेचं भन्नाट प्रवाही व्यक्तिमत्त्व उभारणारा बर्गमन प्रेम ह्या मूल्याचा शोध घेताना दिसतो. हे प्रेम आजारी असलेल्या कॅरीनची बाजू घेणाऱ्या मेरेटामध्ये दिसतं. तसंच ते कॅरीनचा हट्ट पुरवणाऱ्या टोरेमध्ये. इंगेरीच्या अनौरस गर्भाला जपणाऱ्या कॅरीनमध्ये, अनोळखी गुराख्यांना जेवू घालणाऱ्या निष्पाप कॅरीनमध्ये, बर्गमन समृद्धपणे दाखवून देतो. अर्थात मानवी जीवनातले हे प्रेम असं अटळ वास्तवता म्हणून वावरताना दिसतं, तसंच ते मूल्यांची घडण म्हणून बर्गमन दाखवतो. टोरेचं परमेश्वरावरलं प्रेम तर साऱ्यांहून श्रेष्ठ प्रतीचं ठरतं. बर्गमन मानवी मनातल्या आणखी एका श्रेष्ठ भावनेचा शोध घेतो. ती असते मानवता. ह्या मानवतेचं गहिरं चित्रण तो ह्या चित्रपटात घडवतो. ही मानवता आपल्याला कॅरीनमध्ये दिसते. तशीच तिच्या प्रेतावर अलगद माती टाकणाऱ्या धाकट्या भावातून दिसते. ह्या मानवतेचं प्रतीक म्हणूनच टोरे तीन अज्ञात वाटसरूंना आपल्या घरात आश्रय देतो. आपल्याच बरोबर जेवायलाही घेतो आणि ह्याच मानवतेतून मेरेटा थोरल्या दोघांच्या खुनांनी भेदरलेल्या धाकट्या भावाला, आपल्याच पोरासारखं जवळही घेते.

बर्गमनचा 'व्हर्जिन स्प्रिंग' परस्परविरोधी प्रवृत्तींचे एकाच व्यक्तिमत्त्वात चित्रण करतो. बलात्कार करून निर्दयपणे कॅरीनचा खून करणारे दोन भाऊ आपल्या पापाचा निष्पाप साक्षीदार असलेल्या धाकट्याला प्रेमळपणे जपत राहतात. आणि पापाला दूर ठेवणारा टोरे त्या तीन भावांचे तशी वेळ येताच निर्दयपणे खूनही करताना दिसतो. कॅरीनचा मनस्वी द्वेष करणारी इंगेरी तिचा बलात्कार कठोरपणे पाहू शकते, पण तिचा खून मात्र सहन करू शकत नाही. त्याबद्दल पश्चात्ताप करत राहते. आणि आपल्या सख्ख्या मुलीला जीवापाड जपणारी मरेटा वाळगलेल्या इंगेरीवर मात्र उगाच डाफरत राहते. ह्या किंवा अशा साऱ्याच उपरोधातून बर्गमन जीवनातल्या शाश्वत मूल्याची अपरिहार्यता जाणवून देतो.

श्रद्धावान माणसं नेहमीच श्रद्धांचा पाठपुरावा करतात. आपली जीवघेणी अपयशं ते श्रद्धांच्या प्रवाहात विसर्जित करतात. आपल्या देखण्या यशाला ते श्रद्धेचीच उंची झालर लावतात. आपल्या अंतःकरणातल्या भीतीला ते श्रद्धेच्याच भुईत पुरून ठेवतात. आपल्या आशांची सुंदर स्वप्नं ते श्रद्धांच्याच आकाशात रंगवतात. आपली दुःखं, रोग, विकार साऱ्यांवर श्रद्धेचाच इलाज करतात. इतकंच काय, आपल्या उपभोगांची वस्त्रंसुद्धा ते श्रद्धेच्याच खुंटीवर उतरवून ठेवतात. पण ही सारी माणसं सामान्यच असतात. आपल्या श्रद्धांनीच ती मोठी होतात. पण श्रद्धांनाच मोठं करणारी माणसं मूलतःच मोठी असतात. बर्गमनचा टोरे अशाच मोठ्या माणसाचं प्रतिनिधित्व करतो आणि आपल्या निखळ श्रद्धेनं तो त्या श्रद्धेलाच मोठं करतो. बर्गमन प्रेमाचाही पुरस्कार करतो. निष्पापपणा, चांगलेपणा यांचाही शोध घेतो. क्रौर्य, बलात्कार यांच्या भुईतून त्या एखाद्या निखळ स्वच्छ झऱ्यासारख्या अचानक जन्म घेतात. आयुष्याच्या भीषण जंगलात भेटणाऱ्या माणुसकीच्या ह्याच सुंदर झऱ्यांचा शोध बर्गमन नावाचा स्वीडिश दिग्दर्शक आपल्या प्रभावी चित्रपटातून घेत असतो. बर्गमनचा 'व्हर्जिन स्प्रिंग' हाच मुळी माणसाला माणसाकडे घेऊन जाणाऱ्या प्रक्रियेचा अटळ असा भाग ठरतो. □ □

---

## कस्तुरीमृग : पृष्ठ २४ वरून

आहे. पाठीच्या कण्यातनंच मोडून पडलेला हा विलक्षण 'पॅसिव्ह' माणूस, अंजनीवर अंतःकरणपूर्वक, खरंखुरं प्रेम करतो, पण शारीरिक किंवा मानसिक न्यूनगंडामुळे अखेरपर्यंत ते प्रकट करीत नाही. (somehow or the other) तिलाही त्याची जाण येत नाही आणि ही शोकान्तिका घडते. मोहन गोखले यांना त्यांच्या व्यावसायिक कारकीर्दीच्या प्रारंभीच अशी आव्हानात्मक भूमिका मिळावी हा सुयोग आणि त्यांनी ते आव्हान ताकदीनं सामोरं जाऊन पेलावं, हे त्यांचं कर्तृत्व ! रोहिणी ओक आणि मोहन गोखले या दोघांनीही प्रायोगिक रंगभूमी गाजवून व्यावसायिक रंगभूमीवर या नाटकाद्वारे प्रथमच यशस्वी पदार्पण केलेलं आहे.

श्री. मोहन तोंडवळकरांच्या 'कलावैभव' नं निर्मिलेल्या 'कस्तुरीमृग' ची नेपथ्यादि सर्व तांत्रिक अंगं पुरेशी समृद्ध आहेतच. विशेष उल्लेख करायला हवा तो हृदयनाथ मंगेशकरांनी योजिलेल्या पार्श्वसंगीताचा. यात पार्श्वगायनच प्रामुख्याने आहे. मा. दीनानाथ व अन्य गायकांच्या जन्या नाटकातल्या प्रसिद्ध गाण्यांच्या तुकड्यांचा वापर ठिकठिकाणी केलेला आहे, आणि प्रकाश घांग्रेकर व अन्य पार्श्वगायकांनी या ध्वनिमुद्रिकांबरोबरच म्हटलेले हे तुकडे किंवा त्यांची फक्त धून यांचं मिश्रण तयार केलेलं पार्श्वसंगीत नावीन्यपूर्ण आहेच, तथापि जसं काही ठिकाणी ते प्रसंगांना उठाव आणतं, तसंच अन्य काही प्रसंगी (उदा. तिसऱ्या अंकातील फ्लॅश–बॅक) रसभंग करणारं ठरून खटकतंही. तरीसुद्धा एक प्रयोग या नात्यानं हे स्वागतार्ह ठरावं.

कस्तुरीमृगच्या यशापयशाचा आलेख हा असा आहे. कानेटकरांची कारागिरी (craftsmanship) यात कुठेच उणी पडत नाही. मात्र अनेक जिवंत प्रत्ययकारी नाटकं देणारे कानेटकर या भेसळफॉर्म्युला नाटकात दिसत नाहीत. नाटक सावरलं जातं ते कलाकारांमुळेच, लेखकामुळे नव्हे किंवा दिग्दर्शकामुळे नव्हे. आणि म्हणूनच हा कस्तुरीमृग प्रेक्षकांच्या हाती तर गवसत नाहीच, पण अखेरशेवटी तो कानेटकरांनाही गवसत नाही. तो हाती लागतो तो मोहन गोखले, रोहिणी ओक आणि नाटकाच्या जाहिरातीत वारंवार लिहिलं गेलंय त्याप्रमाणे श्रीराम लागू–श्रीराम लागू आणि श्रीराम लागू यांच्याच ! □ □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २०।३।७६ ते २६।३।७६

**आर्थिक क्षेत्रात कडक उपाययोजना होईल. राजकारणावर उदासीनतेची गडद सावली**

मध्यवर्ती सरकार, महाराष्ट्र व इतर काही राज्यांचा अर्थसंकल्प आता बाहेर आला आहे. त्याचे सर्वसामान्य लोकांच्या हिताच्या दृष्टीने अनुकूल परिणाम दिसणार आहेत. मात्र व्यापारी, धंदेवाले, निरनिराळे व्यावसायिक यांच्या मनात काहीसे काळजीचे वातावरण राहील असे दिसते. मंगळ भारताच्या लग्नी आहे तर शनी चंद्राच्या समोर आहे. त्यामुळे विज्ञान, तेल, खते, अन्नधान्य याबाबतीत भारताची परिस्थिती खूपच समाधानकारक राहील. कापडाची भाववाढ होईल पण बाजार मंदीतच राहील. आर्थिक क्षेत्रात मध्यवर्ती सरकारकडून बरेच कडक उपाय योजले जाण्याची शक्यता आहे. जागतिक राजकारणात भारताच्या मुत्सद्देगिरीचा व इंदिराजींच्या कुशल राजनीतीचा प्रभाव अधिक ठळकपणे जाणवेल. बांगला देशमध्ये राजकारणाला, भारताला अनुकूल असे वळण लागण्याची शक्यता आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अनुकूल वातावरण राहील. महाराष्ट्रात काँग्रेसला राज्यसभेत मोठे बहुमत लाभावे अशी परिस्थिती राहील.

**मेष : महत्त्वाच्या कामात यश**

सर्वसामान्यपणे हा आठवडा प्रगतीचा जाणार आहे. रवी बारावा आहे. तो खूप पैसा खर्चावयाला लावील. मोठेपणाच्या नादी लागून पैसा उडवाल. पण यश व प्रगती हातात हात घालून काम करील. खाजगी अगर सरकारी नोकरीत बेकारांना काम मिळेल. निराश झालेल्या मनाला दिलासा मिळेल. वरिष्ठ जागेवर बदली अगर नवी नेमणक होऊन दर्जा वाढेल. उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर चांगले संबंध जुळून येतील. परदेशी जाण्यासाठी करावयाचा पत्रव्यवहार या आठवड्यात करा. कायम नसलेले नोकर कायम होतील. मित्र व नातेवाईक यांच्यासाठी खूप खर्च होईल. राहणीमानात फरक पडेल. उंची फर्निचरसाठी पैसा खर्चाल. सोमवार, बुधवार उत्तम आहेत. शुभ दिनांक २१, २५.

**महिलांना :** पैशाची टंचाई भासणार नाही. नोकरीत सहज प्रवेश मिळेल.

**विद्यार्थ्यांनी** शिक्षणाच्या खर्चासाठी नोकरीचा प्रयत्न करावा.

**वृषभ : प्रयत्नांची शिकस्त हवी**

अकरावा रवी तुमच्याभोवती निर्माण झालेली राजकीय कोंडी निश्चितपणे फोडणार आहे. अशा स्वरूपाचे रेंगाळत पडलेले प्रश्न आता निश्चितपणे मार्गी लागतील. तुम्ही लॉटरीत अथवा रेसमध्ये भाग घ्यावा. हा अकरावा रवी तुमचे नशीब फुलवून टाकील. गुरू मात्र बारावा आहे. नव्या कामाला अगर उद्योगाच्या उभारणीला म्हणावी तशी अनुकूलता नाही. टीकेची वृत्ती नुकसानीला कारण ठरू शकेल. लेखक, गायक, पत्रकार, प्रकाशक यांच्या बुद्धीला हवी तशी चालना मिळणे कठीण आहे. आळस, विस्मरण अशा गोष्टींमुळे प्रगतीला खीळ बसू शकेल. रोज गुरुचरित्र वाचा. नोकरीत राक्षसासारखे काम करावे लागेल. पण त्या मानाने पदरात मात्र शून्यच पडेल. दि. २०, २४, २५ शुभदायक आहेत.

**महिलांना :** संसारात फार कष्ट पडतील. मात्र मायेची माणसे भेटतील. पत्रे येतील.

**विद्यार्थ्यांना :** वाचलेले लक्षात राहण्यासाठी दत्तउपासना करा.

**मिथुन : आर्थिक मदत**

गुरू, मंगळ, रवी असे अनेक ग्रह या आठवड्यात आपल्या सुखासाठी तत्पर आहेत. तुम्ही आत्मकेंद्रित वृत्ती सोसा व भोवताली पहा म्हणजे प्रसन्न वातावरणाने नवे नवे साक्षात्कार तुम्हाला होऊ लागतील. आता नोकरीत त्रास देणाऱ्या अधिकाऱ्याची धास्ती बाळगू नका. ते तुमचे आता काहीही वाईट करणार नाहीत. चुका मात्र होऊ देऊ नका. हिशोबाच्या कामात जास्त काटेकोर राहा. बेकारांच्या बाबतीत साहानुभूतीचे धोरण राहील. स्वतंत्र उद्योग किंवा नोकरी असे पर्याय जर त्यांच्यासमोर टाकण्यात आले तर त्यांनी नोकरीचा स्वीकार करावा. नातेवाईक, मित्र यांच्याबरोबरचे संबंध सुधारून नवे वातावरण निर्माण होईल. लेखाची आवड असल्यास नव्या लेखनाची सुरुवात करा. शुभ दिनांक २१, २६.

**महिलांना :** तुम्हाला त्रास होणाऱ्या अनेक गोष्टी इतिहासजमा होणार आहेत. नोकरीत पगारवाढ होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात उत्साह वाटेल. परीक्षा असल्यास पेपर्स उत्तम जातील.

**कर्क : संयम ठेवा**

पहिला शनी तुम्हाला लाभदायक आहे. त्यानेच तुम्हाला सर्व कटकटीतून निभावून नेले आहे. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला त्याने प्रतिष्ठा आणली आहे. पण इतके दिवस अकरावा असलेला मंगळ आता बारावा झाला आहे. त्याची दखल तुम्हाला घ्यायलाच हवी. काही तरी बरेवाईट घडवण्याचे सामर्थ्य ज्या ग्रहांजवळ नसते ते ग्रह असे प्रतिकूल झाल्यानंतर त्यांच्या हालचालींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवायला हवे. कर, हिशोब, महसुल, जमीन इत्यादी स्वरूपाचे काम ज्या नोकरांकडे आहे त्यांच्यावर वरिष्ठांचे कडक लक्ष राहील. चालू नोकरीत कामाचा ताण विलक्षण वाढणार आहे. नको असलेल्या जागी बदलीही होऊ शकेल. शुभ दिनांक २३, २५, २६.

**महिलांना :** मनातील निराशा कमी होईल. हाती घेतलेले काम व्यवस्थित पार पडेल. नोकरीत अनुकूलता.

**विद्यार्थ्यांना :** भांडणात पडू नका. वाहनविषयक नियम काटेकोर पाळा. अभ्यासात प्रगती.

**सिंह : मतभेद नको**

तुम्हाला साडेसाती आहे. या आठवड्यात रवी आठवा, मंगळ अकरावा आहे. मंगळाचे शनीजवळचे भ्रमण तुम्हाला दुर्लक्षून चालणार नाही. कुठेही मतभेद होऊ न देता जर मुत्सद्देगिरीने वागण्याचे ठरवलेत तर या आठवड्यातही काही चांगले अनुभव येतील. प्रतिपक्षाचा डाव तुम्ही उधळू शकाल. नोकरीत वरिष्ठांना आपल्याच कच्छपी ठेवण्यात तुम्हाला यश येईल. पैसा कमी पडणार नाही. लॉटरी, रेस अशा मार्गाने नशीब उजळून निघू शकेल. स्थावराच्या खरेदी-विक्रीत भरपूर लाभ होईल. शुभ दिनांक २४, २५.

**महिलांना :** सार्वजनिक कार्यात मान व मोठेपणा मिळेल. नोकरीत सुख.

**विद्यार्थ्यांना :** राजकारणाचा मोह आवरावा. परीक्षेसाठी जास्त काळजी घ्यावी.

**कन्या : सांसारिक अडचणी**

गुरू आठवा झाल्यापासून तुमच्या संसारात अडचणी वाढत आहेत. त्यात काही प्रमाणात भर पडणार आहे. आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी बरीच धावपळ करावी लागेल. मात्र ते काम यशस्वी होऊ शकेल. तब्येतीची काळजी घ्या. उन्हाळचाचे आजार होऊ नयेत याची काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरीत काम जास्त करावे लागेल. त्या कामाचे चीज होणे नाही. कौटुंबिक स्वरूपाचा पत्रव्यवहार होईल. मान, प्रतिष्ठा उंचावेल. बेकारांच्या स्थितीत थोडीफार सुधारणा होईल. नव्या उद्योगाची सुरवात थोडी लांबणीवर टाका. शुभ दिनांक २२, २३, २६.

**महिलांना :** संततीची उगाचच काळजी राहील. प्रत्यक्षात मात्र सारे सुरळीत असेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात मन गुंतेल. रोज उपासना करा. स्वास्थ्य मिळेल.

**तूळ : राजकीय यश**

या आठवड्याची सुरवात एखाद्या शुभघटनेने होईल. रवी व गुरू अनुकूल आहेत. राजकारणात तुम्हाला रस असेल तर त्यात विश्वासाने पदार्पण करा. नोकरीत गुणांना वाव मिळेल. स्वतःचे कर्तृत्व दाखवायला संधी मिळून मालक अगर वरिष्ठ यांचे मन जिंकता येईल. बेकार असतील तर त्यांनी स्वतःची योजना घेऊन पैसा मिळवण्यासाठी अवश्य प्रयत्न करावा. त्यांचे काम होईल. पैशाची टंचाई अशी भासणार नाही. गरज भागेल. नव्या गाठीभेटी सहज जमून जातील. विवाहेच्छूंचे विवाह जमतील. संसारात गोडवा येईल. शुभ दिनांक २१, २२, २४.

**महिलांना :** नोकरीत प्रमोशनची शिफारस होईल. माहेरवास घडेल.

**विद्यार्थ्यांना :** नाट्य सिनेमात प्रवेश मिळू शकेल.

**वृश्चिक : किरकोळ त्रास**

राशिस्वामी मंगळ आठवा आहे. गुरूसारख्या सात्त्विक ग्रहाची तुमच्यावर मर्जी नाही. हर्शल व राहू बारावे आहेत. ग्रहांनी अगदी कोंडीत पकडले आहे. यातून मार्ग काढायचा म्हणजे कुलदेवतेची उपासना करणे हाच होय. तुम्ही मनोभावे ते करा. या आठवड्यात स्थावराचा कोणताही वाद कोर्टात नेऊ नका. शक्यतो खरेदी विक्री तहकूब ठेवा. नोकरीत डोळ्यात तेल घालून जपा. हाताखालच्या नोकरांवर विसंबून राहू नका. वरिष्ठांबरोबर मतभेद टाळा. पैशाची आवक जरा मंदावेल. पण गरज भागेल. दि. २२, २४ अनुकूल.

**महिलांना :** मोठेपणाच्या आहारी जाऊ नका. माणसे सांभाळून घ्यावी लागतील.

**विद्यार्थ्यांना :** भलत्या भ्रमात राहून अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नका.

**धनु : अडचणी संपल्या**

गुरू पांचवा झाल्यापासूनच खरे म्हणजे तुमचे सारे ठाकठीक होऊ लागले आहे. जीवनातील अनिश्चितपणा संपुष्टात येऊन विचारांतील चंचलपणाही आता दूर झाला आहे. या आठवड्यात मान प्रतिष्ठा उंचावणाऱ्या घटना घडतील. उच्च व्यक्तीशी संबंध येऊन आगामी योजनांना गती मिळेल. नोकरीधंद्यास स्थैर्य येऊन उत्साहाला भरते येईल. मालक अगर वरिष्ठ अधिकारी कामावर खूष होतील. गैरसमज दूर होतील. शुभ दिनांक २४, २५.

**महिलांना :** अनेक दिवस रेंगाळत राहिलेली व्रते यावेळी पूर्ण होतील. सन्मान होईल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत इतके छान यश मिळेल की तुम्ही आश्चर्यचकित होऊन जाल.

**मकर : बेफिकीर राहू नका**

राशीसमोर राशिस्वामी शनी आहे तो तुम्हाला आत्मविश्वास देत आहे. पण त्याला भेटायला आता मंगळ वेगाने येत आहे. रविदेखील तेवढासा अनुकूल नाही. सगळीकडे आलबेल आहे या समजुतीने बेफिकीर राहून चालणार नाही. तुम्ही जी माणसे दुखावली आहेत ती दबा धरून बसलेली आहेत. नोकरीत, व्यवसायात, व्यापारात, राजकारणात आणि सार्वजनिक कार्यात याचा प्रत्यय येणार आहे. संयमाने वागणे व समझोत्याचा हात पुढे करणे याच धोरणाने वागून मार्ग काढा. विवाहाच्या प्रश्नाला चालना मिळेल. शुभदिनांक २०, २४, २५.

**महिलांना :** नोकरीत अधिकार गाजवू नका. घरात लक्ष द्या. संततीची काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना :** काही अनुकूल घडेल. पण चळवळीत भाग घेऊ नका.

**कुंभ : नव्या पर्वाची सुरुवात**

रवी दुसरा, मंगळ पांचवा व राशिस्वामी शनी सहावा आहे. गुरू तिसरा आहे. ही सारी ग्रहरचना कुंभ राशीच्या व्यक्तीला खूपच अनुकूल आहे. अंगिकारलेल्या कार्यात गेले काही दिवस जी कोंडी निर्माण झाली होती तिला यावेळी मोकळी वाट मिळणार आहे. सहकारी उत्तम सहकार्य देतील. हातून निसटलेला अधिकार पुन्हा हाती येणार आहे. सार्वजनिक कार्य, राजकारण यांत प्रगतीची क्षेत्रे नक्की उपलब्ध होणार आहेत. मान सन्मानाचे योग सहज जमून जाणार आहेत. उत्साह व कार्यक्षमता यांचा नवा प्रत्यय येऊ लागेल. नोकरी व्यवसायांत प्रगतीचे नवे टप्पे गांठाल. शुभ दिनांक २१, २३, २६.

**महिलांना :** स्वतंत्र उद्योगाची सुरुवात करा. लघु–उद्योगात लक्ष घाला. तब्येत सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहील. हाती घ्याल ते तडीस जाईल.

**मीन : सफलता मिळेल.**

हा आठवडा साधारणपणे अनुकूल आहे. रोजच्या कार्यक्षेत्रांत जरी नवे काही घडले नाही तरी चालू कामात अडथळे येणार नाहीत. मानसिक साह्य मिळणे जरा कठीणच आहे. रोज श्रीपाद श्रीवल्लभदत्तात्रयाची पूजा करा. दर्शन घ्या म्हणजे मानसिक सामर्थ्य प्राप्त होईल. या आठवड्यात जमीन जुमल्याचे वाद निकरावर येतील. भाडेकरू–घरमालक यांच्यात बेबनाव निर्माण होण्याचाही सभव आहे. नोकरी व्यवसाय सुरळीत राहील. वरिष्ठांकडे मागणी मात्र काही मागू नका. रजा मागू नका. उगाच त्यांचे मन बिथरेल असे काही करू नका. गरजेपुरता पैसा कसा तरी मिळेल. कर्ज वगैरे मिळण्यांत अडचणी उभ्या राहतील. तरी पण निराश होण्यासारखे काही नाही. शुभ दिनांक २४, २५.

**महिलांना :** मंगल कार्यात भाग घ्यावा लागेल. नोकरीत अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेला जाण्यापूर्वी कुलदेवतेला नमस्कार करा. सफलता मिळेल.

□ □


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI (GAYA)

## क्रीडांगण : पृष्ठ ५ वरून

घडले. अर्थात पुणे संघाने अकारण केलेल्या घाईच्या पकडीही याला कारणीभूत आहेत. पुण्याचा हुकमी एक्का आणि चमकदार चढाईपटू शांताराम जाधव याने दोन्ही सामने अक्षरशः शेवटच्या काही मिनिटांत ओढून काढले खरे, पण विजयाचे पारडे खूप काळपर्यंत हेलकावत होते. शांतारामला दिल्लीच्या वेळी माणिक भोगाडेच्या पकडीने आणि पंजाबच्या वेळी अशोक कोंडरेच्या चढायांनी उत्तम साथ दिली. विभागीय विजेतेपदाचा पुणे–कर्नाटक सामना फारच चुरशीचा झाला. पुण्याने मिळवलेली दोन गुणांची आघाडी आपल्या कौशल्यपूर्ण चढायांनी कर्नाटकने छेदली आणि सामना समान गुणांवर आणला. त्यामुळे विभागीय विजेतेपदासाठी हा सामना बाद पद्धतीने पुन्हा खेळवणे आले. यावेळी मात्र कर्नाटकच्या क्षेत्ररक्षणाने चोख आणि रोख कामगिरी बजावली. शांताराम जाधवने खूप तडफ दाखवली खरी पण चक्रव्यूहाचा भेद करण्याएवढी ती यशस्वी ठरली नाही.

क गटात श्रीरामपूरच्या राज्य अजिंक्यपद स्पर्धा जिंकणाऱ्या सातारा जिल्ह्याबरोबर नाशिक जिल्हा, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल एवढे संघ होते. हिमाचल प्रदेशाचा नवखा संघ, मध्यप्रदेशचा एकेकाळी नाव कमावलेला पण आता तुलनेने उताराला लागलेला संघ आणि पश्चिम बंगालचा गेली काही वर्षे राष्ट्रीय स्पर्धा गाजविणारा आणि रेल्वेचा इन्सानअली व अर्जुन-अॅवार्ड विजेत्या भोलाच्या समावेशाने बलवान झालेला संघ अशा भारतीय कबड्डीतील तीन टप्प्यांवरचे हे संघ होते. या तिन्ही संघांवर एकतर्फी मात करत सातारा जिल्ह्याने स्वतःचे आणि पर्यायाने महाराष्ट्राचे या खेळात खेळाच्या तंत्रामंत्रांवर असलेले प्रभुत्व पुन्हा सिद्ध केले. शरीरयष्टीने आणि तुलनेने किरकोळ असलेल्या आणि महाराष्ट्राचा व जिल्ह्याचा कर्णधार असलेल्या विजय जाधवच्या दुखावलेल्या पायामुळे त्याच्या अनुपस्थितीत खेळणाऱ्या सातारा जिल्ह्याला ऐनवेळी क्षेत्ररक्षणातही नाइलाजाने बदल करावे लागले. अशाही परिस्थितीत अशोक भोसले, नंदू नाडगौंडी, कुमार कुलकर्णी व उत्तम माने यांच्या चढाया, पकडींनी या संघाने विभागीय विजेतेपद मिळवले. सातारचा संघ वगळता इतरांशी खेळताना मात्र बंगालने खूपच तडफ दाखवली.

ड विभागात कागदावरच साराच मामला काटाजोड कुस्तीचा वाटत होता. सोलापूर, उस्मानाबाद, कुलाबा हे जिल्हे आणि विदर्भ, गुजरात ही राज्ये असा हा विभाग. महाराष्ट्रातले संघ चार म्हटले की चुरस आलीच. मकरोणे आणि अंबादास मरगु जाधव यांच्या समावेशाने बळकट बनलेला, या स्पर्धेत इतिहास घडवलेला आणि होमग्राउंडचा फायदा घेणारा असा सोलापूर संघ हा तुलनेने उजवा वाटत होता. प्यारेलाल देवी आणि काशिनाथ रीठे यांची अनुपस्थिती विदर्भ संघात नक्कीच जाणवत होती. खळतकर, लोकरे ही जुनी जाणती मंडळी उस्मानाबाद संघातून पुन्हा उतरली होती (अर्थात त्यांचा फॉर्म किती राहिला आहे हा प्रश्न होताच). गेल्या दोन वर्षीतील राज्यचाचणी स्पर्धेतील कुलाब्याची कामगिरी आश्वासक होती. गुजराथचा संघ हाच काय तो जरा डावा संघ. प्रत्यक्षात मात्र विदर्भाचा संघ खूपच तडफेने खेळला. संघनायक भुटे अमीर पठाण यांनी कुठलाही सामना कंटाळवाणा केला नाही. चार द्यावे दोन घ्यावे, या तडफेने त्यांनी सामने लढवले आणि त्यामुळे सोलापूरसह सर्वांना ते पराभूत करू शकले. या विभागातील इतर सामने जिंकून सोलापूरने उपविजेतेपद मिळवले खरे पण अपेक्षित दर्जाचे समाधान ते देऊ शकले नाहीत. उस्मानाबादने विभागातून वर जाण्यासाठी निकराची झुंज दिली. पण हुकमी एकेरी पट घेणाऱ्या खळदकरच्या अनेक पकडी अयशस्वी ठरल्या आणि मग त्याचा संघही यशस्वी ठरू शकला नाही.

उपांत्यपूर्व फेरीतले सामने तसे एकतर्फी झाले. टाटानगरच्या पराभवाचे उट्टे काढत कर्नाटकने प. बंगालचा ११–१ असा एकतर्फी पराभव केला. मुंबईकरांनी दाखवलेल्या चौफेर खेळामुळे सोलापूर संघ अगदीच निस्तेज ठरला. (३२–५) ठाणे आणि विदर्भ हा सामना तेवढा रंगला खरा पण तो अगदी शेवटी आणि त्यावेळी प्रथमपासून राखलेल्या आघाडीचा फायदा घेत विदर्भाने सामना जिंकला.

मुंबई-पुणे या दोन बडयांच्या उपांत्यफेरीत नाणेफेक जिंकल्यामुळे मुंबईला सोपे गेले. पुण्याचे तिन्ही आघाडीचे चढाईपटू उजव्या बाजूने चढाई करणारे. त्या बाजूला मध्यस्थकाचे काम बजावणारा सीताराम साळुंखे हा मुंबईचा डॅशिंग सेंटर. त्यातही नुकत्याच झालेल्या श्रीरामपूरच्या महाराष्ट्र-राज्य कबड्डी संघाच्या सराव शिबिरात त्याची शांताराम जाधव आणि अशोक कोंढरेच्या खेळाशी भरपूर जान-पहचान झालेली! त्याने आपली कामगिरी चोख बजावली. तरीही पुणेकरांनी सामन्यातील ताण बराच काळपर्यंत कायम ठेवला. शेखर शेट्टीने अशोक कोंढरेला केलेली पकड वादग्रस्त ठरली आणि निर्णायकदेखील. (राखीव क्षेत्रातील पकडी आणि पुश (Push) या दोन्ही गोष्टींचे निर्णय कबड्डीमध्ये सतत वादग्रस्त आणि कटुता निर्माण करणारे ठरत आले आहेत. त्याबाबतची निःसंदिग्धता जितक्या लवकर संपवता येईल तितके उत्तम. उदा.–साळुंखेच्या सर्व पकडी महाराष्ट्र वगळता इतर कोणत्याही राज्यात त्याने केल्या तर, त्यालाच चढाईच्या गड्यास पुश करण्याचा प्रयत्न या नावाखाली बाद देतील. नव्हे टाटानगरला हे घडले होतेच.) विदर्भ आणि कर्नाटक सामना अप्रतिम रंगला. पहिल्या काही मिनिटांत विदर्भाच्या भुटेने जी आघाडी विदर्भाला मिळवून दिली ती शेवटच्या चार मिनिटांपर्यंत तब्बल आठ गुणांनी कायम होती. शेवटच्या तीन मिनिटांत निदानरेषा अत्यंत सफाईदारपणे आणि धाडसीपणे पकडून कर्नाटकने सामना समान गुणावर आणला आणि अलाहिदा डावात जिंकला. कर्नाटकच्या आक्रमकतेचे कौतुक करायला हवेच, पण भरपूर अनुभवी असलेल्या विदर्भाच्या नामवंत खेळाडूंनी निदानरेषेवर गडी बाद करण्याच्या तंत्राबाबत अगदी प्राथमिक चुका नवोदितासारख्या मोक्याच्या क्षणी कराव्यात हेच त्यांना फार महागात पडले.

मुंबई जिल्हा आणि कर्नाटक जिल्हा ही मॅच सर्वार्थाने मुंबईचा संघनायक असलेल्या मधू पाटीलची मॅच होती. गोपालप्पाने शेखर-शेट्टीबरोबर केलेल्या अप्रतिम साखळी पकडीनंतर लगेच मध्यरेषेपासून अर्ध्या फुटावर नायडूसारख्या सहा फूट उंचीच्या ताकदवान खेळाडूला मधूने मारलेला ब्लॉक आणि शेट्टीच्या पकडीची केलेली परतफेड हे फक्त मधूच करू जाणे. मध्यंतरानंतर मॅचला ताण चढला तो चढाईपटूच्या गतीचा अंदाज न आल्याने आणि सूर्य तिरपा डोळ्यावर आल्याने मधू बाद झाला त्यामुळेच! मॅच मुंबईच्या हातातून गेली ती अनंत गंभीरने कर्नाटकाच्या कर्णधाराच्या केलेल्या चुकीच्या पकडीने नव्हे. त्यात कर्णधाराचे फारसे कौशल्य नव्हते ना गंभीरची चूक होती. आधीच्या सर्व पकडींप्रमाणे मधू दुसऱ्या बाजूने आला असता तर ती हमखास यशस्वी ठरणारी पकड होती. पण ते दुर्दैवाने घडले नाही. पण ठरलेल्या वेळात अत्यंत विचारीपणे आणि धूर्तपणे स्वतःचे कौशल्य, समोरच्या क्षेत्ररक्षणातील बदल, राहिलेला वेळ, तोडावयाची गुणसंख्या यांचा अंदाज बांधून डावाला नेमकी आणि निर्णायक कलाटणी शेवटच्या क्षणी दिली ती मधू पाटीलनेच. मधू पाटील हा भुईर चषक सहा वेळा हातात घेणारा भारतातील

एकमेव भाग्यवान खेळाडू. (इतरांना जंगजंग पछाडून त्याचं दर्शन दुर्लभ असते.) सोलापूरच्या मैदानावर अपयश नाही हा मधूचा आशावादही त्याने सार्थ ठरविला. (गेल्या दहा वर्षांत सोलापूरमध्ये अनेक सामन्यांत मधू खेळला पण त्याला सदैव यशच लाभले.)

महाराष्ट्रातील कोठल्याही महिला कबड्डी स्पर्धा असोत, त्या खरे तर चौरंगीच असतात. मुंबईच्या नवयुग क्रीडा आणि विश्वशांती आणि पुण्याच्या राणाप्रताप, साधना या चार बलाढ्य संघातील झुंजच बहुधा निर्णायक ठरते. (सध्या महाराष्ट्र पातळीवर नवयुग, महाराणाप्रताप आणि भारतीय पातळीवर बंगाल, हैद्राबाद हे दोन संघ काही प्रमाणात रंगत वाढवत आहेत.) महिलांचे नवे संघ महाराष्ट्रातही फारसे तयार होत नाहीत. इतर प्रांतांची तर गोष्टच सोडा. जे तयार होतात, (उदा. सातारा, सोलापूर, कोल्हापूर) त्यामध्ये सरावाचे सातत्य नसते. एखादी खेळाडू जरा चमकू लागेपर्यंत तिचे वाढते वय पालकांना खेळण्यायोग्य वाटत नाही वा सरळ विवाहच होतो. मग संघ आणखीच कमकुवत बनतो. वैदर्भीय भगिनी काही दिवसांपूर्वी तडफेने खेळत, त्यांचाही जोश आता कमी होऊ लागलेला जाणवतो.

नाबर भगिनींशिवायही कलकत्त्याचे अजिंक्यपद जिंकणाऱ्या नवयुग क्रीडासंघाने त्यांच्याशिवाय या दादोबा गावंड चषकाच्या स्पर्धेतील विभागीय विजेतेपदही सहज जिंकले. ब गटात नवयुगमंडळ, महाराणाप्रताप आणि बंगाल यामध्ये चुरस झाली. बंगालकडून एकतर्फी हरलेल्या महाराणाप्रतापने नवयुगशी कडवी झुंज दिली, पण तरीही अपयशच पदरी आल्याने त्यांना विभागातून गळावे लागले. नवयुगने बंगालवर मात करून विभागीय विजेतेपद मिळवले खरे; पण आपले गडी व राखीव क्षेत्रातून उठण्याआधीच घाईने चढाईस जाणाऱ्या व तितक्याच अविचारीपणे निदानरेषा न करता परत येणाऱ्या मोनिकाच्या बालिश परंतु गंभीर चुकीचा त्यात मोठा वाटा होता. लीला पाटीलच्या आक्रमक चढायालाही योग्य किंमत द्यावयास हवी.

क गटात विश्वशांती मुंबई आणि साधना पुणे ही मॅच विलक्षण रंगली. साधना, सीमा हरणेकरने ही मॅच पराभवाच्या गर्तेतून वर काढली. परंतु विश्वशांतीच्या तीन गड्यांत लोण मारण्याची तडफ न दाखवल्याने सामना समान गुणावर संपला. पंजाबी भगिनी या गटात होत्या. पण त्या बहुधा खेळण्याऐवजी सहलीसाठी आणि पुरुषसंघाला जोरदार चिअर अप करण्यासाठी आल्या असाव्यात.

ड गटाचे विजेतेपद मिळवण्यात राणाप्रतापला कोणतीच अडचण आली नाही. हैद्राबादच्या इतरांच्या तुलनेने उजव्या संघालादेखील त्यांनी ३२–६ असे सरळ हरवले. हैद्राबाद उपविजेते ठरले.

बाद पद्धतीचे दोन्ही सामने एकतर्फी जिंकत राणाप्रतापने अंतिम फेरीत प्रवेश केला. विश्वशांती संघ त्यांच्यापुढे उपान्त्य फेरीत टिकूच शकला नाही. रायकर भगिनींची अनुपस्थिती आणि छाया बांदोडकरचा उतरतीला लागलेला खेळ या तुलनेत चार राष्ट्रीय खेळाडू खेळवणारा राणाप्रतापचा संघ फारच भारी होता.

भारतातील बहुतेक सर्व मैदाने जिंकणाऱ्या नवयुग क्रीडा संघाला दादोबा गावंड चषक धार्जिणा नाही. कोल्हापूरचा अपवाद वगळता ही स्पर्धा या संघाला कधीही जिंकता आली नाही. महाराष्ट्राची कर्णधार अरुणा चव्हाण खेळत असतानाही या संघाला उपान्त्य फेरीतच पराभूत व्हावे लागले.

महिलांची अंतिम फेरी पूर्वार्धात अगदीच थंड झाली. राणा प्रताप संघ एकतर्फी जिंकणार ही आशा साधनाच्या चिवट क्षेत्ररक्षणाने फोल ठरवली. उत्तरार्धानंतर पकडीच्या साध्याने साधनाने आघाडी मिळवली. हेमा ताम्हनकरने शुभांगी राणेला मारलेला ब्लॉक आणि शकुंतला खटावकरला मारलेली डाईव्ह या दोन्ही महत्त्वाच्या पकडी दीर्घकाळ स्मरणात राहाव्यात इतक्या उत्कृष्ट होत्या. अशा मोक्याच्या सामन्यात महत्त्वाच्या वेळी शकुंतला खटावकरसारखी नावाजलेली खेळाडू दमबाद होते हे धक्कादायक होते. याची भरपाई मात्र शेवटच्या पंधरा सेकंदात विजया सावंतला मारून सामना समान गुणावर आणून शकुंतलाने केली. सामन्यात दोनदा पारडे वर खाली झाले, परंतु शेवटी विजयश्रीची माळ ( अलाहिदा जादा डावानंतर ) राणाप्रतापच्या गळ्यात पडली.

उद्घाटनाचे भाषण ना. सुशिलकुमार शिंदेंनी इंग्रजीतून केले. खरे तर राष्ट्रीय खेळाचे उद्घाटन राष्ट्रीय भाषेत झाले असते तर ते अधिक सयुक्तिक दिसले असते. बहुसंख्य खेळाडूंना इंग्रजी भाषणापेक्षा हिंदी भाषण समजणे सोपे जाते (आणि इंग्रजी अभिमानी तामीळनाडू, केरळ राज्याच्या संघांनी तर स्पर्धेत भागही घेतला नव्हता.) सर्व बाबतीत व्यवस्था चोख ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न सोलापूरकरांनी केला होता. साऱ्या मैदानावर तांबडी माती होती तरीही वेगवान चढायांच्या वेळी पाय घसरत होते. जमिनीचा भूगर्भशास्त्रीय प्रकार आणि त्यानुसार मैदानाची शास्त्रीय तयारी (किती फूट खणावे, किती माती टाकावी, किती प्रेशरने रोलिंग करावे, किती पाणी मारावे) या गोष्टी तीन–तीन परदेशी दौऱ्यांची आमंत्रणे मिळवणाऱ्या भारतीय कबड्डीने आता नक्की करायलाच हवी. मैदान मऊ (Soft) ही हवे आणि घट्ट (firm) ही. मार तर लागता कामा नये, पण पायाला मैदानावरून रीबाउंड फोर्सही मिळावयास हवा. तीच गोष्ट मैदानावर किती प्रकाश असावा याबाबत. तो ट्यूबचा असावा का दिव्यांचा, दिव्यांना शेड असावी की नसावी, दिव्यांची वा ट्यूबची रचना कशी असावी, किती पॉवर हवी, मैदानावर ते किती उंचीवर असावेत या अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत. आजकाल बहुसंख्य सामने रात्रीच खेळवले जात असल्याने तर हे महत्त्वाचे ठरते. (उदा. टाटानगरच्या या वर्षाच्या राष्ट्रीय स्पर्धेत शेड असलेले हजाराचे तीन बल्ब मैदानावर सुमारे १२ फूट उंचीवर होते तर सोलापूरला शेड नसलेले पाचशेचे तीन बल्ब सुमारे आठ फूट उंचीवर होते. हे सर्व संयोजकांच्या मर्जीवरच सोडावयाचे का ?) क्षणाक्षणाला पालटणाऱ्या सामन्याची रंगत प्रेक्षकांना पूर्णपणे लुटता यावी म्हणून गुण-फलक आणि हमखास होणारे अपघात टाळण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्याकडून जखमा कोणत्या भागावर, कशामुळे व कोणत्या प्रकारच्या होतात याचा सर्व्हे (आणि तदनुषंगिक निष्कर्षानंतर उपाययोजना) या गोष्टीही कबड्डीतील खेळाच्या विकासासाठी अ. दर्जाच्या सामन्यात तरी आता हाती घ्यायला हव्यात.

या सामन्यातील महत्त्वाचे लक्ष्य होते, भारतीय कबड्डी कसोटी संघाची निवड. या महिन्यात मुंबईला होणाऱ्या भारतीय कबड्डीच्या कार्यकारिणीमध्ये निवडसमिती आपली नावे सादर करेल आणि २९ मार्चला मुंबईत होणाऱ्या पहिल्या कबड्डी कसोटी सामन्यात कोणते भाग्यवान खेळाडू खेळणार हे त्या वेळी जाहीर होईल. याबाबत एक अपवाद वगळता कोणतेच पूर्वानुभव कबड्डीच्या खात्यावर जमा नसताना क्रिकेटप्रमाणे त्याबाबत अंदाज वर्तवत बसणे धाडसाचे ठरेल. बघू या, घोडामैदान काही लांब नाही. ☐ ☐